# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.११/२०१७** **दिनांक २३.१०.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २३.१०.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३७५२/ २०१७, दिनांक १२ आक्टोबर, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक २३.१०.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली

त्याचप्रमाणे मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी यांनी ईमेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२३.१०.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२३.१०.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर सकाळी ११.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक २५.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८५०** दिनांक २५.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.८२२-**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ यांना शिर्डी येथे अधिवेशन घेणेसाठी दि२७/१०/२०१७ ते २९/१०/२०१७ अखेर, त्यांचे मागणीप्रमाणे साईधर्मशाळा विभागाकडील दोन समोरा समोरील इमारतीमध्ये अंदाजे १००० व्यक्तीपर्यंतची सशुल्क निवासव्यवस्था तसेच सभागृह व मंडप टाकणेस सशुल्क परवानगी देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ यांना शिर्डी येथे अधिवेशन घेणेसाठी दि२७/१०/२०१७ ते**

**२९/१०/२०१७ अखेर, त्यांचे मागणीप्रमाणे साईधर्मशाळा विभागाकडील दोन समोरा समोरील इमारतीमध्ये अंदाजे १००० व्यक्तीपर्यंतची सशुल्क निवासव्यवस्था तसेच सभागृह व मंडप टाकणेस सशुल्क परवानगी देणेत यावी. तसेच अधिवेशन कालावधीमध्ये संबंधीतांनाश्री साईप्रसादालयामध्ये प्रसाद भोजन घ्यावे, त्यासाठी प्रसादालयातधील जनरल हॉलमध्ये त्यांचे वेळेत काही जागा राखीत ठेवणेत याव्यात, असे ठरले.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, अधिवेशनासाठी आजतागायत संस्थानची जागा दिलेली नाही, परंतु हा राजकीय कार्यक्रम नसल्याने एक विशेष बाब म्हणून अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्याध्यापक संयुक्तमहामंडळ यांनापरवानगी देण्यात येत आहे.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा/ प्रसादालय विभागप्रमुख)

---

**(२) निर्णय क्र.८४८-**

शासनामार्फत वेळोवेळी प्रसिध्द करणेत येणारे शासन निर्णय ई-मेलद्वारे सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी पाठविणेत यावेत. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**संस्थान संबंधीत वेळोवेळी शासनामार्फत प्रसिध्द होणारे शासन निर्णय ई-मेलद्वारे सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी पाठविणेत यावेत व त्याचबरोबर व्यवस्थापन समिती सभेसमोरही सादर करणेत यावे.** (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **श्रींचे दर्शनाकरीता साईभक्तांनी आणलेली फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ स्विकारणेस बंदी होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्त श्रींना अर्पण करणेकामी आपले समवेत फुले, गुच्छ, श्रीफळ, इ. साहित्य घेऊन येत असतात. श्रींना अर्पण करण्यासाठी आणलेले फुले, गुच्छ हे दर्शन रांगेतुन मंदिरामध्ये आणली जातात. परंतु, शिर्डी ग्रामस्थ व पदाधिकारी यांचे विनंतीनुसार श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना सुट्टी फुले, गुच्छ व श्रीफळ यावर बंदी आणावी अशी सूचना केली आहे. त्यानुसार श्रींना दर्शनाचे वेळी साईभक्तांनी आणलेली फुले, गुच्छ व श्रीफळ बंदी करणेबाबत निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेपुढे विषय ठेवण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.७०५ नुसार शिर्डी ग्रामस्थ व पदाधिकारी यांनी समाधी मंदिरामध्ये सुट्टी फुले, गुच्छ व श्रीफळ यावर बंदी आणावी अशी विनंती केली आहे. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेत दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी ग्रामस्थ व पदाधिकारी यांचेकडुन समाधी मंदिरामध्ये फुले, गुच्छ व श्रीफळ यावर बंदी आणावी, हे त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात घेण्यात यावे व त्यासह फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

प्रस्ताव:- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे जा.क्र.न.पं./टी-२/२०१७, दि.०४/०९/२०१७ चे पत्रान्वये दि.०२/०९/२०१७ चे मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांचे समक्ष विविध विभागांचे अधिकारी व ग्रामस्थ यांचे बैठकीत सर्वानुमते झालेल्या निर्णयानुसार श्रीसाईबाबा मंदिर परिसरात फुल, गुच्छ व बुके नेण्यास दि.१० सप्टेंबर, २०१७ पासून बंदी घालणेत आलेली आहे. तरी यापुढील काळात आपले स्तरावरुन श्रीसाईबाबा मंदिर परिसरात फुल, गुच्छ व बुके नेणेस बंदी घालुन साईभक्तांना याची माहिती होणेसाठी शिर्डी हद्दीत विविध ठिकाणी बोर्ड लावणेत यावे असे नमूद केले आहे. तरी शिर्डी नगरपंचायत यांचे पत्रानुसार मंदिर परिसरामध्ये फुल, गुच्छ व बुके नेणेस बंदी होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

विभागाचा अभिप्राय:- समाधी मंदिरामध्ये येणारे साईभक्त श्रींचे दर्शनासाठी येतांना विविध प्रकारची सुट्टी फुले, गुच्छ, प्रसाद, श्रीफळ असे साहित्य श्रींना अर्पण करण्याकरीता आणत असतात. सध्या सुरक्षेच्या कारणास्तव श्रींचे समाधी मंदिरामध्ये प्रवेश करण्यापुर्वी संरक्षण कर्मचारी यांचेकडुन साईभक्तांकडे असलेले श्रीफळ काढुन घेण्यात येत आहेत. श्रींचे समाधी मंदिरात फुले, गुच्छ घेऊन आल्याने खालीलप्रमाणे अडचण होत असलेबाबत शिर्डी ग्रामस्थ यांची तक्रार आहे. त्याबाबत ग्रामस्थांचे असे म्हणणे आहे की,-

०१) समाधी मंदिरात प्रवेश करण्याचे अगोदर गेटचे बाहेर उपस्थित असलेले फुले विक्रेता हे साईभक्तांना प्रवेशद्वारावर अडवुन त्यांचेकडुन जास्त पैसे लुबाडत असुन फसवणूक करत आहेत. तसेच अनेक साईभक्तांना याचा त्रास होत आहे. त्याचप्रमाणे फुले व गुच्छे विक्रेते साईभक्तांशी वेळप्रसंगी भांडन करुन शिवीगाळ करुन मारहाण देखील करत असल्याच्या घटना आढळुन आलेल्या आहेत.

०२) त्याचप्रमाणे साईभक्त ज्या वेळी समाधी मंदिर अथवा मंदिर परिसरामध्ये प्रवेश करतात, त्यावेळी त्यांचेकडुन फुलांच्या पाकळ्या खाली पडत आहेत त्यामुळे मंदिर परिसरामध्ये अस्वच्छता निर्माण होत असून कच-याची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. समाधी मंदिरामध्ये पाकळ्या पडल्याने समाधी मंदिरात मार्बल फरशी चिकट होत असून वारंवार सफाई करण्याची गरज पडत आहे. त्यामुळे वेळोवेळी दर्शन रांग बंद करावी लागत आहे. पर्यायाने साईभक्तांकरीता दर्शनासाठी अडथळा निर्माण होत असल्याचे आढळुन आले आहे. तसेच फुले व गुच्छे यामुळे गर्दीचे वेळेस दर्शनरांग मंद गतीने चालत असलेबाबत ग्रामस्थांची, साईभक्तांची तक्रार आहे. तसेच गर्दीचे वेळेस साईभक्त श्रींचे मूर्तीस फुले, गुच्छ फेकल्याचे ब-याच वेळा घटना घडलेल्या आहेत.

यापुर्वी संरक्षण विभागामार्फत श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळे न स्विकारणेबाबत दि.२८.०८.२०१४ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय ठेवण्यात आला होता त्यावर, निर्णय क्र.७१४ नुसार श्रींना नारळ अर्पण करणे ही बाब भक्तांच्या भावनेशी निगडीत आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर प्रवेशद्वारावरच असे नारळ स्विकारण्यात यावेत. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे. सदर ठरावानुसार संरक्षण विभागाचे कर्मचारी हे मंदिर परिसरामध्ये प्रवेशद्वारावर भक्तांकडुन श्रीफळ स्विकारुन जमा करुन घेण्यात येत आहेत. यावर पर्याय म्हणून श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत खालीलप्रमाणे उपाय योजना करता येतील-

अ) प्रथमत: मंदिर परिसरामध्ये असलेले प्रवेशद्वारावर प्रवेश करतांना संरक्षण विभागाचे कर्मचारी यांचेमार्फत साईभक्तांकडुन फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ जमा करुन घेण्यात यावेत.

ब) मंदिरामध्ये साईभक्तांनी फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ सोबत आणू नयेत असे फ्लेक्स बोर्ड विविध ठिकाणी लावता येतील.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८५१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मंदिर परिसरामध्ये फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ यास बंदी केल्यास, अनेकांचा रोजगार बंद होईल, परंतु फुले, गुच्छ वगैरे विक्री करणारे विक्रेते शिर्डी बाहेरील असून त्यामधील बरेचशे गुन्हेगार प्रवृत्तीचे आहेत ते साईभक्तांना त्रास देतात, जबरदस्तीने फुले, गुच्छ वगैरे विकत घेणेस भाग पाडतात. या बाबींचा तसेच शिर्डी ग्रामस्थांनी दिलेल्या लेखी पत्राचा विचार करता, मंदिर परिसरामध्ये फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ स्विकारणेस बंदी करणेत यावी. त्याचप्रमाणे साईभक्तांच्या श्रध्देप्रमाणे फुलांचे हार स्विकारणेत यावे, परंतु शिर्डी नगरपंचायतीने फुलांच्या हारांची, त्यांच्या आकारानुसार दुकानदारांना किंमत ठरवून द्यावी.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीमार्फत संस्थान परिसरामध्ये विक्री करणेत असलेला पेढा कमी दर्जाचा व खराब असतो, त्यामुळे संस्थानच्या नावाची बदनामी होत आहे. याकरीता श्री साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटी यांना पेढा, प्रसाद व इतर वस्तु विक्रीकामी एफ.डी.ए. ची मानके अनिवार्य करणेत यावीत.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयातील कार्यक्रमांसाठी येणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करणेकामी स्मृतीचिन्ह खरेदीकामी धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१)  मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

*२)  मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.*

**---------** शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत महंत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे.

*---------- समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.*

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

**प्रस्तावः-** त्यानुसार दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा कार्यक्रमांचे उदघाटन व ध्वजारोहणप्रसंगी मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांना निमंत्रित करणेत आले होते. त्यावेळी उपस्थित अतिथीना संस्थानतर्फे स्मृतीचिन्ह देण्यात आले आहे. आता शिर्डी येथे दिनांक २३ व २४ डिसेंबर, २०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करणेत येणार आहे. सदरहू कार्यक्रमाच्या उदघाटनासाठी मा.उपराष्ट्रपती महोदय भारत गणराज्य उपस्थित राहणार आहेत. तर समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेबाबत नियोजन करणेत येत आहे तसेच याचबरोबर वर्षभरातील विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रसंगी प्रवचनकार, संत महंत यांना निमंत्रीत करणेत येणार आहे. सदर कार्यक्रमाकरीता उपस्थित महत्वाचे अतिथींनाही स्मतीचिन्ह देण्याचे नियोजन आहे.

तसेच जे सर्व सामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी सोहळयाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश- विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमाकरीता उपस्थित असणा-या महत्वाच्या अतिथींना देखील (मा.मुख्यमंत्री, मंत्रीगण व इतर मान्यवर) संस्थानतर्फे स्मतीचिन्ह द्यावे लागतील. यासाठी चांगल्या प्रतीचे स्मृतीचिन्ह खरेदी करावे लागणार आहेत.

यापुर्वी दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजीश्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा वर्षातील कार्यक्रमांचे उदघाटन व ध्वजारोहणप्रसंगी मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांना निमंत्रित करणेत आले होते. त्यावेळी उपस्थित अतिथीना मे. बालाजी डिझाईल कॉन्सेप्ट प्रा. लि., दिल्ली यांचेकडून खालील प्रमाणे स्मृतीचिन्ह खरेदी करुन देण्यात आले आहेत.

| अ.नं. | तपशील | दर रुपये | आवश्यक नग | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | MDF Window Frame Size 4 | १८,७२९/- | १ | १८,७२९/- |
| २. | MDF Window Frame Size 3 | ८,५९९/- | १५ | १,२८,९८५/- |
| | | | **एकुण रु.-** | **१,४७,७१४/-** |

आता शताब्दी सोहळा वर्षभरासाठी लागणारे निमंत्रित मान्यवरांना स्मृतीचिन्ह खरेदीकामी मे. बालाजी डिझाईल कॉन्सेप्ट प्रा. लि., दिल्ली यांचेकडे वेगवेगळ्या साईजचे दरांची विचारणा केली असता, त्यांनी ई-मेलव्दारे खालीलप्रमाणे चालू व नवीन दर कळविलेले आहेत.

| अ.नं. | तपशील | दर रुपये |
|---|---|---|
| १. | MDF Window Frame Size 4 | १८,७२९/- |
| २. | MDF Window Frame Size 3 | ८,५९९/- |
| ३. | MDF Window Frame Size 2 | २,९९९/- |
| ४. | MDF Window Frame Size 1 | १,९९९/- |

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा वर्षाचे कार्यक्रमासाठी अतिथींना स्मृतीचिन्ह देणेबाबत खालीलबाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यातील वर्षभराच्या निरनिराळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या मान्यवर/ अतिथींना स्मृतीचिन्ह देणेबाबत निर्णय घेणे. (सोबत यादी)

२) श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा वर्षभरासाठी लागणा-या कार्यक्रमासाठी कोणत्या साईजचे किती नग स्मृतीचिन्ह खरेदी करावे याबाबत निर्णय घेणे.

तरी स्मृतीचिन्हाबाबत धोरणात्मक निर्णय होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयातील कार्यक्रमांसाठी येणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करणेकामी आकर्षक स्मृतीचिन्ह खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी निमंत्रित कलाकार व मान्यवर यांना मोफत निवास, भोजन व दर्शन/ आरती व्यवस्था उपलब्ध करुन देणे व त्यांचा सत्कार करणे यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८५३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत माहे ऑक्टोबर- २०१७ मध्ये दिल्ली येथे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना –** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७ ला अनुसरून प्राथमिक चर्चा करणेकामी दि.२९/०८/२०१७ रोजी शिर्डी येथील संस्थानचे लेडींबागेतील “०” नंबर सभागृह येथे मा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे मा.श्री. बिपीनदादा कोल्हे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. सदरहू बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या पादुका दर्शन प्रस्तावांबाबत ज्या आयोजकांनी परिपूर्ण प्रस्तांव सादर केलेले आहेत अशा भारतातील

आयोजकांना दि.२२/०९/२०१७ व विदेशातील आयोजकांना दि.२३/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे बोलविण्यात यावे तसेच त्यावेळेस विश्वस्त मा.श्री. जयकर सो. व मा. श्री.भोसले सो. यांनाही निमंत्रीत करण्यात यावे असे ठरलेले होते.

त्यानंतर दि.०१/०९/२०१७ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी ( विश्वस्त मा.श्री. वाकचौरे सो. व मा. श्री. कोल्हे सो. यांचेशी दूरध्वनीद्वारे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने) नोव्हेंबर-डिंसेबर-जानेवारी महिन्यातील पादुका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम निश्चित करणेसाठी अनुक्रमे तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यातील मोठया शहरातील प्रस्तावधारकांना मंगळवार दि.०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे निर्देश श्री. मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री राजतिलक बागवे, प्र. अधिक्षक शताब्दी कक्ष यांना देण्यात आले होते.

त्यानुसार दि.०५/०९/२०१७ चे बैठकीसाठी विश्वस्त मा. श्री. भाऊसोहब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदया मा. उपकार्यकारी अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे उपस्थितीत बैठक पार पडली बैठकीतील चर्चेनुसार छाननी समितीने तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेंबर, डिंसेबर-२०१७ व जानेवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजन होणेसाठी शिफारस केली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन तामिळनाडू,पॉडेचेरी, मध्यप्रदेश व गुजरात माहे-नोव्हेंबर, डिसेंबर-२०१७ व जानेवारी, फ्रेबुवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आली. तसेच दि.०८/०९/२०१७ चे सभेत आयत्यावेळी प्राप्त झालेल्या अर्जावर चर्चा होऊन वेळापत्रक तयार करणेत आले. त्यात

"...श्री साई पालनहार ट्रस्ट, खन्ना मार्केट, लोधी रोड, नवी दिल्ली, यांना दि.२८/१०/२०१७ रोजी पादुका उपलब्ध करून देण्यात याव्यात असे ठरलेले आहे.."

तथापी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेत झालेल्या चर्चेनुसार जानेवारी-२०१८ मध्ये दिल्ली येथे एकत्रित भव्य पादुका दर्शन साहेळा आयोजीत करणेसाठी मा. विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकचौरे सो. यांनी सुचना केलेली होती. परंतू त्यानंतर आता पुन्हा मा. विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकचौरे सो. यांनी दि.१०/१०/२०१७ रोजी श्री साई पालनहार ट्रस्ट, दिल्ली यांनी केलेली विनंती मान्यकरावी अशी सुचना केली आहे.

**प्रस्तावः-** तरी मा. व्यवस्थापन समितीचा निर्णयानुसार व मा. विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकचौरे सो. यांचे सूचनेनूसार श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे प्रचार व प्रसार करणेकामी श्री साई पालनहार ट्रस्ट, खन्ना मार्केट, लोधी रोड, नवी दिल्ली यांचेमार्फत दि. २८ ऑक्टोबर,२०१७ रोजी तालकटोरा स्टेडीयम, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या साईभजन संध्यामध्ये श्रींचे पादुका साई भक्तांचे दर्शनाकरीता उपलब्ध करून देणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई पालनहार ट्रस्ट, खन्ना मार्केट, लोधी रोड, नवी दिल्ली यांचेमार्फत दि. २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी तालकटोरा स्टेडीयम, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या साईभजन संध्यामध्ये साईभक्तांचे दर्शनाकरीता पादुका उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**परंतु सदरहू कार्यक्रमासाठी अत्यल्प कालावधी असून मुळ पादुका पाठविणेसाठी तयारी करणे शक्य नाही, यामुळे श्री साई पालनहार ट्रस्ट, खन्ना मार्केट, लोधी रोड, नवी दिल्ली यांना श्रींच्या चांदिच्या पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात व यासंबंधीची सर्व जबाबदारी समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी पार पाडावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-२०१८ चे कालावधीमध्ये माहे डिसेंबर- २०१७ मध्ये भोपाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या पादुका दर्शन सोहळयाची दिनांक १७ व १८ डिसेंबर, २०१७ ऐवजी दिनांक १६ व १७ डिसेंबर, २०१७ असा बदल करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी

आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना –** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७ ला अनुसरून प्राथमिक चर्चा करणेकामी दि.२९/०८/२०१७ रोजी शिर्डी येथील संस्थानचे लेडींबागेतील “०” नंबर सभागृह येथे मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे मा.श्री. बिपीनदादा कोल्हे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. सदरहू बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या पादुका दर्शन प्रस्तावांबाबत ज्या आयोजकांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा भारतातील आयोजकांना दि.२२/०९/२०१७ व विदेशातील आयोजकांना दि.२३/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे बोलविण्यात यावे तसेच त्यावेळेस विश्वस्त मा.श्री. जयकर सो. व मा. श्री.भोसले सो. यांनाही निमंत्रीत करण्यात यावे असे ठरलेले होते.

त्यानंतर दि.०१/०९/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी (विश्वस्त मा.श्री. वाकचौरे सो. व मा. श्री. कोल्हे सो. यांचेशी दूरध्वनीद्वारे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने) नोव्हेबर-डिंसेबर-जानेवारी महिन्यातील पादुका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम निश्चित करणेसाठी अनुक्रमे तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यातील मोठया शहरातील प्रस्तावधारकांना मंगळवार दि.०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे निर्देश श्री. मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री राजतिलक बागवे, प्र. अधिक्षक शताब्दी कक्ष यांना देण्यात आले होते.

त्यानुसार दि.०५/०९/२०१७ चे बैठकीसाठी विश्वस्त मा. श्री. भाऊसोहब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदया मा. उपकार्यकारी अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे उपस्थित बैठक पार पडली बैठकीतील चर्चेनुसार छाननी समिती यांनी तामिळनाडू मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेबर, डिंसेबर-२०१७ व जानेवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजन होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करणेसाठी शिफारस करण्यात आलेली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन तामिळनाडू, पॉडेचेरी, मध्यप्रदेश व गुजरात माहे-नोव्हेबर, डिसेंबर-२०१७ व जानेवारी, फ्रेबुवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आली याकामी प्रस्तावित केलीली ठिकाणी व आजचे सभेत प्राप्त झालेल्या आर्जांवरही चर्चा होऊन वेळापत्रक तयार करण्यात आलेले असून मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार,

“...*शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाल येथे दि.१७ व १८ डिसेंबर२०१७ रोजी पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे..*”

**प्रस्तावः-** उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमार्फत भोपाळ येथे दि.१७ व १८ डिसेंबर२०१७ रोजी श्रींचे पादुका दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येणार असलयाचे यापूर्वी त्यांना कळविण्यात आलेले आहे. तथापी शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांनी कळविलेले आहे की, भोपाळ व परिसरातील साईभक्तांना श्रींचे पादुकाचा जास्तीत जास्त दर्शनाचा लाभ मिळावा याकरीता वार शनिवार व रविवार दि.१६ व १७ डिसेंबर, २०१७ रोजी श्रींचे पादुका उपलब्ध करून देण्याची पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

तरी शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांचे विनंती पत्राचे अनुषंगाने वारशनिवार व रविवार दि.१६ व १७ डिसेंबर, २०१७ रोजी भोपाळ येथे श्रींचे पादुका साई भक्तांचे दर्शनाकरीता उपलब्ध करून देणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाळ यांचे विनंती नुसार भोपाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या पादुका दर्शन सोहळयाच्या दिनांकामध्ये १७ व १८ डिसेंबर, २०१७ ऐवजी दिनांक १६ व १७ डिसेंबर, २०१७ असा बदल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत नागपूर येथे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेसंबंधीश्री साईबाबा सेवा मंडळ, नागपुर यांचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७ ला अनुसरून प्राथमिक चर्चा करणेकामी दि.२९/०८/२०१७ रोजी शिर्डी येथील संस्थानचे लेडींबागेतील “०” नंबर सभागृह येथे मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे मा.श्री. बिपीनदादा कोल्हे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. सदरहू बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या पादुका दर्शन प्रस्तावांबाबत ज्या आयोजकांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा भारतातील आयोजकांना दि.२२/०९/२०१७ व विदेशातील आयोजकांना दि.२३/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे बोलविण्यात यावे तसेच त्यावेळेस विश्वस्त मा.श्री. जयकर सो. व मा. श्री.भोसले सो. यांनाही निमंत्रीत करण्यात यावे असे ठरलेले होते.

त्यानंतर दि.०१/०९/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी (विश्वस्त मा.श्री. वाकचौरे सो. व मा. श्री. कोल्हे सो. यांचेशी दूरध्वनीद्वारे पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजनाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने) नोव्हेंबर-डिंसेबर-जानेवारी महिन्यातील पादुका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम निश्चित करणेसाठी अनुक्रमे तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यातील मोठया शहरातील प्रस्तावधारकांना मंगळवार दि.०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे निर्देश श्री. मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री राजतिलक बागवे, प्र. अधिक्षक शताब्दी कक्ष यांना देण्यात आले होते.

त्यानुसार दि.०५/०९/२०१७ चे बैठकीसाठी विश्वस्त मा. श्री. भाऊसोहब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदया मा. उपकार्यकारी अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे उपस्थित बैठक पार पडली बैठकीतील चर्चेनुसार

छाननी समिती यांनी तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेंबर, डिंसेबर-२०१७ व जानेवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजन होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करणेसाठी शिफारस करण्यात आलेली होती.

त्यानुसार तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेंबर, डिंसेबर-२०१७ व जानेवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजन होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. परंतू श्री

सदगुरू साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपुर व प्रतिनिधी यांनी शिर्डी येथील मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत शिर्डी येथे प्रत्यक्ष येऊन प्रस्ताव सादर केला.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन तामिळनाडू, पॉडेचेरी, मध्यप्रदेश व गुजरात माहे-नोव्हेंबर, डिसेंबर-२०१७ व जानेवारी, फ्रेब्रुवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच याकामी प्रस्तावित केलीली ठिकाणी व आजचे सभेत प्राप्त झालेल्या आर्जांवरही चर्चा होऊन मा. व्यस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री सदगुरू साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपुर श्री पंकज महाजन यांना दि२५ जानेवारी, २०१८ ते दि.०६ फेब्रुवारी, २०१८ रोजी नागपुर व विर्दभ येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यता आलेली आहे.

**प्रस्तावः-** उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री सदगुरू साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपुर श्री पंकज महाजन यांना दि२५ जानेवारी, २०१८ ते दि.१० फेब्रुवारी, २०१८ रोजी नागपुर व विर्दभ येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली असून त्यानुसार त्यांना कळविण्यात आलेले आहे.

तथापी श्री साईबाबा सेवा मंडळ, नागपूर श्री साईबाबा मंदिर, येथील श्री. अविनाश शेगांवकर, नागपूर यांनी श्री साई मंदिर हे विर्दभातील ख्यातनाम मंदिर असून, दि.१६/१२/१९७६ रोजी या मंदिराची स्थापना झालेली आहे व त्यावेळी श्रींच्या मुळ पादुका श्री साईबाबा संस्थान यांनी साईभक्तांचे दर्शनार्थ उपलब्ध करून देण्यात आलेल्या असल्याचे त्यांचे पत्रात नमूद केलेले असनू, त्यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने नागपुर येथे श्रींचे पादुका मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

त्यानुसार त्याचे प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने शताब्दी कक्षामार्फत त्यांना पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजनासाठी दि.२६/०८/२०१७ रोजी ई-मेलद्वारे तपशिलवार ( प्रो-फॉर्म) माहिती मागविणेत आलेली होती. परंतू त्यांची माहिती इकडील विभागास प्राप्त झालेली नाही.

तरी

१) श्री साईबाबा सेवा मंडळ नागपूर यांचे श्री साईबाबा मंदिरांचे उपरोक्तप्रस्तावाचे अनुषंगाने नागपूर व श्री सदगुरू साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपुर व श्री पंकज महाजन यांचे संयुक्त विद्यामाने नागपुर येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस

**अथवा**

श्री साईबाबा सेवा मंडळ यांचे श्री साईबाबा मंदिर नागपूर येथे स्वंत्रपणे श्रींचे पादुका भाविकांचे दर्शनास उपलब्ध करून देणेकामी उचित निर्णय होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८५६ **श्री सदगुरू साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपुर यांना दि.२५ जानेवारी, २०१८ ते दि.०६ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीमध्ये नागपुर व विदर्भ येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देण्यास यापुर्वीच मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु आता, श्री साईबाबा सेवा मंडळ, नागपूर यांनीही याच कालावधीमध्ये श्रींच्या पादुकांचीमागणी केलेली असल्यामुळे दोन्हीही संस्थांना सभेसमोर बोलविणेत येऊन, दोन्ही संस्थांनीएकत्रित येऊन, नागपुर येथे श्रींच्या पादुकांचादर्शन सोहळा आयोजित करणेबाबत सभेने त्यांना कळविले. परंतु श्री साईबाबा सेवा मंडळ, नागपूर यांनी स्वतंत्र पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेची इच्छा प्रदर्शित केली व त्यासाठी श्रींच्या मुळ पादुकांची सभेसमोर मागणी केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा सेवा मंडळ, नागपूर यांना दि.१८ जानेवारी, २०१८ रोजी एक दिवसाच्या पादुका दर्शन सोहळयासाठी श्रींच्या मुळ पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदरहू पादुका व संस्थान प्रतिनिधी यांचा शिर्डी ते नागपुर व नागपुर ते शिर्डी जाणे-येणेसाठी येणारा प्रवासखर्च (बस/ विमान) तसेच इतर अनुषंगिक सर्व खर्च श्री साईबाबा सेवा मंडळ, नागपूर यांनी करावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.०८ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत माहे मार्च-एप्रिल, २०१८ या कालावधीत ऑस्ट्रेलिया येथील ऑस्ट्रेलिया मिशन ऑफ साई (ओम साई) इनकार्पोरेटेड यांनी प्रस्तावित केलेल्या कार्यक्रमाच्या तपशिलास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

१)  अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२)  अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**३)**  अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४)  अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

मा. व्यवस्थापन समिती दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७

“...समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे, मा. श्री बिपीनदादा कोल्हे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत येऊन, या समितीने देशभरातील विविध राज्यांमध्ये साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची ८ दिवसांमध्ये छाननी करुन अंतिम करावे. तसेच परदेशातील अर्जाची छाननी करतेवेळी समिती सदस्य मा. श्री प्रताप भोसले यांचे मागदर्शन घेण्यात यावे. पादुका दर्शन सोहळयासाठी देशातील काही ठराविक ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व परदेशात चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात, असे ठरले.

माहे आक्टोबर २०१७ या महिन्यात साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचा पादुका दर्शन सोहळयाची सुरुवात दि. १३ व १४ आक्टोबर २०१७ रोजी पणजी (गोवा) येथून करणेत यावी. त्यासाठी गोवा प्रदेश श्री साईदर्शन पादुका सोहळा समिती, पणजी यांचे मुळ पादुका दर्शन प्रस्तावास मान्यता देण्यात आली. उपरोक्त छाननी समितीने अंतिम केलेल्या प्रस्तावांच्या ठिकाणी समिती सदस्य व संस्थानचे अधिकारी यांनी उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष भेटी देऊन कार्यक्रमाच्या पूर्व तयारीचा व नियोजनाचा आढावा घ्यावा. पादुका दर्शन सोहळयाचे पूर्व तयारी व पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी येणा-या अनुषंगीक सर्व खर्चास / प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली.

राज्यांत, परराज्यांत, परदेशात पादुका दर्शन पादुकासाठी प्रस्तावित केल्यानुसर आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी पाठविण्यात यावेत. प्रत्येक पादुका दर्शन सोहळयासाठी सोबत जावयाचे कर्मचा-यांचे विभाग, संख्या व नामनिर्देश याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. यासाठी येणा-या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली. विविध ठिकाणी आयोजित करावयाच्या पादुका दर्शन सोहळयासाठी प्रत्येक वेळी उपलब्धतेप्रमाणे सर्व विश्वस्त व किमान २ अधिकारी यांना उपस्थित राहण्यास व त्यासाठी येणा-या अनुषंगीक सर्व खर्चास / प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली. उपस्थित राहणा-या अधिका-यांचे बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नामनिर्देशित करणे आवश्यक राहील असे ठरले.

आवश्कतेनुसार तातडीचे प्रसंगी देशातंर्गत विमान प्रवासाने पादुका घेऊन जाणे-येणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. याबाबत वेळोवेळी प्रसंगानुरुप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा असे ठरले व त्यासाठीच्या अनुषंगीक सर्व खर्चास मान्यता देण्यात आली. पादुका दर्शन सोहळयासाठी प्रवास व इतर ठिकाणी सुरक्षेच्या कारणास्तव हत्यारी पोलीस बंदोबस्त घेणेस व त्यासाठीच्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली ”

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येणार आहे.

ऑस्टेलिया मिशन ऑफ साई (ओम साई) इनकार्पोरेटेड चे अध्यक्ष श्री. अनिल कुमार कोलानूकोंडा यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात ऑस्टेलियामधील मेलबर्न, सिडनी, ॲडलेड, पर्थ या विविध शहरामध्ये दि. २८ मार्च, २०१८ ते दि.०८ एप्रिल, २०१८ पर्यंत श्री साईबाबा पादुका दर्शन साहेळाचे आयोजन करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**प्रस्ताव:-** ऑस्टेलिया मिशन ऑफ साई (ओम साई) इनकार्पोरेटेड चे अध्यक्ष श्री. अनिल कुमार कोलानूकोंडा यांनी खालीलप्रमाणे कार्यक्रमांचे वेळापत्रक कळविलेले आहे.

१) दि.२८ किंवा २९ मार्च २०१८ रोजी मुंबई येथून मेलबर्नकडे प्रयाण.

२) दि. ३० मार्च, २०१८ रोजी सकाळी मेलबर्न कडून ॲडीलेडकडे प्रयाण.

३) दि.३० मार्च, २०१८ रोजी दुपारी ॲडीलेड येथे साईभजन संध्या.

४) दि. ३१ मार्च, २०१८ ते दि.०१ एप्रिल, २०१८ रोजी दोन दिवसीय मेलबर्न येथे साईभजन संध्यासह विविध कार्यक्रमासह श्रींचे पादुकासह श्री साईबाबांचे मान्यवरांसह व्हीक्टोरिअन पार्लेमेन्ट मधील मा. मंत्रीमहोदय यांची भेट व नंतर सिडीनीकडे प्रयाण

५) दि.०४ एप्रिल, २०१८ रोजी श्रींचे पादुकांची मिरवणूक व पालखी तसेच साईभजन संध्या व विविध कार्यक्रम व फेडरल स्थानिक मंत्री यांचे हस्तेश्रींचे पादुकांचे स्वागत व सन्मान.

६) दि.०५ एप्रिल, २०१८ रोजी परत सिडीनी विश्राम व संध्याकाळी मेलबर्न कडे प्रयाण.

७) दि.०६ एप्रिल, २०१८ रोजी मेलबर्न विश्राम व रात्रौ पर्थकडे प्रयाण.

८) दि.०७ एप्रिल, २०१८ सायंकाळी साई भजन संध्या.

९) दि.०८ एप्रिल, २०१८ पर्थ येथून मुंबई कडे प्रयाण.

तसेच ओम साई संस्थान यांचेमार्फत भारतातून ते ऑस्ट्रेलियात विमानाद्वारे तसेच स्थानिक वाहतूक यासाठी लागाणारा खर्च निवास, भोजन व्यवस्थेसह VISA एंजटची व्यवस्था त्याचेमार्फत करण्यात येणार असल्याचे त्यांनी पत्रात मध्ये नमूद केलेले असून, श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त व्यवस्थे यांचे मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकाचे प्रकाशन करण्यात येणार असल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

तरी ऑस्टेलिया मिशन ऑफ साई (ओम साई) इनकार्पोरेटेड चे अध्यक्ष श्री. अनिल कुमार कोलानूकोंडा यांचे उपरोक्त प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने माहे-मार्च-२०१८ मध्ये ऑस्ट्रेलिया मधील विविध शहरांमध्ये श्रींचे चांदीच्या पादुका साईभक्तांचे दर्शनार्थ उपलब्ध करून देणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८५७ **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा सुरु असताना, न्युझीलंड येथील साईमंदिर ट्रस्टनेही पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी श्रींच्या पादुकांचीमागणी केली असल्याची माहिती सभेस देण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त ऑस्टेलिया व न्युझीलंड येथे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले अर्ज, पादुका दर्शन सोहळयाच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर सादर करावा व या समितीने पादुका दर्शन सोहळयाची रुपरेषा ठरवून, त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, समाधी शताब्दी कक्ष)

---

विषय नं.०९ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत माहे जुलै- २०१८ मध्ये युनायटेड किंगडम मध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत शितल शिर्डी साईबाबा मंदिर असो. ऑफ लंडन यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७-**

"समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे, मा. श्री बिपीनदादा कोल्हे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत येऊन, या समितीने देशभरातील विविध राज्यांमध्ये साई पादुका दर्शन सोहळा

आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची ८ दिवसांमध्ये छाननी करुन अंतिम करावे. तसेच परदेशातील अर्जाची छाननी करतेवेळी समिती सदस्य मा. श्री प्रताप भोसले यांचे मागदर्शन घेण्यात यावे. पादुका दर्शन सोहळयासाठी देशातील काही ठराविक ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व परदेशात चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात, असे ठरले.

माहे आक्टोबर २०१७ या महिन्यात साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचा पादुका दर्शन सोहळयाची सुरुवात दि. १३ व १४ आक्टोबर २०१७ रोजी पणजी (गोवा) येथून करणेत यावी. त्यासाठी गोवा प्रदेश श्री साईदर्शन पादुका सोहळा समिती, पणजी यांचे मुळ पादुका दर्शन प्रस्तावास मान्यता देण्यात आली. उपरोक्त छाननी समितीने अंतिम केलेल्या प्रस्तावांच्या ठिकाणी समिती सदस्य व संस्थानचे अंधिकारी यांनी उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष भेटी देऊन कार्यक्रमाच्या पूर्व तयारीचा व नियोजनाचा आढावा घ्यावा. पादुका दर्शन सोहळयाचे पूर्व तयारी व पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी येणा-या अनुषंगीक सर्व खर्चास / प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली.

राज्यांत, परराज्यांत, परदेशात पादुका दर्शन पादुकासाठी प्रस्तावित केल्यानुसर आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी पाठविण्यात यावेत. प्रत्येक पादुका दर्शन सोहळयासाठी सोबत जावयाचे कर्मचा-यांचे विभाग, संख्या व नामनिर्देश याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. यासाठी येणा-या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली.

विविध ठिकाणी आयोजित करावयाच्या पादुका दर्शन सोहळयासाठी प्रत्येक वेळी उपलब्धतेप्रमाणे सर्व विश्वस्त व किमान २ अधिकारी यांना उपस्थित राहण्यास व त्यासाठी येणा-या अनुषंगीक सर्व खर्चास / प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली. उपस्थित राहणा-या अधिका-यांचे बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नामनिर्देशित करणे आवश्यक राहील असे ठरले.

आवश्कतेनुसार तातडीचे प्रसंगी देशातंर्गत विमान प्रवासाने पादुका घेऊन जाणे-येणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. याबाबत वेळोवेळी प्रसंगानुरुप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा असे ठरले व त्यासाठीच्या अनुषंगीक सर्व खर्चास मान्यता देण्यात आली. पादुका दर्शन सोहळयासाठी प्रवास व इतर ठिकाणी सुरक्षेच्या कारणास्तव हत्यारी पोलीस बंदोबस्त घेणेस व त्यासाठीच्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली ”

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येणार आहे. शितल शिर्डी साईबाबा मंदिर असो, ऑफ लंडन यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात युनायटेड किंगडम येथील लंडन व लिसेस्टर या शहरांमध्ये दि. २८ जुलै, २०१८ ते दि.२९ जुलै, २०१८ पर्यंत श्री साईबाबा पादुका दर्शन साहेळाचे आयोजन करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला असून, यापूर्वी त्यांचेमार्फत व साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत साईभजन संध्या सोहळयाचे सन-२०१० मध्ये आयोजनाचा अनुभव असल्याचे पत्रात नमूद केलेले आहे.

**प्रस्तावः-** शितल शिर्डी साईबाबा मंदिर असो, ऑफ लंडन यांनी युनायटेड किंगडम येथील लंडन शहरात दि. २८ जुलै, २०१८ रोजी व दि.२९ जुलै, २०१८ रोजी लिसेस्टर या शहरामध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजन करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला असून, त्यामध्ये विमानप्रवास, निवास, भोजन, इत्यादी अनुषंगिक व्यवस्था त्यांचेमार्फत करण्यात येणार असल्याचे नमूद केलेले आहे.

तरी शितल शिर्डी साईबाबा मंदिर असो, ऑफ लंडन यांचे उपरोक्त प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने माहे-जुलै-२०१८ मध्ये लंडन मधील शहरांमध्ये श्रींचे चांदीच्या पादुका साईभक्तांचे दर्शनार्थ उपलब्ध करून देणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त शितल शिर्डी साईबाबा मंदिर असो, ऑफ लंडन यांचा पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेला अर्ज, पादुका दर्शन सोहळयाच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर सादर करावा व या समितीने पादुका दर्शन सोहळयाची रुपरेषा ठरवून, त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, समाधी शताब्दी कक्ष)

---

**विषय नं.१०** **श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना प्रायोगिक तत्वावर मुंबई-शिर्डी आणि शिर्डी दर्शन हेलिकॉप्टर सेवा सुरु करणेसाठी परवानगी देणे.**

**निर्णय क्र.८५९** श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित रहाणेबाबत कळविणेत येऊनही, ते सभेसमोर उपस्थित नव्हते, यावरुन ते मुंबई-शिर्डी आणि शिर्डी दर्शन हेलिकॉप्टर सेवा सुरु करणेस इच्छुक नाहीत, असे दिसून येते. सबब उपरोक्त प्रस्ताव रद्द करणेत आला.

(कार्यवाही- जनसंपर्क विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **श्री.सुधीर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांना संस्थान हेलिपॅड वापरास परवानगी देणे.**

**निर्णय क्र.८६०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- जनसंपर्क विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **शासन निर्णयानुसार संस्थानकडे देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/ जमा असलेल्या सोने-चांदीच्या वस्तु वितळवून, उपलब्ध होणारे शुध्द सोने-चांदीपासून श्री साई प्रतिमेची नाणी बनविणेसंबंधी मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची उपसमिती नेमणे, अधिकारी व कर्मचारी यांचा कार्यगट तयार करणे व सदर कामाचे वेळापत्रक निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** **(अ)** संस्थानकडे देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/ जमा असलेल्या सोने-चांदीच्या वस्तू वितळवून, उपलब्ध होणारे शुध्द सोने-चांदीपासून साई प्रतिमेची नाणी/ पादुका तयार करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे **दिनांक ३१ ऑगष्ट, २०१६** रोजीचे सभेत **निर्णय क्रमांक ५९९** खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे :

" .. .. स्ट्राँगरुममध्ये जागेअभावी निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थानकडे देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/ जमा असलेल्या सोने-चांदीच्या वस्तूंपैकी कलाकुसरीचे नक्षीकाम असलेल्या सोन्या/ चांदीच्या वस्तूंची लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले व उर्वरित सोने-चांदीच्या वस्तुंबाबत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. "

तसेच,दरम्यानचे कालावधीत, रक्कम रुपये २५,०००/- मात्र व त्यापुढील रक्कमेची संस्थानला देणगी देणा-या साईभक्तांस श्री साईबाबांच्या पादुकांची चांदीची प्रतिमा प्रसाद रुपाने भेट देणेकामी मा व्यवस्थापन समितीचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ८७२खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे :

" .. .. रक्कम रु. २५,०००/- व त्यापुढील रकमेची/ वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तांस २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच साईचरित्र ग्रंथ व एक थ्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले. यासाठी विहित पध्दतीने चांदीच्या पादुका बनविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यतादेण्यातआली. "

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार तसेच मा. शासनाने दिनांक ३१ मे, २००७ रोजी दिलेल्या स्थायी मान्यतेनुसार, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०२ मार्च, २०१७ रोजीविनंती प्रस्ताव पत्राव्दारे, विषयांकित कामी सन २०१२ ते सन २०१६ या मा.त्रिसदस्यीय समितीचे कार्यकाळात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा. शासनाचे मार्गदर्शन मिळावे म्हणून तसेच सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी विनंती करणेत आलेली होती.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, मा. शासनाकडे सादर करणेत आलेल्या दिनांक ०२ मार्च, २०१७ रोजीचे प्रस्तावास मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१७/३४६/प्र.क्र.४३/का.१६, दिनांक २८ जुलै, २०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

या शासन निर्णयात खालील बाबी नमूद करणेत आलेल्या आहेत–

०१. दिनांक ३१.०३.२०१६अखेर श्री साईबाबांच्या चरणी देणगी रुपाने प्राप्त झालेल्या सोने व चांदीच्या वस्तुंपैकी वितळविणे योग्य असलेले अलंकार/ वस्तू हे विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००५/ ४०७/(६४)/ का.सोळा, दिनांक ३१.०५.२००७ मध्ये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती राबवून शासनाच्या अंगीकृत टांकसाळीमध्ये वितळवून त्यापासून उपलब्ध होणा-या शुध्द सोने-चांदीच्या लगडी / चिपा

यापासून (खाली नमूद केलेल्या वजनाची) श्री साई प्रतिमा असलेली नाणी, पेडंटस् आणि श्री साईच्या पादुका बनविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी या विभागाच्या दिनांक ३१.०५.२००७ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या कार्यपध्दतीची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची दक्षता घेणे आवश्यक राहिल तसेच सदर शासन मान्यतेनुषंगाने कार्यवाही करुन कार्यपूर्तताअहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहिल.

**(क)** दिनांक २८ जुलै, २०१७ रोजीचे शासन निर्णयात नमूद केलेल्या दिनांक ३१ मे, २००७ रोजीचे शासन निर्णयात सोने-चांदी वितळविणेच्या अनुषंगाने कार्यपध्दतीत प्रामुख्यानेखालील बाबी नमूद केलेल्या आहेत -

"‥ ‥ (०५) वस्तू वितळविण्यापूर्वी व्यवस्थापन समितीच्या किमान तीन सदस्यांनी त्याची पाहणी करावी व शासनाच्याअधिका-यांच्या उपस्थितीत मा. सदस्यांसमक्ष त्यांचे वजन करुन त्या सिलबंद करण्यात याव्यात. वजन करण्यापुर्वी त्यावर खडे बसविलेले असल्यास ते काळजीपूर्वक प्रथम काढून विहित कार्यपध्दतीनुसार, त्यांची संख्या / विगतवारी नमुद केलेल्या चिठ्ठीसह, कापडी पिशवीत मोहरबंद (सील) करुन ते वेगळे ठेवून घ्यावेत.

(०६) या वस्तुंची वाहतुक करण्यापुर्वी त्या वस्तुंच्या आवश्यक तो वाहतुक विमा उतरविण्यात यावा व पोलीस संरक्षणाची व्यवस्था करण्यात यावी.

*(०७) या वस्तुंच्या सिलबंद पेटया/ ट्रंक/ पोती वाहनात बंदिस्त जागेत ठेवण्यात याव्यात व ती बंदिस्त जागाही मोहोरबंद (सील) करण्यात यावी.*

*(०८) रिफायनरीत पोहचल्यावर मा. समिती सदस्य व मा. कार्यकारी अधिकारी तसेच शासनाचे अधिकारी यांच्या समक्ष सर्व पेट्या/ ट्रंका/ पोती वाहनातून काढून त्यातील वस्तू बाहेर काढून त्यांचे रिफायनरीत पुनःश्च वजन करण्यात यावे व त्या वितळविण्याकरीता रिफायनरीच्या ताब्यात देण्यात याव्यात.*

*(०९) वितळविल्यानंतर आलेल्या अशुध्द धातूंच्या (Sample after melting) नमुन्यादाखल दोन नमुने (तुकडे) काढून त्यापैकीएक नमुना (तुकडा) ताब्यात घ्यावा, या नमुन्याच्या शुध्दतेची तपासणी इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावी. "*

**(क-१)** यापुर्वी सन २००४ ते २०१२ या कालावधीत वेळोवेळी सोने-चांदी वस्तू वितळविणेकामी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करणेत आलेला आहे -

१. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने विषयांकित कामी स्थानिक मा. व्यवस्थापन समिती सदस्यांची नियुक्ती केलेली होती.

२. विषयांकित कामी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली, लेखाशाखेकडील मुख्यलेखाधिकारी, लेखाधिकारी आणि मुख्य रोखपाल यांचेसह लिपीक टंकलेखक श्रेणीतील ०२ कर्मचा-यांचे मदतीने विषयांकित कामी संपूर्ण कार्यवाही पार पाडलेली होती

३. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी विषयांकित कामी प्रत्यक्ष कार्यस्थळावर ( भारत सरकार टंकसाळ, मुंबई व नॅशनल रिफायनरी, मुंबई येथे) हजर होते.

४. दिनांक ३१.५.२००७ रोजीचे शासन निर्णयात नमूद केलेल्या इतर बाबींबाबत यथोचित दखल घेणेत आलेली होती.

**(क-२) आता**वर नमुद केलेल्या विवेचनानुसार**,** सोने-चांदी वितळविणे व त्या अनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे -

(१) मा. व्यवस्थापन समिती सदस्यांपैकी किमान ०३ सदस्यांची उपसमिती नेमणेबाबत विनंती करणेत येत आहे.

(२) सोने-चांदी वितळविणेकामी पूर्वी माहिती कायद्यांतर्गत झालेला पत्रव्यवहार व बाबी लक्षात घेतां, सदर कार्यवाहीत पारदर्शकता यावी म्हणून विशेषतःसध्या सिलबंद सोने-चांदी ज्यांचे ताब्यात आहेत व तसेच सदरचे सोने-चांदी स्वीकारणेची संपूर्ण जबाबदारी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांचेवर आहे त्यांना या विषयांकित प्रक्रियेतून दूर ठेऊन, सध्या कार्यरत असलेल्या दक्षता पथकाचे धर्तीवरखाली नमूद केलेप्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा गट (कार्यसमिती) नव्याने नेमून त्यांचेकडून विषयांकित काम पूर्ण करुन घेणेस मान्यता असावी.

(३) अशा कार्यसमितीमध्ये खालील अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असावा-

१. मा. व्यवस्थापन समितीने नियुक्त केलेले ०३ सदस्य(किमान)

२. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी.

३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
४. मा. उपजिल्हाधिकारी (०१)
५. मा. उपकार्यकारी अधिकारी
६. प्रशासकीय अधिकारी (०२)
७. लेखाधिकारी (०१)

८. विषयांकित कामकाज पूर्ण करणेसाठी वरिष्ठ लिपीक अथवा लिपीक टंकलेखक (पूर्वी काम केलेले परंतु सध्या लेखाशाखेशीसंबंधित नसलेले (०२ कर्मचारी)

(ड) उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेनुसार, संस्थानकडे दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर देणगी रुपाने जमा झालेले व वितळविणे योग्य असलेले सोने-चांदी वितळविणेची प्रक्रिया पूर्ण करुन, उपलब्ध होणारे शुध्द सोने-चांदीपासून आवश्यकतेनुसार नाणी/ पेडंटस् बनविणेसाठी करावयाचे (परिच्छेद क-२ नुसार) कार्यवाहीसाठी व तसेच याकामी प्रत्यक्ष कामकाजाचे वेळापत्रक निश्चित करणेसाठी उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ/ निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर देणगी रुपाने जमा झालेले व वितळविणे योग्य असलेले सोने-चांदी शासन नियमावलीस अनुसरुन वितळविणेस मान्यता देण्यात आली. याकामी व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सदस्य मा.ॲड्मोहन जयकर यांची उपरोक्त कार्यसमितीसाठी नावे ठरविण्यात आली. याचबरोबर इतर अनुभवी अधिकारी/ कर्मचाऱ्यांची प्रशासनाने नियुक्ती करावी व प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच या वितळविण्यायोग्य सोने-चांदीची Marine Inland Transit Insurance Policy काढून घेण्यात यावी, अशी सुचना समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी केली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली लेखाशाखा विभागाने सदरहू Insurance बाबतीत पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१३** **संस्थान कर्मचाऱ्यांसाठीच्या "गृहकर्ज व्याज सवलत योजना" नियमावलीस मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.८६२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१४** **शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत मंजुरझालेल्या पाणी पुरवठा योजनेसाठी संस्थानकडून दिलेली बिनव्याजी कर्ज रक्कम रु.६.५८६१ कोटी मात्र रक्कम माफ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद:-** "श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्येसुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्यासोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे".

**प्रास्तविक:-** शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत रक्कम रु. ३६.६५ कोटी रकमेची पाणीपुरवठा योजना मंजूर आहे. सदर योजनेचे काम आज वेगाने सुरू आहे. या योजनेसाठी केंद्र सरकार द्वारे एकूण प्रकल्प किंमतीच्या ५०% , राज्य शासनाकडून २५%, नगरपंचायत हिस्सा २५% अशा आकृतीबंधास प्रशासकीय मान्यता आहे.

शिर्डी नगरपंचायतीची २५% रक्कम म्हणजेच रक्कम रु.९.६२ कोटी उभारणीची आर्थिक स्थिती नसल्याने एकूण नगरपंचायत हिस्सा रु. ९.१६२ कोटी पैकी १४ व्या वित्त आयोगामार्फत शिर्डी नगरपंचायतीस २५७.७९ लक्ष प्राप्त झालेले आहेत. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून उर्वरीत रक्कम रु. ६.५८ कोटी देणेबाबत प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत द्वारे देण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर केलेल्या प्रस्तावास शासन निर्णय क्रं सासंवि-२०१७/५५५/प्र. क्र.५७/का. १६, दि. ३१.०३.२०१७ अन्वये ६.५८६१ कोटी इतके कर्ज स्वरुपात दिलेले आहे. व सदर कर्जाची परतफेड नगरपंचायतीला प्राप्त होणा-या १४ व्या वित्त आयोगाचे अनुदानातुन करणेबाबत ठरलेले आहे.

शिर्डी नगरपंचायतीला १४ वा वित्त आयोग हा शासनाकडून निधी उपलब्ध होण्याचा महत्वाचा स्त्रोत असून, यातील ५०% रक्कम घनकचरा व्यवस्थापन व ५०% इतर कामासांठी वापरणे बंधनकारक आहे म्हणजेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी अमृत योजनेसाठी नगरपंचायतला दिलेली रक्कम १४ व्या वित्त आयोगातील इतर ५०% प्राप्त अनुदानातुन परत करावी लागेल.

श्री साईबाबा शताब्दी महोत्सव वर्षातील साईबाबा संस्थान सोबतच शिर्डी नगरपंचायतला देखील शहारामध्ये अनेक महत्वाची विकास कामे करावयाची आहे. याशिवाय पाणीपुरवठा विभाग, स्ट्रीट लाईट विभाग यांचे विज बिल तसेच पाटबंधारे विभागाची बिगरसिंचन पाणीपट्टी देखील या १४ व्या वित्त आयोगाचे इतर ५०% रकमेतुन अदा करणे क्रमप्राप्त ठरते. या शिवाय इतर योजनांमध्ये देखील नगरपंचायतला स्वहिस्सा १४ व्या वित्त आयोगातूनच भरावा लागेल. सबब १४ वा वित्त आयोग निधी नगरपंचायतीला या कामांसाठी शिल्लक राहणे आवश्यक आहे.

यास्तव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून शिर्डी नगरपंचायतीला अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेतील नगरपंचायत हिस्सा भरणेसाठी बिनव्याजी कर्जाऊ स्वरुपात दिलेली रक्कम रु. ६.५८६१ कोटी पुर्णपणे माफ व्हावेत, जेणेकरून १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त होणारा निधी शिर्डी नगरपंचायतला इतर कामे करण्यासाठी वापरता येईल. असे शिर्डी नगरपंचायतीने कळविले आहे.

**<u>शिर्डी नगरपंचायतीची मागणी</u>:-** शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेसाठी श्री साईबाबा संस्थान कडून देण्यात आलेले बिनव्याजी कर्ज रक्कम रु. ६.५८६१ माफ करणे बाबत विनंती केलेली आहे.

**<u>मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय</u>:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र. १५६, अन्वये असे ठरले की, शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत नगरपंचयातीच्या २५% हिस्सा रक्कम रु. ९.१६२ कोटी पैकी रु. २.५७५९ कोटी वजा जाता उर्वरीत रक्कम रु. ६.५८७ कोटी संस्थानकडून विहीत पद्धतीने देण्यात यावे. परंतु भविष्यात शिर्डी नगरपंचायतीला १४ व्या वित्त आयोगातून अनुदान प्राप्त झाल्यास संस्थानने दिलेले अनुदान शिर्डी नगरपंचायतीकडून परत घेण्यात यावे. या अटीवर मान्यता देण्यात आली.

तसेच जुना पिंपळवाडी रस्ता हा नगरपंचायतीच्या मालकीचा असून तो सध्या तात्पुरत्या स्वरुपात दर्शनरांग म्हणून वापरणेस नगरपंचायतीने परवानगी दिलेली आहे. सदर रस्ता कायमस्वरुपी संस्थानकडे वर्ग करण्याच्या अटीवर प्रस्तावित अनुदान शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करणेत यावे असे ठरले.

**<u>मा.छाननी समितीचा निर्णय</u>:-** सदरचा विषय दि. २७.०३.२०१७ चे मा. छाननी समितीचे समोर सादर केला असता, सखोल चर्चा करण्यात आली. त्यात महाराष्ट्र शासनाकडून नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेतंर्गत मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेसाठी लोकवर्गणी भरण्यासाठी रु. ६.५८७ कोटी मात्र रक्कम संस्थानकडून कर्जाऊ म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली. परंतु संस्थानतर्फे दिली जाणारी रक्कम ही सध्या बिनव्याजी कर्ज स्वरुपात देण्यात येत आहे. शासनाकडून १४ व्या वित्त आयोगातून नगरपंचायतीला वेळोवेळी प्राप्त होणा-या रकमेतून संस्थानला देय असलेल्या कर्जाच्या रकमेची परतफेड नगरपंचायतीकडून करणेत यावी.

तरी मा. व्यवस्थापन समिती व छाननी समिती यांचे निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रु. ६.५८७ कोटी मात्र रक्कम संस्थानकडून बिनव्याजी कर्ज म्हणून देण्यास मान्यता मिळणेसाठी. जा. न. एसएसएस/ वशी-लेखा-अनुदान/६५२९/२०१७/ दि. ३० मार्च २०१७ रोजी विधी व न्याय विभाग यांना प्रस्ताव सादर केला असता महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासवि -१०१७/५५५/प्र. क्र. ५७/ १६ दि. ३१.०३.२०१७ नुसार खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-** श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती आणि श्री साईबाबा संस्थान छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेसाठी लोकवर्गणी भरण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याकडून रु.६.५८६१ कोटी इतकी रक्कम शिर्डी नगरपंचायतीला कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

१) राज्य शासनाद्वारे १४ व्या वित्त आयोगातून शिर्डी नगरपंचायतीला वेळोवेळी प्राप्त होणा-या रकमेतून श्री साईबाबा संस्थानला देय असलेल्या सदर रु.६.५८६१ इतक्या कर्जाच्या रकमेची परतफेड शिर्डी नगरपंचायतीकडून करण्यात येईल. असा शासन निर्णय झाला आहे.

२) उपरोक्त प्रमाणे मा. व्यवस्थापन समिती निर्णय, छाननी समिती निर्णय व शासन निर्णय झालेले आहेत. मात्र आता शिर्डी नगरपंचायतीस रक्कम अदा केलेनंतर त्यांनी सदरची रक्कम ही अनुदान स्वरुपात मिळावी अशी विनंती केलेली आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-**

१) नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक अमृत २०१७/प्र. क्र. २७/नावि-३३ मंबई दि. ०८.२.२०१७ नुसार केंद शासन पुरस्कृत अमृत अभियानाचा शिर्डी शहराच्या रु. ३६.६५ कोटीच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| नागरी स्थानिक स्वराज संस्थेचे नाव | योजनेची एकूण किंमत | केंद शासना मार्फत अनुज्ञेय अनुदान (५०%) | राज्य शासना मार्फत अनुज्ञेय अनुदान (२५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (२५%) |
|---|---|---|---|---|
| शिर्डी नगरपंचायत | रु. ३६.६५ कोटी | रु. १८.३२५ कोटी | रु. ९.१६२ कोटी | रु. ९.१६३ कोटी |

२) दि. ०८.०२.२०१७ रोजीच्या नगर विकास विभागाचे शासन निर्णयानुसार नगरपंचायतीने स्वहिश्याचा निधी उभारतांना स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांना प्राप्त होणा-या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीशी एककेंद्राभिमुख करणे आवश्यक राहील असे नमूद केले आहे.

३) मात्र शिर्डी नगरपंचायतीने १४ व्या वित्त आयोगाचे निधीतून शहरातील महत्वाची विकास कामे करावयाची असल्याने जर संस्थानने अमृत योजनेच्या कामासाठी दिलेला बिनव्याजी कर्जाऊ रु. ६.५८६१ कोटी निधी संस्थानला परत केल्यास नगरपंचायतीला विकास कामांना निधी शिल्लक राहणार नसल्याने सदर रक्कम अनुदान स्वरुपात मागणी केलेली आहे.

४) श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

५) मा. व्यवस्थापन समितीने प्रस्ताव मान्य केल्यास मा. छाननी समिती व शासनास मान्यतेसाठी सादर करावे लागेल.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायतीस केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या पाणी पुरवठा योजनेसाठी संस्थानकडून दिलेली रु.६.५८६१ कोटी मात्र बिनव्याजी कर्ज रक्कम माफ करणेस मान्यता देण्यात आली. परंतु याकामी छाननी समितीचे पुर्व परवानगीने शासन मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१५** **श्री.वसंतराव नाईक, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ यांना रक्तदान शिबीराकरीता वातानुकुलित सुसज्ज वाहन देणेसाठी मा.राज्यमंत्री, सा.प्र.वि. यांच्या विनंतीबाबत.**

**विषय नं.१६** **नियोजीत शैक्षणिक संकुलाच्या बांधकामासाठी जागा निश्चित करणे व संबंधीत आर्किटेक्टचे सादरीकरण.**

**विषय नं.१७** **मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर निर्णय घेणेबाबत.**

**विषय नं.१८** **मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेबाबत.**

**निर्णय क्र.८६४** उपरोक्त विषय नं.१५ ते १८ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.१९** **सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ यावर्षी आदा केलेल्या सानुग्रह अनुदानाच्या रकमेस अंतिम मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** उपरोक्त संदर्भ क्र.५ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने सानुग्रह अनुदान संदर्भात दर दिवाळी सणाच्या वेळी कामगारांना सानुग्रह संदर्भात प्रश्न निर्माण होत होता. परंतू संस्थान व्यवस्थापनाने कोर्ट मंजूरीसाठी ॲप्लीकेशन दाखल केलेले होते. या विषयी औरंगाबाद हायकोर्टने निर्देश दिलेले असून या संदर्भात लवकरात लवकर व्यवस्थापन समितीने कार्यवाही करण्यात यावी. या कालावधीत सानुग्रह अनुदानाची ज्या कमगारांची रक्कम संस्थान व्यवस्थापनाकडे जमा असलेली रक्कम कामगारांना अदा करण्यात यावी. यापुढे सेवानिवृत्त होणा-या कामगारांची रक्कम कपात करण्यात येऊ नये, अशी विनंती केलेली आहे.

**ब) पुर्वपिठीका:-** सन १९७७ पासून मा.व्यवस्थापन मंडळ/ समितीचे निर्णयानुसार तसेच मा.न्यायालयाचे निर्णयानुसार संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांनी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत आले आहे. त्यानंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी

सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला. सदर अधिनियमानुसार गठीत केलेल्या मा.व्यवस्थापन समितीनेही सन २००४ ते २०११ पर्यंत दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच दिनांक २९ मार्च, २०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व नियंत्रणाचे कामकाज मा.त्रिसदस्य समितीचे नियंत्रणाखाली आले. सदर समितीचे कार्यकाळात संस्थान कर्मचा-यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान देणेत आले.

(०१) मा.त्रिसदस्य समितीने सन २०१२ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७३ अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १२६९४/२०१२ चे अनुषंगाने, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थान सेवकांना रक्कम रुपये ४,८४,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस मान्यता दिली.

मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील जनहित याचिका १८/२०११ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर न्यायालयाने दि.१६ ऑक्टोबर, २०१२ रोजी केलेल्या आदेशात 6 (c) shall not take any major financial decision of whatsoever nature असे नमूद करणेत आले. त्यामुळे मा.त्रिसदस्य समिती रु.१० लाख पर्यंतच निर्णय घेत होती. त्यापुढील रक्कमेचे विषय मा.मुंबई उच्च न्यायालयात मान्यतेसाठी सादर करणेत येत होते.

(०२) सन २०१३ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत मा.त्रिसदस्य समितीने दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७० अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ चे अनुषंगाने, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार संस्थान कर्मचा-यांना रक्कम रुपये ५,६०,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस सशर्त (provisionally) मान्यता दिलेली आहे.

(०३) त्यानंतर सन-२०१४ करीता रक्कम रुपये ६,५०,००,०००/- मात्र संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर निर्णयक्र.६९६ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"संस्थानमधील कायम कर्मचा-यांना सन-२०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजूरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पीआयएल १८/२०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.

त्यामुळे २०१४ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी मागील वर्षीच्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह देण्याविषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही", असे ठरले.

सदर निर्णयावर श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे संस्थान कर्मचा-यांना दिपावलीसाठी सानुग्रह अनुदान मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१७/२०१४ व सिव्हील ॲप्लीकेशन ९४३७/२०१४ दाखल केले. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१४ रोजी सानुग्रह अनुदान देणेस सशर्त (provisionally) मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून संस्थान कर्मचा-यांचे संम्मती पत्र घेऊन सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(०४) सन-२०१५ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना रक्कम रुपये ६,७५,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख) मात्र सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत मा.त्रिसदस्य समिती

दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेपुढे विषय सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.३२३ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"प्रस्तावातील अ.नं.०२ वगळता अ.नं.०१ व ०३ मध्ये नमुद केलेल्या पात्र कर्मचा-यांना सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पीआयएल १८/२०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये, सन २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.

त्यामुळे सन -२०१५ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी सन २०१३ व २०१४ च्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह अनुदान देण्या विषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले."

सदर निर्णयावर श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे संस्थान कर्मचा-यांना दिपावलीसाठी सानुग्रह अनुदान मिळणेकामी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१३३६६/२०१५ दाखल केला. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु.६,७५,००,०००/- सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस सशर्त (provisionally) मान्यता दिलेली आहे.

वरीलप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी संस्थान कर्मचा-यांना सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ सानुग्रह अनुदान अदा करणेस सशर्त (provisionally) मान्यता दिलेली आहे.

**क)** आता, महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८ जुलै, २०१६ अन्वये संस्थानचे प्रशासकीय कामकाज पहाणेकामी १२ सदस्यांची समिती गठीत केली. सदर समितीचे कामकाज सुरू झाल्यानंतर मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे घेणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी दाखल केलेले यापुर्वीचे सर्व अर्ज मागे (Withdraw) करणेस मान्यता दिली. समितीचे निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाने दि.०८/०९/२०१६ चे आदेशान्वये सानुग्रह अनुदानासाठी दाखल केलेला अर्ज क्र.१३२८४/२०१३ परत घेतलेला आहे.

त्यानुसार यापुर्वीचे सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या प्रतिवर्षी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे सशर्त मान्यतेस अधिन राहुन वाटप करणेत आलेल्या सानुग्रह अनुदानाबाबत तसेच सन २०१५-२०१६ चे सानुग्रह अनुदानास मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.७४८ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

समितीने सदरचे प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली. परंतु विधी व न्याय विभागाचे सासंवि-२०११/५३८/ प्र.क्र.६९ पुनर्बांधणी-१२/का.१६, दि.२३/०१/२०१३ रोजीचे पत्रास अनुसरून, सदरहू सानुग्रह अनुदान संस्थान नियमानुसार पात्र ठरणा-या स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना अदा करणेपुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७४८ व महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि १०१६/१४३२/ प्र.क्र.१८२/कार्या-१६ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९ ऑक्टोबर, २०१६ चे आदेशान्वये सन २०१६ चे सानुग्रह अनुदानास मान्यता दिलेली आहे. परंतु यापुर्वीचे मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ मध्ये दिलेल्या सशर्त (provisionally) मान्यतेबाबत निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे सन २०१२-२०१३ ते ऑगस्ट, २०१७ अखेर जे कर्मचारी मयत/ सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांचे देय्य रक्कमेतून त्यांना या वर्षात सानुग्रह अनुदानपोटी देण्यात आलेल्या रक्कम अनामत खाती ठेवण्यात आलेल्या आहेत.

**ड)** उपरोक्त वस्तुस्थितीस अनुसरून पुनःश्च यापुर्वीचे सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या वर्षीचे सशर्त (provisionally) मान्यता दिलेल्या सानुग्रह अनुदानाचा विषय मान्यतेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र.४३१३/२०१७ (यापुर्वीचा अर्ज क्र.१३२८४/२०१३) दाखल करणेत आलेला आहे. आता, सदर अर्जावर मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.०९/०६/२०१७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेला आहे.

"After having heard the applicant's advocate, We do not think that any relief can be granted particularly bearing in mind the nature of the order sought to be recalled. Civil application is misconceived and is accordingly dismissed."

याबाबत, ॲड.संजय चौकीदार, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि ०५/०७/२०१७ रोजीचे ईमेल नुसार " I have to opine that earlier order passed by high court never directed any deduction from salary. All that was said in the order was soliciting an undertaking from an employee that he would repay the amount. Act of the concerned officials of deducting the amount is illegal and contrary to high court order in the main proceeding PIL main issues is not the one and to spend the amount. High court during the course of hearing of present application orally opined and questioned the necessity of filing such application and held that application is without any merit.

I have to opine that deductions made from the salary of employees be refunded for the with by obtaining the undertaking by way of abundant precaution from concluded in view of appointment of managing committee as prescribed under the Act. Which has absolute powers to determine the issue. I hope and trust that this adequate solutions for the issue raised and my opinion" कळविले आहे.

**ई)** उपरोक्त **"ब"** मधील २, ३ व ४ नुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या सशर्त (provisionally) मान्यतेस अधिन राहुन सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ चे सानुग्रह अनुदान वसुलीच्या हमीवर (समंतीपत्र घेऊन) वाटप करणेत आलेले आहे. त्यामुळे या कालावधीत मयत, सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेली नाहीत. तसेच सन २०१२-२०१३ नंतर आजअखेर सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या कालावधीत वाटप करणेत आलेल्या सानुग्रह अनुदानाच्या रक्कमा संबंधीत कर्मचाऱ्यांच्या देय रक्कमेतून वसुल करुन अनामत खाती ठेवणेत आलेल्या आहेत.

**उपरोक्त कालावधीतील सानुग्रह अनुदानाची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-**

| **अ.क्र.** | **आर्थिक वर्ष** | **मा. उच्च न्यायालयाने सशर्त (provisionally) मान्यता दिलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम** | **सानुग्रह अनुदानापोटी वाटप केलेल्या तसेच देय्य व अनामत खाती ठेवणेत आलेली रक्कम** |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| १ | २०१२-२०१३ | ५,६०,००,०००/- | **५,३६,९७,८४६/-** |
| २ | २०१३-२०१४ | ६,५०,००,०००/- | **६,०७,४५,३३४/-** |
| ३ | २०१४-२०१५ | ६,७५,००,०००/- | **६,५१,६२,३०१/-** |

उपरोक्त नमुद बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल, असे मत आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे कालावधीत सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात मा.मुंबई उच्च न्यायालयाचे सर्शत मान्यतेस अधिन राहुन प्रतिवर्षी सानुग्रह अनुदान वाटप करणेत आले आहे. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि. (१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५६६) मान्यतेने सानुग्रह अनुदानासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील संस्थानचा मुळ अर्ज दि. ०८/०९/२०१६ चे आदेशान्वये काढुन घेणेत आलेला आहे. त्यानुसार उपरोक्त कालावधीत वाटप करणेत आलेल्या रक्कमेला मान्यता मिळणेचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करुन समितीचे मान्यतेने प्रस्ताव जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/३६९२/ २०१६ दि. १३/१०/२०१६ अन्वये शासनास सादर करणेत आलेला होता. परंतु शासनाने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे मान्यतेने वाटप करणेत आलेल्या सानुग्रह अनुदानास मान्यता दिलेली नाही.

तदनंतर संस्थानमार्फत पुनःश्च या विषयावर निर्णय होणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र. ४३१३/२०१७ दाखल करणेत आलेला आहे. सदर अर्जावर मा.न्यायालयाने दि०९/०६/२०१७ चे आदेशात "After having heard the applicant's advocate, We do not think that any relief can be granted particularly bearing in mind the nature of the order

sought to be recalled. Civil application is misconceived and is accordingly dismissed." असे नमुद केले आहे. तसेच सदर निर्णयाबाबत संस्थान पॅनलवरील ॲड.संजय चौकीदार यांनी दि.०५/०७/२०१७ चे ई-मेलद्वारे याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.व्यवस्थापन समितीस असल्याचे नमुद केले आहे. तथापी शासन निर्णय क्र.सासंवि १०१६/१४३२/ प्र.क्र.१८२/कार्या-१६ महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी दि. २९ ऑक्टोबर, २०१६ चे आदेशान्वये सन २०१६ चे सानुग्रह अनुदानास मान्यता दिलेली असून त्यानुसार सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

तरी, सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या प्रतिवर्षी उपरोक्त स्तंभ क्र.०४ मध्ये नमुद केलेनुसार सानुग्रह अनुदानापोटी देय्य, वाटप केलेल्या व अनामत खाती ठेवणेत आलेल्या रक्कमेस अंतिम मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या प्रतिवर्षी सानुग्रह अनुदानापोटी देय्य, वाटप केलेल्या व अनामत खाती ठेवणेत आलेल्या रकमा संबंधीतांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभागाचीही मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२०** **श्री.रविंद्र बाळासाहेब नवले, एच.आर. मॅनेजर श्री साईबाबा हॉस्पिटल यांच्या चुकिच्या नियुक्तीसंदर्भात निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) ॲड.अविनाश शेजवळ यांनी दि.२६/०७/२०१७ रोजीचे तक्रार अर्जात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

This complaint is to bring to your notice a patent illegality and fraund being played upon the Shri Saibaba Sansthan Trust, shirdi by Mr.Nawale Ravindra Balasaheb as a HR Manager.

I prefer this complaint in public interest and for compliance of relevant rules of the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi and the settled law in this regard.

Mr.Nawale was appinted/ joined as an Human Resourse Manager on 21/12/2006 (Exihibit-A), with appointment letter (Exihibit-B)

In this appointment order para 11 clearly mentioned that you will have to produce the original certificate of educational qualification & experience, the cast / category certificate (wherever applicable) This appointment was done according to 2009 appointment rules and regulation (Annexure-C) read as Sr.No. Designation – Human Resources Manager Qualification

1) Age not more than 35 yrs.

2) Graduate + MBA (HR) with 2nd Class from any recognized university

3) MS-CIT with 75% marks.

4) Experience min.5 years in similar capacity.

But Mr.Nawale has passed master of Business Administration in Human Rescurse Management in 2009 from pune university (Exihibit –D) means he suppressd material facts on records with sansthan and done cheating, misrepresntation. Therefore Mr.Nawale qualification was not as per the rules and regulation in 2006 as he passed out in 2009 with MBA IN HUMAN RESOURSE MANAGEMENT.

Now legal question arises

1) Can sansthan appointment any person not qualified as per prescibed qualification answer – No. then how did Mr.Nawale get appointed.

2) He also was not possessing experience of 5 yrs.in similar capacity.

3) Requirement of MS-CIT with 75% marks (Exihibit – E)

4) But Mr.Nawale secured 72% marks in MS-CIT Means overall he is not suitable candidate to be appointed as a HR Manager in sansthan.

As per supreme courtruleing getting job without prescribed qualification is to be suspended immediately and lodge a police complaint and constitute a legal enquirey against the person involve in this case Mr.Nawale, is culprit.

Said appointment was illegal to the extent that Mr.Nawale was never qualified to hold the post and the said appointment was made in violation of law governing Sansthan Trust such an act itself constitutes cheating under section 420 of IPC and is punishable with severe penalty. Having complete Knowledge of the fact that the said MBA IN HR course is supposed to be passed in 2006 and after this 5 yrs experience in similar capacity means Mr.Nawale is legally joined to above post in 2011. Appointing authority (saibabasansthan trust) had violated the relevant rules of the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. By giving the appointment The Hon'ble Supreme Court of India in a catena of judgments has held that where a material suppression of fact is done by a person for seeking appraisal in their qualifictions which results in appointment, promotion to a certain specialized posts, the said appointment being made in presence of fraud and due to supperssion of material facts is illegal and is liable to be terminated on an immediate basis. Mr.Nawale who was appointed as HR Manager based on the impression that the his qualification as per rules laid down by Govt of Maharashtra, is therefore liable to the terminated on immediate basis and a formal inquiry needs to be constituted to meet ends of justice.

Please refer to Avtar Singh vs Union of India (2016) 8 SCC 471, R. VishwanathaPillaiVs State of Kerala (2004) 2 SCC 105; SushilSuriV.CBI&Anr (2011) 5 SCC 708; National Council for Teacher Eduction and Others v. Shri Shyam Shiksha Prashikshan Sansthan and others etc. (2011) 3 SCC 238)

Mr. Nawale had the audacity to seek appraisal in qualifications for the purposes of Appointment, which is nothing but a complete abuse of process of law and rules of Sansthan Trust.

In light of the settled law and rules, Mr.Nawale appointment to the post of HR Manager is completely based on suppression of material facts and hence illegal and void ab-initio.

Mr.Nawale has committed an offence of criminal conspiracy, cheating, and fraud on government authorities, criminal misrepresentation, and has violated rules of sansthan trust with complete holdness. Such an act requires to be brought down immediately.

In the interest of justice and public interest it is my humble request to you to please take due notice of the said offence and suppression of material facts by Mr.Nawale and kindly terminate his services on immediate basis.

I also request you to please constitute and impartial inquiry in the present case and as such flouting of laws has been a rampant.

I sincerely hope you will take all necessary steps to end this illegality on an urgent basis and I urge you in public interest to take all actions to do justice. Take appropriate action within 15 days. Otherwise we lodge a police complaint.

वरीलप्रमाणे ॲड.अविनाश शेजवळ यांनी एच.आर.मॅनेजर, श्री.रविंद्र नवले यांचेबाबत तक्रार अर्ज सादर करून १५ दिवसांत चौकशी करावी अन्यथा पोलीस तक्रार करणार असल्याचे नमूद केले आहे.

**ब) श्री.रविंद्र बाळासाहेब नवले, एच.अर.मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल विभाग यांचेबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे:-**

श्री साईबाबा संस्थानने श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सन २००६ मध्ये नव्याने कार्यान्वित केले. त्यावेळी संस्थानने या हॉस्पिटलसाठी डॉक्टर्स, पेरामेडीकल व कार्यालयीन स्टाफसाठी दि.२०/०३/२००६

रोजी महाराष्ट्र टाईम्स व इतर वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहीरातीमध्ये मार्केटींग मॅनेजर व एच.आर.मॅनेजर या पदांचा समावेश आहेत. सदरचे जाहीराताची तपशील खालीलप्रमाणे-

| Sr.no | Post | Nos. of Post | Qualifications | Experience |
|---|---|---|---|---|
| 01 | Marketing | 01 | MBA (Marketing) | 2 Yrs Exp. In similar situation |
| 02 | Human Resources | 01 | Graduation with MBA (HR) | 2 Yrs Exp. In similar situation |

सदरचे जाहीरातीनुसार श्री.रविंद्र बाळासाहेब नवले यांनी दि.२७/०३/२००६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे नावे मार्केटींग मॅनेजर या पदासाठी अर्ज केलेला आहे. अर्जासोबतचे वैयक्तिक व शैक्षणिक व अनुभव जोडली आहे. त्यानुसार श्री. रविंद्र नवले यांची शैक्षणिक पात्रता B.Sc.-2001, MBA(Marketing)-2004, MS-CIT-2005 अशी दिसते. दि. २०/०३/२००६ रोजीच्या जाहीरातीनुसार श्री.नवले यांना दिनांक २३/०४/२००६ रोजी मार्केटींग मॅनेजर या पदाचे मुलाखतीसाठी हजर रहाणेकामी कॉल दिल्याचे दिसते.

श्री.रविंद्र नवले यांचे वैयक्तिक धारिणीची पडताळणी करता असे निदर्शनास येते की, श्री.नवले यांनी जाहीरातीनुसार मार्केटींग मॅनजर या पदासाठी अर्ज केलेला आहे. त्यांना मार्केटींग मॅनेजर या पदाचे मुलाखतीसाठी बोलविणेत आलेले आहे. त्यानुसार त्यांची मुलाखत घेण्यात येऊन ते मार्केटिंग मॅनेजर या पदासाठी प्रतिक्षा यादीत होते. परंतु, दरम्यान तात्कालीन एच आर मॅनेजर श्री. बी. एम. लोंढे यांचा राजीनामा दि. १६/११/२००६ मंजूर केल्याने दि. २३/०४/२००६ रोजी मार्केटींग मॅनेजर पदासाठी प्रतिक्षा यादीवर असलेले श्री नवले यांना जा.नं.एसएसएस/ वशी-०१/१७७४९/२००६ दि.०५ डिसेंबर, २००६ रोजीचे आदेशान्वये एच.आर.मॅनेजर या पदावर एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी तात्पुरती एकित्रत मानधन रु. ८०००/- वर नेमणूक केल्याचे दिसते. सदर नेमणूक आदेशाचे स्थळप्रतिवर "श्री.बी.एम.लोंढे, मॅनेजर एच.आर.यांनी राजीनामा दिल्याने रिक्त पदावर श्री.नवले यांचा इंटरव्हू दि.२३/०४/२००६ रोजी मार्केटींग मॅनेजर पदासाठी झालेला असून प्रतीक्षा यादीवर आहेत" असे नमूद केलेले असून त्यावर तात्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री. आर एस साबळे व कार्यकारी अधिकारी मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या स्वाक्षरी आहेत. तसेच दुस-या झेरॉक्स प्रतीवर "Original Documents Verified" असे नमूद केलेले असून त्यावर तात्कालीन वैद्यकीय संचालक डॉ विद्याधर गोपाळराव टाकळकर यांची स्वाक्षरी आहे. नेमणूक आदेशानुसार श्री.रविंद्र नवले दि.२१/१२/२००६ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी एच.आर.मॅनेजर या पदावर हजर झाल्याचे दिसते.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००५/३१७/-का- सोळा. मंत्रालय मुंबई दि. १३/०६/२००७ नुसार श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलकरिता स्थायी ६६९ व कंत्राटी ७६ असे एकूण- ७४५ पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधानुसार मार्केटींग मॅनेजर व एचआर.मॅनेजर या पदांकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता आहे.

| पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| अ.नं.४१ मार्केटींग मॅनेजर | ०१ | पाचव्या वेतनआयोगानुसार ६५००-२००-१०५०० | एम.बी.ए. (मार्केटींग) |
| अ.नं.४५ एच.आर.मॅनेजर | ०१ | पाचव्या वेतनआयोगानुसार ६५००-२००-१०५०० | पदवीधारक / एम.बी.ए.(एच.आर.) |

श्री. नवले यांचे नियुक्तीचे वेळी त्यांचेकडे एच आर मॅनेजर या पदासाठी आवश्यक शैक्षणीक अर्हता नव्हती. श्री. नवले यांनी सादर केलेल्या एम.बी.ए. (एच.आर) प्रमाणपत्रानुसार त्यांनी एम.बी.ए. (एच.आर) ही पदवी एप्रिल २०१३ मध्ये प्राप्त केल्याचे दिसते. तसेच त्यांनी सदर पात्रतेची दि.२६/०७/२०१३ चे अर्जान्वये संस्थान दप्तरी नोंद होणेबाबत विनंती केली असून सेवा जेष्ठता यादीत नोंद झाल्याचे दिसुन येते.

वरीलप्रमाणे शासनाने मान्यता दिलेल्या मंजूर आकृतींबधाचे अवलोकन करता मार्केटिंग मॅनेजर व एच आर मॅनेजर या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणी पात्रता श्री नवले यांनी आज रोजी धारण केलेली आहे.

श्री. नवले यांचा संस्थानमधील सेवेचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | पदनाम | कालावधी |
|---|---|---|
| १ | एच आर मॅनेजर | दि. २१/१२/२००६ ते दि. १७/१२/२०१३ |
| २ | प्र. कामगार अधिकारी | दि. १८/१२/२०१३ ते दि. २६/०२/२०१४ |
| ३ | एच आर मॅनेजर | दि. २६/०२/२०१४ ते दि. २४/०४/२०१४ |
| ४ | प्र. कामगार अधिकारी | दि. २५/०४/२०१४ ते दि. २३/१२/२०१६ |
| ५ | एच आर मॅनेजर | २३/१२/२००६ ते आज आखेर |

**वरील वस्तुस्थिती विचारात घेता खालील बाब निर्दशनास येते.**

संस्थानचे जाहीरातीनुसार श्री रविंद्र बाळासाहेब नवले यांनी दि. २७/०३/२००६ रोजी मार्केटिंग मॅनेजर पदासाठी अर्ज केला होता. त्यानुसार त्यांची दि. २३/०४/२००६ रोजी मार्केटिंग मॅनेजर पदासाठी मुलाखात घेण्यात आली असून संस्थानचे तात्कालीन एच आर मॅनेजर श्री. बी एम लोंढे यांनी राजिनामा दिला असल्याने प्रशासनाचे सोयीचे दृष्टीने मार्केटिंग मॅनेजर पदासाठी प्रतिक्षा यादीवर असलेले उमेदवार श्री रविंद्र बाळासाहेब नवले यांची तात्कालीन प्रशासकीय अधिकारी व कार्यकारी अधिकारी यांनी बेकायदेशीर नेमणूक केलेली आहे. त्यानुसार श्री नवले हे दि. २१/१२/२००६ पासून संस्थान सेवेत हजर झालेले आहे. तदनंतर एच आर मॅनेजर पदाची शक्षणिक पात्रता श्री नवले यांनी एप्रिल २०१३ मध्ये प्राप्त करुन त्याची सेवाजेष्ठता यादीत नोंद घेणेबाबत संस्थानकडे दि. २६/०७/२०१३ चे अर्जान्वये विंनती केली असून त्यांची सेवाजेष्ठता यादीत नोंद घेण्यात आलेली असून त्यांचेकडे एच आर मॅनेजर पदासाठी आवश्यक असणारी पात्रता त्यांनी धारण केलेली आहे. एच आर मॅनेजर व मार्केटिंग मॅनेजर या पदाची वेतन श्रेणी एकच आहे.

तसेच सेवा (वेतन) विनियम, २०१३ चे कलम १५ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

जेव्हा संस्थानाच्या कर्मचा-याची नियुक्ती किंवा पदोन्नती चुकीची आहे असे अढळुन येईल " या विनियमात काहीही नमुद केले असले तरी जर संस्थानाच्या कर्मचा-याची कोणत्याही पदावरील पदोन्नती किंवा नियुक्ती चुकीची आहे असे आढळून आले किंवा तसे निश्चीत झाले तर त्याच्या वेतनाचे समितीच्या त्या संबंधीच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये नियमन करण्यात येईल."

उपरोक्त तरतूद ही वेतनासंबंधी असून संबंधित कर्मचा-याची नियुक्ती चूकीची असूनही त्यास संरक्षण द्यावयाचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने घेतल्यास त्या संबंधीची आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने श्री नवले यांची नियुक्ती चूकीची असून त्यांना संरक्षण द्यावे किंवा कसे, यासाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रविंद्र बाळासाहेब नवले, एच.आर. मॅनेजर श्री साईबाबा हॉस्पिटल यांची शैक्षणिक पात्रता मार्केटिंग मॅनेजर या पदाची असून त्यांनी या पदासाठी मुलाखतही दिलेली होती. परंतु विशिष्ट परिस्थितीमध्ये एच.आर. मॅनेजर उपलब्ध नसल्यामुळे त्यांना एच.आर. मॅनेजर पदावर नियुक्ती दिली गेलेली असलेचे उपरोक्त प्रस्तावावरुन निदर्शनास येते. तरी आता, श्री.रविंद्र बाळासाहेब नवले, एच.आर. मॅनेजर श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी संस्थानमध्ये केलेल्या सेवेचा विचार करता व त्यांची एच.आर. मॅनेजर या पदाची शैक्षणिक अर्हता धारण केलेली असल्याने, त्यांना संरक्षण देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२१** **संस्थान आस्थापनेवरील सर्व स्थायी कर्मचाऱ्यांना भरपाई सुट्टी देणेकामी सेवाविनियमामध्ये दुरुस्ती करणे.**

**निर्णय क्र.८६७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२२** **श्री साईनाथ रुग्णालयामधील डॉक्टरांना इन्सेटिव्ह लागू करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-**कलम १७ (२) (घ) समितीच्या सदस्यांना व कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

**सेवाविनियमः-** शासन निर्णय क्र.सासंवि २०१२/ प्र.क.१९/ पुर्नबांधणी -७/ का-सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.२८ ऑक्टोबर २०१३ (पान नं.९०, प्रकरणे ५, मुद्या क्र.२५)

**मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र. नवीन प्रस्ताव**

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वे श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता, (इन्सेंटीव्ह) लागु करणे बाबत प्रस्ताव दि. २५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. ८५ अन्वये सादर करण्यात आला असुन निर्णय क्र.६०५ अन्वये मान्यता मिळालेली होती. परंतु, सदर प्रस्तावामध्ये दर ३ वर्षाचे प्रोत्साहन भत्याचे टप्पे तयार केले होते. यामुळे नव्याने भरती होणा-या व पुर्वीपासून कार्यरत असणा-या डॉक्टरांच्या प्रोत्साहन भत्त्यामध्ये तफावत दिसुन येत होती. तरी सर्वांना सारखा लाभ मिळावा व कोणावरही अन्याय होता कामा नये या उदद्शाने सदरचा प्रस्ताव नव्याने व्यवस्थापन समितीसेमोर फेरसादर करणेत येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय ही दोन रुग्णालये चालविली जात आहेत. सदर रुग्णालयांमध्ये वेगवेगळया आजारांवर विविध तपासण्या/ उपचार/ शस्त्रक्रिया केल्या जातात. शिर्डीसारख्या लहान गावात सुपरस्पेशालिटी दर्जाच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व त्यासाठी आवश्यक असलेले डॉक्टर्स उपलब्ध होवून ते टिकून राहणेसाठी श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मासिक वेतनाव्यतिरिक्त रुग्णांकडून आकारण्यात येणा'या बिलातील काही विशिष्ट रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून देणेबाबत प्रथमतःनिर्णय संमत झालेला आहे. त्यानूसार दरपत्रकामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आलेले असून काही डॉक्टरांचे इनसेंटीव्ह कमी जास्त देखील करण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाच्या इतर विभागांचे इनसेंटीव्हमध्ये सन २००६ पासून वाढ करणेत आलेली नाही. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१९६ अन्वये इनसेंटीव्ह रकमेत वाढ करणेबाबत मागणी केलेली होती. दि.०७/९/२०१५ रोजीच्या मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र.३१९ अन्वये इनसेंटीव्ह दराच्या वाढीबाबत इतरही डॉक्टरांची मागणी एकत्रितपणे विचारात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे इनसेंटीव्ह दर लागू करणेपुर्वी सदर बाबींचा व्यापक अभ्यास करणेची गरज भासलेली आहे. केवळ रुग्णांची गैरसोय होवू नये, डॉक्टर्स हॉस्पिटल सोडून जावू नये तसेच रुग्णालय बंद पडू नये यासाठी प्रायोगिक तत्वावर १ महिन्यासाठी (जुलै २०१५) वाढ देणेत आलेली होती. परंतु, मा.त्रिसदस्यीय समितीला इनसेंटीव्हमधील प्रस्तावित दरवाढीचा किती आर्थिक भार संस्थानवर पडतो याबाबत तौलनिक तक्ता सादर करणेचे ठरले. त्यामुळे नवीन इनसेंटीव्ह दरवाढीबाबत धोरण निश्चित होईपर्यंत प्रायोगिक दरवाढीची अंमलबजावणी न करता सर्व डॉक्टरांना जुन्याच प्रचलित दराने इनसेंटीव्ह देणेत यावा असे समितीने ठरविले व इनसेंटीव्ह दरवाढीबाबत सर्वसमावेशक प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीचे सभेत सादर करावा अशी सुचना देणेत आली.

त्या अनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टर देखील वेळोवेळी प्रोत्साहन भत्ता मिळणेकामी वारंवार लेखी किंवा तोंडी स्वरुपात विचारणा करीत आहेत. तसेच काही डॉक्टर्स इनसेंटीव्ह अभावी रुग्णालय सोडून गेलेले आहेत. रुग्णालयातील नामांकित डॉक्टरांनी रुग्णांना अखंडीत सेवा देणे गरजेचे असल्याने डॉक्टरांना इनसेंटीव्ह मिळणे आवश्यक वाटते. रुग्णालयात एकुणच असणारी रुग्णसंख्येचा विचार केला असता डॉक्टरांना अतिरिक्त काम करावे लागत आहे.

सदर बाबतीत विचार करता डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्याबाबत महाराष्ट्र शासनाचा कोणताही आदेश उपलब्ध झालेला नाही. सदर इनसेंटीव्हची रक्कम रुग्णालयपरत्वे ज्या त्या रुग्णालयांवर अवलंबून राहील अशी माहिती मिळालेली आहे

सदर बाब ही वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत असल्याने वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक यांनी तयार करुन दिलेल्या निर्देश/विवरणानूसार श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टरांना द्यावयाच्या प्रोत्साहन भत्यांबाबतचे दरपत्रक तयार करणेत येवून सोबत जोडले आहे.

श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयाची दैनंदिन ओपीडीची संख्या ही साधारण ७०० ते ८०० होती. परंतु,मा.व्यवस्थापन समितीनिर्णयक्र.९४४, दि.२२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि.०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयमध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार सर्वांसाठी मोफत करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे त्यामुळे दैनंदिन ओपीडी १२०० ते १४०० पर्यंत पोहोचलेली आहे. रुग्णालयास ३०० बेडची मंजुरी प्राप्त असून त्यापैकी २५०-२७५ बेड कायम भरलेले असतात.

३०० बेडच्या रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या डॉक्टरांच्या संख्येपेक्षा श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांची संख्या तुलनेनेकमी आहे. २०० बेडसाठी २००९ व २०११ साली आकृतीबंध मंजुर असून वाढीव बेडसाठी आकृतीबंधास मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे उपलब्ध असणा-या मनुष्यबळावर अतिरिक्त

कामकाजाचा भार पडलेला आहे. रुग्णालयातील ब-याच विभागांमध्ये एकच डॉक्टर असल्यामुळे सदर डॉक्टर २४ तास ऑनकॉल असतात.

श्री साईनाथ रुग्णालयात कायम, रिक्त व व्हिजीटींग पध्दतीने कार्यरत असणारे डॉक्टर्स

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदे | कायम | व्हिजीटींग | कंत्राटी | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक | १ | ० | ० | ० | १ | डॉ.मैथिली पितांबरे, प्र.वै.अ. रक्तसंक्रमण अधिकारी |
| २ | फिजिशियन | २ | १ | १ | ० | २ | |
| ३ | त्वचारोग तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| ४ | कान नाक घसा तज्ञ | १ | ० | १ | १ | १ | |
| ५ | जनरल सर्जन | २ | १ | १ | १ | ० | |
| ६ | रेडिओलॉजिस्ट | १ | १ | ० | ० | ० | |
| ७ | भुलतज्ञ | १ | ० | ० | ० | १ | |
| ८ | नेत्ररोग तज्ञ | १ | २ | ० | १ | ० | डॉ.अजित पाटील, नेत्ररोग तज्ञ, श्री साईबाबा रुग्णालय प्रत्यक्ष कामकाज श्रीसाईनाथ रुग्णालय. |
| ९ | स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| १० | ऑर्थो.सर्जन | २ | १ | ० | ० | १ | |
| ११ | पॅथॉलॉजिस्ट | १ | १ | ० | १ | ० | |
| १२ | क.भुलतज्ञ | ३ | ३ | ० | ० | ० | |
| १३ | दंतरोग तज्ञ | २ | १ | ० | ० | १ | |
| १४ | होमिओपथीतज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| १५ | बालरोग तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| १६ | सोनोलॉजिस्ट | १ | १ | ० | ० | ० | डॉ.राजश्री शिनगारे, आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक |
| १७ | आयुर्वेद तज्ञ | २ | १ | १ | ० | १ | |
| १८ | सीएमओ | ६ | ३ | ० | ० | ३ | |
| १९ | आरएमओ | १६ | १० | ० | ६ | ० | |
| २० | चीफ बीटीओ | १ | ० | ० | ० | १ | |
| २१ | बीटीओ | ४ | २ | ० | ० | २ | डॉ.भरत धोका, आरएमओ, श्री साईनाथ हॉस्पिटल, प्रत्यक्षकाम श्री साईनाथ रक्तपेढी बीटीओ |

श्री साईनाथ रुग्णालयातील ०५ आरएमओ डॉक्टर्स हे इतर विभागात तज्ञ म्हणून काम पाहत आहेत व उर्वरित ०५ आरएमओ हे अपघात विभागात व रक्तपेढीत शिफटप्रमाणे डयुटी करतात.

येथील वैद्यकीय अधिकारी वेळोवेळी साईभक्तांची सेवा करणे तसेच तातडीच्या शस्त्रक्रिया करणे, वेगवेगळया शिबीरांचे आयोजन करणे, ओपीडीतील रुग्ण तपासणे इ.प्रकारची रुग्णसेवा वेळेचे बंधन न पाळता करीत आहेत. परंतु याकामी श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिका-यांना कोणत्याही प्रकारचा प्रोत्साहन भत्ता देण्यात येत नाही.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टर्स ब-याच वर्षापासून सेवेत असून विनातक्रार सेवा पुरवित आहेत. परंतु सदर रुग्णसेवा करताना डॉक्टर्स श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांना बिलातून इनसेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रुग्णालयाशी तुलना करुन श्री साईनाथ रुग्णालयातील सदर डॉक्टरांना इनसेंटीव्ह देणेत यावा. तसेच रुग्णांची संख्या देखील श्रीसाईबाबा रुग्णालयाच्या संख्येत जास्त असलेमुळे प्रतिरुग्ण इनसेंटीव्ह देणे शक्य नाही तरी याकरिता योग्य तो इनसेंटीव्ह देणे उचित राहील असे मत आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साईनाथ रुग्णालयात मंजुर कर्मचारी आराखडयाप्रमाणे पदे व शैक्षिणक पात्रता व कामाचा अनुभव यावरुन निवड झालेल्या डॉक्टरांना ते नव्याने कामावर रुजु होणे व त्यांची गुणवंत सेवा अखंडीत राहणेकामी एकुण मासिक पगाराव्यतिरिक्त खालीलप्रमाणे इनसेंटीव्ह प्रस्तावित करण्यात येत आहे.

आकृतीबंधातील मंजुर पदांवर पदस्थापना केलेल्या डॉक्टरांना त्यांचे सध्याचे वेतन (मूळवेतन+ग्रेड वेतन) व वेळोवेळी वाढणा-या वेतनाच्या खालीलपैकी कोणत्याही एका पटीत ( % ) प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल.

| A<br>दीड पट<br>(१५० %) | B<br>दोन पट<br>(२०० %) | C<br>अडीच पट<br>(२५०%) | D<br>तीन पट<br>(३००%) |
|---|---|---|---|

सातवा वेतन आयोग लागू झालेनंतर खालीलपैकी कोणत्याही एका पटीत ( % ) प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल.

| A.<br>पाऊण पट<br>(७५ %) | B.<br>एक पट<br>(१०० %) | C<br>अडीच पट<br>(२५०%) |
|---|---|---|

तसेच दर पाच वर्षांनी सदरचे प्रोत्साहन भत्त्याबाबत पुनर्विलकोन करणेत येईल.

सदर प्रोत्साहन भत्ता मुळ वेतनावर आधारीत केल्यामुळे पद सेवा अतिरिक्त गुणवत्ता इत्यादीसाठी देण्यात आलेल्या वेतनवाढी, वेतनश्रेण्या इ. त्याप्रमाणात प्रोत्साहन भत्त्यात यात वाढ होणार असल्याने सेवा कालावधी व गुणवत्तेनूसार प्रोत्साहन भत्ता मिळणार आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील इनसेंटीव्ह पध्दतीच्या आधारे श्रीसाईनाथ रुग्णालयात इनसेंटीव्ह सुरु करणे गरजेचे आहे. यासाठी सदर डॉक्टरांचा संस्थान रुग्णालयातील सेवेचा कालावधी व शैक्षणिक पात्रता हे लक्षात घेता खाली नमूद केलेल्या नियमावलीप्रमाणे इनसेंटीव्ह स्थायी/ मानधनावर/ बाहय यंत्रणेद्वारे रुजू (कंत्राटी पध्दतीने) झालेल्या डॉक्टरांना प्रस्तावित करत आहोत.

उपरोक्त् इनसेंटीव्ह मंजुर कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे विभागवार मेडीकल ऑफीसर (स्पेशालिटी/ कन्सलटंट) पदांना लागू राहील. श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांना संपुर्णपणे मोफत उपचार मिळत असलेने दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत आहे. या रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविणेसाठी मंजुर आकृतीबंधाप्रमाणे असलेल्या पदांव्यतिरिक्त काही आरएमओ डॉक्टर्स मेडीकल ऑफीसर(वेगवेगळया विभागात तज्ञ म्हणून ) यांची सेवा आवश्यक असून आरएमओ पदावर भरती केलेले काही डॉक्टर्स मेडीकल ऑफीसर (speciality) पदाचे प्रत्यक्ष काम करीत आहेत. त्यामुळे रुग्णालयातील मंजुर ३०० बेडसाठी योग्य तो आकृतीबंध लागू होईपर्यंत मेडीकल ऑफीसर (speciality) पदाचे काम करणा-या आरएमओ डॉक्टरांना देखील इनसेंटीव्ह लागू करणे व्यवहार्य आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रशासकीय पदांवर काम करणा-या डॉक्टरांच्या इनसेंटीव्हबाबत (वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक०२ पदे, वैद्यकीय प्रशासक)

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात एकुण ५ प्रशासकीय पदे मंजुर आहेत. परंतु प्रशासकीय कामाचा व्याप पाहता आतापर्यंत उपरोक्त ५ पदे कधीही भरणेत आलेली नाहीत. सध्या सदर पदांवर कार्यरत असणारे डॉक्टर्स प्रभारी किंवा अतिरिक्त पदभारावर काम करीत आहेत. नवीन पदभरती करण्यात आल्यानंतर त्यांची खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे ,असे मत आहे. त्यामुळे सदर पदांवर काम करणा-या वैद्यकीय अधिकारी यांना देखील सध्या देण्यात येत असलेल्या सध्याच्या एकुण वेतनाच्या काही ठराविक दराने इनसेंटीव्ह देण्यात यावा,असे मत आहे.

श्री साईबाबा रुग्णालयात काम करत असणा-या कन्सलटंट डॉक्टरांना सध्या मिळत असलेला व श्री साईनाथ रुग्णालयात काम करत असणा-या वैद्यकीय अधिका-यांना प्रस्तावित असणारा इनसेंटीव्ह बाबतचा तौलानिक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | डॉक्टर्स (पुर्णवेळ) | श्री साईबाबा रुग्णालयातील सध्याचा सरासरी मासिक इनसेंटीव्ह | श्री साईनाथ रुग्णालयातील प्रस्तावित मासिक इनसेंटीव्ह (मूळवेतन+ग्रेड वेतन ) व वेळोवेळी वाढणा-या वेतनाच्या पट (%) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | A<br>दीड पट<br>(१५० %) | B<br>दोन पट<br>(२०० %) | C<br>अडीच पट<br>(२५०%) | D<br>तीन पट<br>(३००%) |
| १ | जनरल सर्जन | ३,३१,८६४/- | ६४९३५ | ८६५८० | १०८२२५ | १२९८७ |
| २ | ऑर्थो.सर्जन | २,०६,९०२/- | ५२१४० | ६०८३० | ८६९०० | १०४२८० |

**प्रोत्साहन भत्ता खालील नियमावलीतील तरतूदीनुसार देय होईल.**

| अ.नं. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | आकृतीबंधातील मंजुर पदांवर पदस्थापना केलेल्या डॉक्टरांना त्यांचे सध्याचे वेतन (मूळवेतन+ग्रेड वेतन ) व वेळोवेळी वाढणा-या वेतनाच्या<br>A.दीड पट (१५० %)<br>B.दोन पट (२०० %)<br>C.अडीच पट (२५०% )<br>D. तीन पट (३००%)यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. | सातवा वेतन आयोग लागू झालेनंतर प्रोत्साहन भत्ता मूळवेतनाच्या<br>A.पाऊण पट (७५ %)<br>B.एक पट (१०० %)<br>C. सव्वा पट ( १२५ % ) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. . |
| २ | आरएमओ पदावर नेमणूक असणा-या डॉक्टरांकडे स्पेशालिटी विभागाची शैक्षणिक पात्रता असल्यामुळे स्पेशालिटी विभागाचे काम दिल्यास त्यांना मिळत असलेल्या मूळवेतनाच्या (मूळवेतन+ग्रेड वेतन)<br>A.दीड पट (१५० %)<br>B.दोन पट (२०० %)<br>C.अडीच पट (२५०% )<br>D. तीन पट (३००%)यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. | सातवा वेतन आयोग लागू झालेनंतर प्रोत्साहन भत्ता मूळवेतनाच्या<br>A.पाऊण पट (७५ %)<br>B.एक पट (१०० %)<br>C. सव्वा पट ( १२५ % ) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. |
| | परंतु असा प्रोत्साहन भत्ता त्यांचेकडे स्पेशालॅटी विभागाचे काम असेपर्यंतच देय राहील. तथापि सदर स्पेशालिटी काम संस्थानचे अवश्यकतेनुसार डॉक्टरांना देण्याचे अथवा त्यांच्याकडुन काढुन घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. | |
| ३ | कंत्राटी पध्दतीने (११ महिने कालावधीसाठी) मानधनावर नेमलेल्या व स्पेशालिटी विभागात काम करणा-या डॉक्टरांना संस्थानकडे त्यापदाचा मुळवेतनाच्या बॅंडमधील सुरुवातीचे मूळवेतनाचे (मूळवेतन +ग्रेड वेतन)<br>A.दीड पट (१५० %)<br>B.दोन पट (२०० %)<br>C.अडीच पट (२५०% )<br>D. तीन पट (३००%) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. | सातवा वेतन आयोग लागू झालेनंतर प्रोत्साहन भत्ता मूळवेतनाच्या<br>A.पाऊण पट (७५ %)<br>B.एक पट (१०० %)<br>C. सव्वा पट ( १२५ % ) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. |
| ४ | लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत बाह्य यंत्रणेव्दारे नेमण्यात आलेल्या (११ महिने कालावधीसाठी) मानधनावर नेमलेल्या व स्पेशालिटी विभागात काम करणा-या डॉक्टरांना संस्थानकडे त्यापदाचा मुळवेतनाच्या वेतन बॅंडमधील सुरुवातीचे मूळवेतनाचे (मूळवेतन +ग्रेड वेतन)<br>A.दीड पट (१५० %)<br>B.दोन पट (२०० %)<br>C.अडीच पट (२५०% )<br>D. तीन पट (३००%)यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. | सातवा वेतन आयोग लागू झालेनंतर प्रोत्साहन भत्ता मूळवेतनाच्या<br>A.पाऊण पट (७५ %)<br>B.एक पट (१०० %)<br>C. सव्वा पट ( १२५ % ) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. |
| ५ | श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना दि.२५/०५/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२८ अन्वये प्रोत्साहन भत्ता लागु करण्यात आला आहे. श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता, (इन्सेंटीव्ह) लागु करणे बाबत | सातवा वेतन आयोग लागू झालेनंतर प्रोत्साहन भत्ता मूळवेतनाच्या |

| | | |
|---|---|---|
| | दि. २५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. ८५, निर्णय क्र.६०५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तथापि श्री साईबाबा रुग्णालयाच्या मंजुर आकृतीबंधातील वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय प्रशासक या पदाला प्रोत्साहन भत्ता लागु करण्यात आला नाही. या पदाबरोबरच श्री साईनाथ रुग्णालयातील आकृतीबंधास वैद्यकिय अधिक्षक हे पद मंजुर आहे. सबब, वरील पदांनाही मुळ वेतनाचे (मुळ वेतन + ग्रेड वेतन) वर<br>A.दीड पट (१५० %)<br>B.दोन पट (२०० %)<br>C.अडीच पट (२५०% )<br>D. तीन पट (३००%) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. | A.पाऊण पट (७५ %)<br>B.एक पट (१०० %)<br>C. सव्वा पट ( १२५ % ) यापैकी कोणत्याही एका पटीत प्रोत्साहन भत्ता लागु करणेत येईल. |
| ६ | मंजुर करण्यात आलेला प्रोत्साहन भत्ता हा शासनाच्या मंजुरी आदेशाच्या दिनांकापासुन लागु राहिल. शासनाच्या मंजुरी आदेशाच्या आगोदरची कोणत्याही रक्कमेची मागणी करण्याचा अधिकार संस्थान रुग्णालयातील डॉक्टरांना राहणार नाही. | |
| ७ | तसेच दर पाच वर्षांनी सदरचे प्रोत्साहन भत्त्याबाबत पुनर्विलकोन करणेत येईल. | |
| ८ | संस्थान रुग्णालयातील जे वैद्यकीय अधिकारी हे संस्थानकडून अध्ययन रजा घेऊन पदव्युत्तर शिक्षणासाठी जातात. त्यांनी पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेचे आवश्यक सर्व प्रमाणपत्र संस्थानकडे जमा केलेनंतर व त्या पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका या अर्हतेच्या पदावर त्यांना तात्पुरती किंवा कायम पदस्थापना मिळालेस त्यांना सदर प्रोत्साहन भत्ता लागु करणेत यावा. सदर बाब संस्थानचे सेवा प्रवेश नियम व इतर आवश्यक प्रशासकीय बाबी तपासुन निर्णय घेणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. | |
| ९ | आठवडा सुटटी वगळता इतर कोणत्याही रजेच्या कालावधीच प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार नाही. | |
| १० | तातडीच्या/अतितातडीच्या वैद्यकीय सेवांसाठी कोणत्याही प्रकारचा प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार नाही. परंतु नियमित प्रोत्साहन भत्ता देय होण्यासाठी तातडीच्या/अतितातडीच्या वैद्यकीय सेवांसाठी संस्थानच्या/रुग्णांच्या गरजेनुसार डॉक्टरांना सेवा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. | |
| ११ | वरील प्रोत्साहन भत्ता देय होणेसाठी संस्थान रुग्णालयातील डॉक्टरांना पूर्ण वेळ सेवा देणे अनिवार्य राहील. कोणत्याही परिस्थितीत खासगी वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही. अशा डॉक्टरांना त्यापुढे प्रोत्साहन भत्त देण्यात येणार नाही व त्यापुर्वी दिलेला प्रोत्साहन भत्ता व व्यवसाय रोजभत्त वसुल करणेचा संस्थानचा अधिकार राहील. | |
| १२ | सर्व डॉक्टरांनी बाह्यरुग्ण विभाग व अंर्तरुग्ण विभाग व ऑपरेशन थिएटरच्या वेळांचे पालन करणे बंधनकारक राहील.या नियमांचे पालन न करणा-या डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देणेत येणार नाही. | |
| १३ | वैद्यकीय अधिका-यांना/डॉक्टरांना नेमून दिलेल्या दिवशी तातडीच्या/अतितातडीच्या प्रसंगी रुग्णसेवा देणे बंधनकारक आहे. यात हलगर्जीपणा झाल्यास प्रोत्साहन भत्ता तातडीने बंद करणेचे अधिकार संस्थानला राहतील. | |
| १४ | रुग्णालयात कार्यरत भुलतज्ञांना सायंकाळी ६.०० वाजेनंतर नियोजित व तातडीच्या शस्त्रक्रियांसाठी उपस्थित रहाणे आवश्यक राहील.त्याचा कोणताही वेगळा मोबदला देय होणार नाही. | |
| १५ | वैद्यकीय संचालक,उपवैद्यकीय संचालक,वैद्यकीय प्रशासक,वैद्यकीय अधिक्षक यापैकी एखाद्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्यास एकाच पदाचा प्रोत्साहन भत्ता देय राहील.दोन्ही पदांचा प्रोत्साहन भत्ता मागणी करता येणार नाही. कोणत्या पदाचा प्रोत्साहन भत्ता दयावयाचा याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी गुणवत्तेनूसार निर्णय घेतील. | |
| १६ | प्रशासनाकडून वेळोवेळी मंजुर होणारा सानुग्रह अनुदानाची रक्कम प्रोत्साहन भत्त्यासह न राहता वेतनाइतकीच राहील. | |
| १७ | दंतविभाग (दंत विभागातील MDS सोडून) आयुर्वेदिक, होमिओपॅथी, फिजिओथेरपीस्ट, सीएमओ, आरएमओ यांना देय होणार नाही. | |
| १८ | संस्थान सेवेचा तात्काळ राजीनामा दिल्यास एक महिन्याचे वेतन नोटीस पे म्हणुन जमा करावा लागेल. अथवा संस्थान नियमाप्रमाणे एक महिना पुर्व नोटीस दयावी लागेल. | |
| १९ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना देय प्रोत्साहन भत्त्यात शासनाच्या मंजुरीविषयी कोणताही बदल करणेत येणार नाही. | |

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना सदर इनसेंटीव्हमध्ये प्रस्तावित केलेप्रमाणे फेरबदल करुन तातडीने लागू करणेस, त्यासाठी लागणा-या मासिक आर्थिक खर्चास मंजुरी मिळणेस, वेळोवेळी सदरच्या खर्चात झालेल्या कमी जास्त बदलास नव्याने भरती होणा-या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना देखील वरीलप्रमाणे इनसेंटीव्ह लागु करणेस व इनसेंटीव्ह लागू करण्याच्या नियमावलीस मान्यता मिळणेस, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.८६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना विनामुल्य रुग्णसेवा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे या रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रुग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्यमे सदर डॉक्टरांना रुग्णांच्या बिलाच्या रकमेतून इनसेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रुग्णालयाशी तुलना करुन श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन+ ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इनसेंटीव्ह लागु करणेत यावा. हा इन्सेंटीव्ह लागू केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रु.१२ लाख मात्र आर्थिक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच नव्याने भरती होणाऱ्या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इनसेंटीव्ह लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा संस्थान परिसरात बाहेरील रक्तपेढयांना रक्तसंकलनासाठी परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र.** – नविन प्रस्ताव

**प्रास्ताविक–** मा.अध्यक्ष साहेब यांनी दि. १२/०२/२०१७ रोजी घेतलेल्या रक्तपेढयांचे चर्चासत्रात समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे, अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी. तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रकारे केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी असे म्हटले असुन त्याकामी खालील चार सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी, असे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन रक्तदान ही चळवळ वाढीस लागणेसाठी श्री साईनाथ रक्तपेढी व महाराष्ट्रातील इतर नामांकित रक्तपेढया यांचे मध्ये समन्वय साधणे कामी खालील प्रमाणे चार सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

डॉ. सौ. मैथिली पितांबरे वैद्यकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय - (अध्यक्ष)
डॉ. सुर्यकांत पाटील रक्तसंक्रमन अधिकारी, श्री साईनाथ रक्तपेढीचे - (सदस्य)
डॉ. अतुल कुलकर्णी जनकल्याण रक्तपेढी, पुणे - (सदस्य)
डॉ. मंजु कुलकर्णी हेडगेवार रक्तपेढी, औरंगाबाद - (सदस्य)

उपरोक्त समितीची दि. ३०/०३/२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त व दि. २७/०४/२०१७ चे मंजुर टिपणी नुसार खालील रक्तपेढयांना शासनाचे परवानाकामी आवश्यक असलेले प्रमाणपत्राच्या प्रमणित प्रती प्रस्तावासोबत मागवुन परवाना असलेल्या चार रक्तपेढयांना खालील नियमावली नुसार संस्थान परिसरात आठवडयातील एक दिवस (गुरुवार, शनिवार, रविवार वगळता) रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देण्यात आलेली आहे.

१) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर
२) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक
३) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर
४) दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद

**रक्तपेढयांसाठी रक्तदान शिबीर नियमावली-**

१) रक्तदान शिबीर घेणेकरीता आठवडयातुन ०१ दिवस ठरवुन परवानगी दिली जाईल.

२) रक्तदान शिबीराची वेळ ही सकाळी ०९ ते ०५ अशी असेल.

३) शिबीराची वेळ किंवा दिवस वाढविणे तसेच कमी करणेचे संपुर्ण अधिकार वैद्यकिय अधिक्षिका, वैद्यकिय संचालक यांना राहतील.

४) श्री साईबाबा संस्थान उत्सव काळात शिबीराची वेळ आवश्यकमेनुसार वाढविणेत येईल.

५) रक्तदान शिबीरात रक्तदान करणेकरीता येणा-या रक्तदात्यांना आपल्या रक्तपेढीची संपुर्ण माहिती आवश्यकतेनुसार देणेत यावी.

६) रक्तदान शिबीर घेणेकरीता आलेनंतर व झालेल्या रक्तदात्यांच्या संख्येची नोंद रक्तपेढीने संस्थान रक्तपेढीत ठेवणे बंधनकारक आहे.

७) रक्तदान शिबीरात संकलीत होणा-या रक्त पिशव्यांपैकी २५ % पिशव्या संस्थानचे श्री साईनाथ रक्तपेढीत जमा करणे बंधनकारक आहे.

८) श्री साईबाबा संस्थानच्या नावलैकिकास बाधा पोहोचेल अशा प्रकारचे कोणतेही काम रक्तपेढीकडुन होता कामा नये, याची काळजी घ्यावी.

९) रक्तदान शिबीराची परवानगी कोणाला द्यावी अथवा देऊ नये याची संपुर्ण जबाबदारी संस्थान प्रशासनाची असेल.

१०) रक्तदान शिबीर घेणेकामी देण्यात येणा-या संस्थानच्या जागेबाबत व मशिनरी बाबतची संपुर्ण जबाबदारी ही शिबीर अयोजक रक्तपेढी यांची राहील.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान-** उपरोक्त परवानगी देण्यात आलेल्या चार रक्तपेढयांच्या धर्तीवर उर्वरित रक्तपेढयांना रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देता येईल.

खालील रक्तपेढयांनी संस्थान परिसरात रक्तदान शिबीर घेणेकामी प्रस्ताव पाठविले असुन त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं | रक्तपेढयांचे नाव | अर्ज | एफडीए लायसन्स | एसबीटीसी सर्टिफिकेट | थॅलेसेमिया अहवाल | ऑडीट रिपोर्ट | दर आकारणी पत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अष्टविनायक रक्तपेढी, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०२ | जनकल्याण रक्तपेढी, जालना | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ |
| ०३ | हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रोमा केअर मुन्सीपल हॉस्पीटल ब्लॅड बॅक, मुंबई | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × |
| ०४ | प्रवरा मेडीकल ट्रस्ट ब्लॅड बॅक, लोणी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०५ | मालेगाव ब्लॅड बॅक, मालेगाव | ✓ | × | ✓ | ✓ | × | × |
| ०६ | नाशिक ब्लॅड बॅक ॲण्ड ट्रान्सफ्युजन रिसर्च इन्सटीटयुट, नाशिक | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०७ | बीड ब्लॅड बॅक, बीड | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | ✓ |
| ०८ | जीवन ब्लॅड बॅक, नाशिक | ✓ | × | × | × | × | × |
| ०९ | अर्पण व्होलंटरी ब्लॅड बॅक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १० | साई ब्लॅड स्टोरेज सेंटर, राहाता | ✓ | × | × | × | × | × |
| ११ | औरंगाबाद ब्लड बॅक, औरंगाबाद | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × |
| १२ | इंडीयन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव | ✓ | × | × | × | × | × |
| १३ | आनंदऋषिजी ब्लड बॅक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

**विभागाचा स्पष्ट मत / अभिप्राय-** श्री साईनाथ रक्तपेढी व इतर चार रक्तपेढयांना मंदीर परिसरात आठवडयातील सर्व वार ठरवुन दिलेले असुन उपरोक्त रक्तपेढयांनापैकी शासकीय परवाना असलेल्या रक्तपेढयांना नियमावली प्रमाणे संस्थान परिसरातील साईआश्रम भक्तनिवास, श्री साईप्रसादालय व श्री साईबाबा भक्तनिवास येथे रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देता येईल. तसेच उर्विरीत रक्तपेढयांनी कागदपत्रे सादर केल्यानंतर रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देता येईल. तसेच येथुन पुढे नव्याने प्रस्ताव सादर करणा-या शासकीय परवाना असलेल्या रक्तपेढयांना नियमावली अटी बंधनकारक करुन रक्तदान शिबीर घेणेकामी प्रशासकीय स्तरावर मान्यता देता येईल. असे नम्र मत आहे.

तरी या अगोदर तात्पुरती परवानगी देण्यात आलेल्या चार रक्तपेढयांना व उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या रक्तपेढयांना नियमावलीप्रमाणे कागदपत्राची पुर्तता करुन घेऊन परवानगी देणे बाबत तसेच येथुन पुढे नव्याने प्रस्ताव सादर करणा-या शासकीय परवाना असलेल्या रक्तपेढयांना नियमावली अटी बंधनकारक करुन रक्तदान शिबीर घेणेकामी प्रशासकीय स्तरावर मान्यता देणे बाबतचा विषय मा. व्यवस्थापन सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

अशी स्वरुपाची दि. १२/०८/२०१७ रोजीची श्री साईनाथ रुग्णालय विभागाची टिपणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मंजुर करण्यात आलेली आहे.

तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडीचे, मा. अध्यक्ष साहेब यांच्या निर्देशा प्रमाणे श्री साईबाबा संस्थान मंदीर परिसरात नव्याने सुरु करण्यात आलेल्या ऐच्छिक रक्तदान केंद्रमध्ये (Blood Donation Center) सध्या चार रक्तपेढयांना ठरवुन दिलेल्या वारानिशी रक्तसंकलन करण्याबरोबरच नव्याने प्रस्ताव पाठविलेल्या १३ रक्तपेढयांना वार निश्चित करुन दर दिवशी दोन रक्तपेढयांना दोन शिफ्टमध्ये (सकाळी ०८ ते ०२ वा., दुपारी ०२ ते ०८ वा.) रक्तसंकलनासाठी बोलवुन रक्तदान केंद्र सुरु करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव नव्याने फेरसादर करुन देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे रक्तपेढयांना मंदीर परिसरातील रक्तदान केंद्रात रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देणे बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६९** **प्रस्तावात नमुद केलेल्या १) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर २) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक ३) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर ४) दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद या रक्तपेढयांना मंदिर परिसरामध्ये रक्त संकलनास परवानगी दिलेली आहे. यामधील जिल्हा रुग्णालय, अहमदनगर या रुग्णालयामध्ये गैरप्रकार होत असल्याचे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी ज्या रक्तपेढयांनी रक्तसंकलनासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे, अशा रक्तपेढयांना संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलणासाठी परवानगी देण्यात यावी, असे प्रशासनाने मत मांडले. परंतु समिती सदस्यांनी असे मत मांडले की, रक्तसंकलनासाठी परवानगी द्यावयाच्या सर्व रक्तपेढयांचे Due diligence करुन घेण्यात यावे व Due diligence करुन ज्या रक्तपेढया सर्व कागपत्रांची पुर्तता करतील व सेवाभावी वृत्तीने रुग्णांना रक्त उपलब्ध करुन देतील, अशा रक्तपेढयांनाच संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलणासाठी परवानगी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.२४** **श्री रामनवमी उत्सव- २०१७ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०१७ मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.१११ नुसार एकूण रु. ६२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाज पत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंडप कमानी स्टेज | १०,००,०००.०० | ७,१५,९२०.०० | - | २८४०८०.०० |
| ०२ | कलाकार,कीर्तनकाराची बिदागी | ३,००,०००.०० | २,९०,८७४.०० | - | ९,१२६.०० |
| ०३ | भक्तांना मिष्टान्न मजुरीसह | ८,००,०००.०० | ६,४५,८९६.०० | - | १,५४,१०४.०० |
| ०४ | विद्युत रोषणाई | १०,००,०००.०० | ४,६२,१२८.०० | - | ५,३७,८७२.०० |
| ०५ | निमत्रंण पत्रिका छपाई, पोस्टेज उदीप्रसादासह व जाहिरात | १४,००,०००.०० | ९,६४,२७७.०० | - | ४,३५,७२३.०० |
| ०६ | एल.ई.डी पडदा | ५०,०००.०० | ० | - | ५०,०००.०० |
| ०७ | फुल सजावट | २,००,०००.०० | ० | - | २,००,०००.०० |
| ०८ | जादा कामगार | ४,००,०००.०० | ५,४१,६७१.०० | १४१,६७१.०० | - |
| ०९ | पदयात्री, पालख्या, पिण्याचे पाणी. व्यवस | २,००,०००.०० | २,३८,१२०.०० | ३८१२०.०० | - |
| १० | आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅंकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास) | १,००,०००.०० | ० | - | १,००,०००.०० |
| ११ | कुस्ती हंगामा | १०,००,०००.०० | ९,०१,५००.०० | - | ९८,५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | इतर खर्च<br>(वाहन भाडे, सभा नास्ता, कॅमेरा/ टी.व्ही.ई. दुरुस्ती.) | ५०,०००.०० | ३०,१००.०० | - | १९,९००.०० |
| | एकूण रुपये | **६५,००,०००.००** | ४७,९०,४८६.०० | १,७९,७९१.०० | १८,८९,३०५.०० |

उपरोक्त तपशिल पाहता श्रीरामनवमी उत्सव २०१७ करीता रक्कम रु. ६५,००,०००/- (अक्षरी रुपये पासष्ट लाख) मात्र मंजूर करण्यात आलेले आहे. या रकमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रु.४७,९०,४८६/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस लाख नव्वद हजार चारशे शहाऐंशी) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव- २०१७ करीता प्रत्यक्षात झालेल्या रु.४७,९०,४८६/- मात्र खर्चाचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांच्या तपशीलाची पुस्तिका छपाई करणे.**

**विषय नं.२६** **श्री.के.अरीवालन, साई स्पिरिच्युअल ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, चैन्नई यांना दि.२९.१०.२०१७ रोजी समाधी मंदिराशेजारील स्टेजवर सांस्कृतिक कार्यक्रम करण्यास परवानगी देणेबाबत.**

**विषय नं.२७** **शताब्दी वर्ष कालावधीमध्ये हैद्राबाद येथे एक लाख साईभक्तांकरवी बाबांची आरती एका सुरात गाण्याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बुकात करणेसाठी आयोजित कार्यक्रमास संस्थानचे व्यवस्थापन समिती सदस्य व अधिकारी उपस्थित राहणेबाबत.**

**निर्णय क्र.८७१** उपरोक्त विषय नं.२५ ते २७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२८** **समाधी शताब्दी सोहळा वर्षासाठी स्वच्छता साहित्य खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते यासाठी आवश्यक लागणा-या साहित्याची खरेदी वारंवार करण्यापेक्षा विहित पध्दतीने वार्षिक खरेदी करण्यात येते. समाधी शताब्धी सोहळयासाठी स्वच्छता साहित्य खरेदी करावे लागेल. सध्या आरोग्य विभागाकडील शिल्लक असलेले साहित्य डिसेंबर २०१७ अखेर पर्यंत पुरेसे आहे. तो पर्यंत सन २०१७-१८ मधील महा समाधी शताबृधी सोहळा या कालावधीसाठी लागणा-या साहित्याची खरेदीची कार्यवाही पुर्ण होईल.

आरोग्य विभागासाठी सन २०१७-१८ मधील समाधी शताब्धी सोहळा करिता दैनंदिन कामासाठी आवश्यक आसणा-या साहित्याची यादी खालील परिशिष्ठ **"अ"** प्रमाणे आहे. परिशिष्ठातील अ. नं. ०१ ते १९ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे किती खर्च येईल यासाठी चार-पाच पुरवठा धारकांना ई-मेल व दुध्वनीवरुन दरपत्रकाबाबत ई-मेल मागविण्यात आले होते. त्यापैकी दि. ०८/०९/२०१७ अखेर चार ई-मेल प्राप्त झाले आहेत. प्राप्त मेलमधील दरपत्रकाचे अवलोकन केले असता परिशिष्ठातील अ. नं. ०१ ते १९ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. **२५,२४,२००/-** (अक्षरी रु. पंचविस लाख चोविस हजार दोनशे मात्र) खर्च अपेक्षित आहे.

**परिशिष्ट " अ "**

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | साईज / वर्णन | मेक/ब्रॅड/घटक | मागणी परिमाण/ संख्या | अंदाजे दर | अंदाजे एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेंटेड फिनेल | पाण्याशी डायल्यूशन रेशो १:१०० कोरे (प्युअर) | घटक प्रती लिटर<br>पाईन ऑईल A ग्रेड ६५० ग्रॅम<br>टर्किड ऑईल (TRO 75%) ३५० ग्रॅम | ३००० लिटर | १५०/- प्रति लिटर | ४,५०,००० |
| २ | लिक्वीड सोप | कोणत्याही रंगाचे | घटक प्रती लिटर<br>ॲसीड स्लरी (८०%) | ३००० लिटर | ३३/- प्रति लिटर | ९९,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १०० ग्रॅम<br>कॉस्टीक सोडा<br>(४०%कॉस्टीक लाय द्रावण) २० ग्रॅम | | | |
| ३ | वॉश पावडर<br>(क्लिनिंग पावडर) | आयएसआय मार्क असलेली<br>चांगल्या प्रतीची | कोणत्याही स्टॅंडर्ड डिटर्जंट कंपनीची | ७०२०<br>किलो | २५/-<br>प्रति किलो | १,७५,५०० |
| ४ | बी.एच.सी. पर्यायी पावडर/ फॉलीडॉल पावडर | २५ किलोची बॅग | Fenvalrate – 0.4 %<br>आयएसआय मार्क असलेली | ४०००<br>किलो | ३०/-<br>प्रती किलो | १,२०,००० |
| ५ | ब्लिचिंग पावडर | २५ किलोची बॅग | आयएसआय मार्क असलेली | २०००<br>किलो | ३५/-<br>प्रती किलो | ७०,००० |
| ६ | रबरी वायफर<br>स्टील दांड्यासहीत | २"-३" रुंदी व १८" लांब तसेच<br>दांडे५ फुट लांबीचे | चांगल्या प्रतीचे लवचिक रबर असलेले | ४०० नग | १७०/-<br>प्रती नग | ६८,००० |
| ७ | किटकनाशक औषध (किटकनाशक फवारणी कामी) | ०५ लिटरचे पॅकींग | Diachloro-EC 76 %<br>आयएसआय मार्क असलेले | २५ लिटर | ६५०/-<br>प्रति लिटर | १६,२५० |
| ८ | डस्टपॅन<br>(कचरा गोळा करणेकामी) | स्टॅंडर्ड साईज, दोन फुट लांब दांडी<br>झाकण असलेले | चांगल्या प्रतीचे फायबर | १०० नग | ५५०/-<br>प्रती नग | ५५,००० |
| ९ | वॉश बेशीन/ टॉयलेट क्लिनर (Toilet cleaners)<br>(वॉश बेशीन / संडास भांडेचे डाग काढणे कामी) | ०५ लिटरचे पॅकींग | Harpic/Tanaz/<br>Dr. Ideal/Super Shine/ Any Other Company | १०००<br>लिटर | ६६/-<br>प्रती लिटर | ६६,००० |
| १० | लिक्वीड (फरशीवरील सर्व प्रकारचे डाग काढणेकामी ) | ०५ लिटरचे पॅकींग | Taski/ Ecolab/ Schevron<br>Any Other Company | ५०० लिटर | १५०/-<br>प्रती लिटर | ७५,००० |
| ११ | All purpose cleaners तेलकट डाग काढणेसाठी | ०५ लिटर पॅकींग | Taski / Ecolab / Schevron<br>Any Other Company | ५०० लिटर | १००/-प्रती लिटर | ५०,००० |
| १२ | नायलॉन ब्रश-लांबदांडीचे (टॉयलेट साफ करणे कामी) | स्टॅंडर्ड | चांगल्या प्रतीचे | १५० नग | ९३/-<br>प्रती नग | १३,९५० |
| १३ | नायलॉन ब्रश- लहान<br>(डाग घासणे कामी) | स्टॅंडर्ड | चांगल्या प्रतीचे | १०० नग | ४५/-<br>प्रती नग | ४,५०० |
| १४ | चोक रिमुव्हर | स्टॅंडर्ड | चांगल्या प्रतीचे | १०० नग | ४०/-<br>प्रती नग | ४,००० |
| १५ | खराटे | प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, खुंटी नसलेले, लांब काड्याचे, मजबूत बांधणीचे व साळलेले | चांगल्या प्रतीचे | ४००० नग | ४८/-<br>प्रती नग | १,९२,००० |
| १६ | कुंचे | प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, स्पेशल लांब काड्याचे, खुंटी नसलेले, मजबूत | चांगल्या प्रतीचे | ४००० नग | ९०/- प्रती नग | ३,६०,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बांधणीचे | | | | |
| १७ | फायबरच्या/प्लॅस्टीकच्या कचराकुंड्या ८० लिटर क्षमता असलेल्या | झाकणासह जीबीव्हीएफ ०८/०१ निळया रंगाच्या २०० नग + हिरव्या रंगाच्या २०० नग | निलकमल/सिंटेक्स/समृध्दी कंपनीच्या आयएसआय मार्क | ४०० नग | १२५०/- प्रती नग | ५,००,००० |
| १८ | रबरी मॅट काळया रंगाची | साईज - लांबी ४ फुट, रुंदी २.५ फुट, व उंची पाऊण इंच (गोल छिंद्राचे) | चांगल्या प्रतीचे | २०० नग | १०००/- प्रती नग | २,००,००० |
| १९ | लिक्वीड पॉलिश पितळी अक्षरे साफ करणे कामी | २०० ml. पॅकींग असलेले | चांगल्या प्रतीचे ब्रासो/ धारा/ पितांबरी किंवा इतर कंपनीचे | ०५ लिटर | १०००/- प्रति लिटर | ५,००० |

आरोग्य विभागासाठी सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या स्वच्छता साहित्य खरेदीसाठी मंजूर अंदाजपत्रक रुपये ४२,४२,४००/- पैकी रुपये ३५,००,०००/- स्वच्छता साहित्य खरेदीकामी खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करावे लागेल.

उपरोक्त परिशिष्ठ “अ” मधील अ. नं. ०१ ते १९ नुसार स्वच्छता साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२५,२४,२००/- (अक्षरी रु. पंचविस लाख चोविस हजार दोनशे मात्र) मात्र चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी शताब्दी सोहळा वर्षाकरीता आरोग्य विभागासाठी प्रस्तावात नमुद केलेले स्वच्छता साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२५,२४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.२९** **शिर्डी येथील सर्व्हे क्र.१/१०, १/११, १/१२, १/१४, १/१५, १/१८, १/४, १/७, २/५, २/६, २/४, ३/१, ३/७ पै.मधील क्षेत्रामध्ये नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारतीचे बांधकाम परवानगीकरीता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव आदा करणे तसेच उपकर रक्कम शासनाचे खात्यावर जमा करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पुजा – अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उदिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

**२.** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये “ भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.”

**३.** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ज) अन्वये, “ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्त व्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान;

**४.** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (झ) अन्वये, “ विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे संपादन करणे.”

**मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४८ खालील प्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

*" मा. मुख्यमंत्री महोदय, याचे अध्यक्षतेखाली दि.३१/०३/२०१७ रोजी झालेल्या कृती आराखडा सिमतीचे बैठकीत सदरहू प्रकल्प प्रथम प्राधान्याने हाती घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार एकूण रक्कम रु.१०३,८८,२०,६८६/- इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्प संस्थान तर्फे हाती घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे विधि व न्याय विभाग यांचे मान्यतेकरीता, तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले."*

**प्रस्तावनाः-** नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामासठी येणा-या रु.१०३,८८,२०,६८६/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शासनाचे विधी व न्याय विभागाकडे दि.३१/०७/२०१७ रोजीचे पत्राद्वारे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे दि.२५/०९/२०१७ रोजीचे पत्राद्वारे विषयांकीत इमारतीचे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबत मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी मंजुरीची शिफारस केलेली आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी खालील प्रमाणे विकास शुल्क, उपकर, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव जमा करण्यास संस्थानला कळविलेले आहे.

१ **विकास शुल्क** (वापर साईबाबा दर्शन रांग इमारत)

बांधकाम क्षेत्र ---

साईबाबा मंदिर कॉम्प्लेक्स ७०५.३९ चौ. मी.

दर्शन रांग २०१६०.१३ चौ. मी.

पिंपळवाडी रस्त्यावरील पुल ९६.९७ चौ.मी.

एकूण २०९६२.४९ चौ.मी.X२३४००X२ टक्के

रुपये – ९८,१०,४४५.००

(अक्षरी रुपये – अठयांन्नव लाख दहा हजार चारशे पंचेचाळीस मात्र)

२. **उपकर ---**

बांधकाम क्षेत्र २०९६२.४९ चौ.मी.X२३४००X१ टक्के

रुपये – ४९,०५,२२२.६६

पुर्णाकींत रक्कम रु.४९,०५,२२३.००

(अक्षरी रुपये – एकोणपंन्नास लाख पाच हजार दोनशे तेवीस मात्र)

३. **प्रिमियम चार्जेस –**

अनुज्ञेय बांधीव क्षेत्रापेक्षा प्रस्तावित जास्तीचे बांधकाम क्षेत्र ११७० चौ.मी.

प्रस्तावीत जास्तीचे बांधकाम क्षेत्र – ११७० चौ.मी. X २३४००/-

रुपये २,७३,७८,०००/- मात्र

( अक्षरी रुपये – दोन कोटी त्र्याहत्तर लाख अठयाहत्तर हजार मात्र)

४. **सुरक्षा ठेव ----**

बांधकाम क्षेत्र २०९६२.४९ चौ.मी. X४०

एकूण – ८,३८,४९९.६०

पुर्णांकीत रक्कम रु.८,३८,५००.००

(अक्षरी रुपये – आठ लाख अडोतीस हजार पाचशे मात्र)

---------------------------------------------------------------

**एकूण रक्कम (१,२,३ व ४) रु.४,२९,३२,१६८.००**

---------------------------------------------------------------

**प्रस्तावः-** नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे अंतिम परवानगी करीता वरीलपैकी विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव मिळून होणारी एकूण रु.३,८०,२६,९४५/- इतकी रक्कम शिर्डी नगरपंचायत कार्यालयात राष्ट्रीयकृत बॅंकेचे धनाकर्षाद्वारे जमा करणेस व उपकराची रक्कम रु.४९,०५,२२३/- शासनाचे खात्यावर चलनाद्वारे जमा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे अंतिम परवानगीकरीता विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव मिळून होणारी एकूण रु.३,८०,२६,९४५/- मात्र रक्कम शिर्डी नगरपंचायत कार्यालयात राष्ट्रीयकृत बॅंकेचे धनाकर्षाद्वारे जमा करणेस व रु.४९,०५,२२३/- मात्र उपकराची रक्कम शासनाचे खात्यावर चलनाद्वारे**

**जमा करणेस मान्यता देण्यात आली. परंतु त्यापुर्वी विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव या रकमा व नगरपंचायत प्रिमियम चार्जेस लावू शकते का, याची खातरजमा करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.३०** **मंदिर परिसरातील देणगी कार्यालय नं.१ चे विस्तारीकरणासह फर्निचर व इंटेरीअरचे कामाचे ठेकेदार मे.कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पुणे यांचे अंतिम बील आदा करणे.**

**विषय नं.३१** **शिर्डी शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गावर लक्ष्मीनगर वसाहत ते साईआश्रम या भागातील दुभाजकामध्ये रेलिंग बसविणे, खराब झालेले पेव्हींग ब्लॉक्स बदलणे तसेच दुभाजक व कर्ब स्टोनचे रंगकाम करणे याबाबत उपलब्ध पर्यायांवर चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

**विषय नं.३२** **साईआश्रम भक्तनिवास इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेकामी ई-निविदा मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.८७४** विषय नं.३० ते ३२ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.३३** **साईबाबा समाधी शताब्दी वर्ष २०१७- २०१८ करीता वाहनतळाचे ठिकाणी ८५ दिवस करावयाच्या विद्युतीकरण कामांसाठीच्या अपेक्षीत खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल:-**

२१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियम २१ (१) (क) अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**मागणी:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दिनांक १८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ हे वर्ष शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. या वर्षामध्ये संस्थानमार्फत साजरे केले जाणारे उत्सव व सुट्टयांचे दिवस या दिवसांत शिर्डी मध्ये मोठया प्रमाणात साईभक्त येण्याची शक्यता असल्याने संस्थानमार्फत शिर्डी गावात व शिर्डी परीसरामध्ये विविध ०२ ठिकाणी वाहनतळे उभारुन भक्तांच्या वाहनांच्या पार्कींगची व्यवस्था केली जाणार आहे. तसेच वाहनतळांचे ठिकाणी निवाराशेड, बस शेड, माहिती केंद्र, टॉयलेट इ.तात्पुरत्या स्वरुपात बांधून व्यवस्था केली जाणार आहे.

सदरील वाहनतळे व त्याठिकाणचे निवाराशेड, बस शेड, माहिती केंद्र, टॉयलेट इ.करीता विद्युतीकरणाचे काम करावे लागणार आहे. वाहनतळांवर लाकडी मनोरे (Scaffolding) उभारुन त्यावर फ्लड लॅम्प लावावे लागणार आहेत. रेल्वे स्टेशन ते चारी पर्यंत पादचारी मार्गीकेवर तात्पुरते पथदिवे लावून दयावे लागणार आहेत.

सदरील वाहनतळे संस्थान परिसरापासून दूर अंतरावर असल्यामुळे वाहनतळांवरील विद्युत उपकरणांना वीजपुरवठा करणेसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वर्षभर तात्पुरत्या स्वरुपात वीजपुरवठा जोडून घ्यावा लागणार आहे. याकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे सिक्युरिटी डिपॉझिट भरावे लागणार आहे. जर प्रत्येक गर्दीच्या वेळेस जर वेळोवेळी तात्पुत्या स्वरुपात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा जोडून घ्यावयाचा झाल्यास प्रत्येक वेळी प्रत्येक कनेक्शनसाठी साधारणत: १३,५००/- हजार इतके डिपॉझिट भरावे लागेल. साधारणत: वर्षभरात जर वेळोवेळी ठराविक कालावधीपुरता सप्लाय घ्यावयाचा झाल्यास त्या प्रत्येक वेळी कमीत कमी एकुण ८ वेळा डिपॉझिट भरावे लागेल. हे डिपॉझिट परत मिळण्यास साधारणत: ३ ते ६ महिन्याचा कालावधी लागेल. प्रत्येक वेळी डिपॉझिट भरणे व परत घेणे यात वेळ लागून दरवेळी कागदपत्रांची पूर्तता करण्याऐवजी वर्षासाठी एकदाच डिपॉझिट भरुन कनेक्शन घेता येईल व मीटर असल्यामुळे जेवढा वीजेचा वापर होईल तेवढेच बील आदा करता येईल. साधारणत: ही ४ वाहनतळे व एक ठिकाणी रोडलाईट यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे डिपॉझिट भरावे लागेल.

याव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर कराव्या लागणाऱ्या वीज पुरवठयासाठी भाडे तत्त्वावर जनरेटरसेट घेऊन विद्युतपुरवठा करावा लागणार आहे. तसेच सदर भाडोत्री मटेरियल व जनसेटचे रेट DSR मध्ये नसल्यामुळे मार्केटमध्ये चौकशी करुन मटेरियल व जनरेटर भाडेचे दर घेतलेले आहेत. सर्व वाहनतळे व त्याठिकाणचे निवारा शेड, बसशेड, माहिती केंद्र, टॉयलेट इ.चे विद्युतीकरणाचे हे

काम भाडे तत्त्वावर करुन घेणेकरीता बाहेरील ठेकेदार यांचेकडून निविदा मागावून करावे लागणार आहे. वाहनतळांवरील लाईट व्यवस्थेसाठी फ्लड लॅम्प शेड लावणेकरीता बांधकाम विभागाकडून ३० फूट उंचीचे लाकडी मनोरे उभे करुन घ्यावे लागतील.

**अ]. शताब्दी कालावधीत भाडे तत्त्वावर करावयाच्या विद्युतीकरण कामाचा विवरण तक्ता.**

| अ. क्र. | तपशिल | दिवस | शेतीमहामंडळ जागा, पार्कींग मैदान (श्री साई प्रसादालयाचे पश्चिम बाजूस) सर्व्हे नंबर- ८९, ९० | | | संस्थान मालकीची जागा, पार्कींग मैदान (साईनगर वसाहतीचे दक्षिण बाजूचे मैदान) सर्व्हे नं.१२५/६, १२५/७, १२५/८ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नग | दर | रक्कम | नग | दर | रक्कम |
| १ | ३६ / ७० वॅट सी.एफ.एल.लॅम्प, होल्डर,वायर, स्वीचगियर सह लावणे व काढणे. | ८५ | ९६ | ५/- | ४०,८००/- | ६४ | ५/- | २७,२००/- |
| २ | ५०० / १००० वॅट हॅलोजन लॅम्प शेड, वायर, स्वीचगियर, सह लावणे व काढणे. | ८५ | २४ | २५/- | ५१,०००/- | १६ | २५/- | ३४,०००/- |
| ३ | २५० वॅट मेटल लॅम्प शेड, वायर, स्वीचगियर सह लावणे व काढणे. | ८५ | ८८ | ३५/- | २,६१,८००/- | ६० | ३५/- | १,७८,५००/- |
| ४ | ४०० वॅट मेटल लॅम्प शेड, वायर, स्वीचगियर सह लावणे व काढणे. | ८५ | १२ | ४०/- | ४०,८००/- | ८ | ४०/- | २७,२००/- |
| ५ | ६-१६ ॲम्पीअर ३ पीन प्लग बॉक्स, वायर, स्वीचगियर सह लावणे व काढणे. | ८५ | ३६ | ४/- | १२,२४०/- | २४ | ४/- | ८,१६०/- |
| ६ | ४ X १० स्क्वेअर एम.एम.अर्मर्ड ३.५ कोअर ॲल्युमिनियम केबल टाकणे, काढणे. | ८५ | १९४४ | २/- | ३,३०,४८०/- | १२९६ | २/- | २,२०,३२०/- |
| ७ | ४ X ५० स्क्वेअर एम.एम. अर्मर्ड ३.५ कोअर ॲल्युमिनियम केबल टाकणे, काढणे. | ८५ | २९५ | ३/- | ७५,२२५/- | १९७ | ३/- | ५०,२३५/- |
| ८ | ६२.५ केव्हीए डि.जी.सेट, भाडे तत्त्वावर लावणे (डिझेल संस्थानमार्फत पुरविले जाईल) | ८५ | १ | ४,०००/- | ३,४०,०००/- | १ | ४,०००/- | ३,४०,०००/- |
| | | **एकुण रक्कम :-** | | | **रु. ११,५२,३४५/-** | **एकुण रक्कम :-** | | **रु. ८,८५,६१५/-** |

वरील दोन्ही वाहनतळांकरीता भाडेतत्त्वावर लावाव्या लागणा-या मटेरियलचा एकुण खर्च रु. ११,५२,३४५/- + रु. ८,८५,६१५/- = रु. २०,३७,९६०/-

**ब].** शताब्दी वर्षामध्ये प्रत्येक वाहनतळांचे ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून तात्पुरता वीजपुरवठा जोडून घेऊन वीजपुरवठयाची व्यवस्था करावी लागणार आहे. सदर कामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे सिक्युरिटी डिपॉझिटी चार्जेस, सर्व्हीस, कनेक्शन चार्जेस, प्रोसेसिंग फी इ.चार्जेस भरावे लागणार आहे. तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर (सिक्युरिटी डिपॉझिट चार्जेस रक्कम) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सिक्युरिटी डिपॉझिट चार्जेस सर्व्हीस कनेक्शन चार्जेस, प्रोसेसिंग फी चार्जेस इ. | ०२ ठिकाणी | रु. १३,५००/- | रु. २७,०००/- |
| २ | मीटरकरीता जी.आय.पत्र्याचे बॉक्स खरेदी करणे. | ०२ नग | रु. ३,५००/- | रु. ७,०००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ३४,०००/-** |

**क]. भाडोत्री जनसेटसाठी इंधन संस्थानमार्फत पुरवावे लागेल. त्याचा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | तपशिल | लिटर्स | दर | दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | जनरेटरकरीता डिझेल खरेदी खर्च (०२ नग जनरेटरसेट करीता ) | ६० | रु. ५३.३९ | ८५ | रु. २,७२,२८९/- |
| | | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २,७२,२८९/-** |

तरी संस्थान वाहनतळावर करावयाच्या विद्युतीकरण कामासाठी

अ). भाडे तत्त्वावर इलेक्ट्रिकल साहित्य लावून घेणेसाठी रक्कम रुपये २०,३७,९६०/-

ब). महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे डिपॉझिट वगैरे चार्जेस रक्कम रुपये ३४,०००/- असा खर्च अपेक्षित आहे.

क). इंधन खर्च अंदाजे रक्कम रुपये २,७२,२८९/-

शताब्दी कालावधीत वाहनतळांचे ठिकाणी भाडे तत्त्वावर कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामासाठी इंधन खर्चासह रुपये २३,१०,२४९/- इतका खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे डिपॉझिट भरणेकामी रुपये ३४,०००/- इतका खर्च मिळून एकुण रक्कम रुपये २३,४४,२४९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

शताब्दी महोत्सव २०१७-१८ चे कृती आराखडयामध्ये (DPR) पान नं.१० वरील प्रथम प्राधान्य गटातील कामांमध्ये अतिरिक्त वाहनतळ व्यवस्था निर्माण करणेसाठी, जमिन सपाटी करणासह मैदान तयार करणे, अंतर्गत रस्ते, संडास, मुतारी, वॉश बेसिन, विद्युत इ.व्यवस्था करणेकामी रक्कम रु.१०.६२ कोटी चे खर्चाचा समावेश आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष-२०१८ करीता वाहनतळाचे ठिकाणी भाडे तत्त्वावर इलेक्ट्रिकल साहित्य लावून घेण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे डिपॉझिट वगैरे चार्जेस भरणेसाठी निर्णय होणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा लागणार आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय झाल्यानंतर ई-निविदा मागविणेकामी जास्त खपाच्या मराठी व इंग्रजीतील मुंबई-पुणे येथील आवृत्तीच्या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा समाधी शताब्दी वर्ष २०१७- २०१८ मध्ये तयार करण्यात येणाऱ्या वाहनतळांचे ठिकाणी अंदाजे ८५ दिवस विद्युतीकरण करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४** **Supply & Installation of Video Conferencing Systeem/ device खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नतम निविदाधारक पुरवठाधारक M/s Data Com Product (I.) Pvt. Ltd. यांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :**1) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 23/05/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.369.

**प्रास्ताविक:** संस्थानचे कामकाजासाठी Video Conferencing सुविधा सुरु करणेकामी आवश्यक साहित्य खरेदी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. 23/05/2017 सभेसमोर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं. 369अन्वये Hardware based Video Conferencing सेवा सुरु करणेस व त्यासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रामाणे कार्यवाही करणेस तसेच त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत खालील तपशिलाप्रमाणे 05 निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या असुन सदर ई-निविदांच्या तांत्रिक निविदा मा खरेदी समितीचे दि. 18/09/2017 रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारक कंपनीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| 1 | Antrax Technologies Pvt. Ltd., | अपात्र |
| 2 | Arvind Limited (Telecom Division) | पात्र |
| 3 | Datacom Products (India) Pvt. Ltd., | पात्र |
| 4 | Kores India Limited | पात्र |
| 5 | Laser Telesystems Pvt. Ltd., | पात्र |

उपरोक्त उघडणेत आलेल्या तांत्रिक ई-निविदांपैकी 04 पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा. खरेदी समितीच्या दि. 04/10/2017 रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत. उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांचा तुलनात्मक एकत्रित दर तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारक कंपनीचे नाव | दिलेले एकत्रित दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | Arvind Limited (Telecom Division) | 13,57,634/-+ कर | -- |
| **2** | **Datacom Products (India) Pvt. Ltd.,** | **8,44,000/-+ कर** | **निम्नत्तम** |
| 3 | Kores India Limited | 11,38,000/-+कर | -- |
| 4 | Laser Telesystems Pvt. Ltd., | 8,90,000/-+कर | -- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे Supply & Installation of Video Conferencing System / Devices खरेदीकामी M/s Datacom Products (India) Pvt. Ltd., यांनी देऊ केलेले एकत्रित दर रक्कम रुपये 8,44,000/- + कर निम्नत्तम असल्याने त्यांना चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणेस व वाटा-घाटीअंती त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :**Supply & Installation of Video Conferencing System / Devices खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया अंतर्गत पात्र निविदाधारकांपैकी M/s Datacom Products (India) Pvt. Ltd., यांनी देऊ केलेले एकत्रित दर रक्कम रुपये 8,44,000/- + कर निम्नत्तम असल्याने त्यांना याकामी चर्चा व वाटाघाटी साठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस व वाटा-घाटीअंती त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** शासन निर्देश व तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** Supply & Installation of Video Conferencing System/ Devices खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रिया अंतर्गत पात्र निविदाधारकांपैकी M/s Datacom Products (India) Pvt. Ltd., यांनी देऊ केलेले एकत्रित दर रक्कम रुपये 8,44,000/- + कर निम्नत्तम असल्याने त्यांना चर्चा व वाटाघाटी साठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस व वाटा-घाटीअंती त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Supply & Installation of Video Conferencing Systeem/ device खरेदीकामी M/s Datacom Products (India) Pvt. Ltd. यांचे एकत्रित रु.८,४४,०००/- + कर मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **माहे जुलै, २०१७ व ऑगष्ट, २०१७ या कालावधीत रु.२५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तास श्री साईंच्या चांदिच्या पादुका व इतर साहित्य प्रसादरुपाने भेट देण्यात आलेले आहेत, त्याची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.८७२ अन्वये, "रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची/वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच श्री साईचरित्र ग्रंथ व एक श्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार दि.०९ जुलै,२०१७ रोजी झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवसापासून प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. माहे जुलै २०१७ मध्ये वाटप करण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्य यांची माहिती मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि.१८/०८/२०१७ रोजीचे टिपणीअन्वये अवलोकनार्थ सादर करण्यात आली होती, त्यावर त्यांनी मा.व्यवस्थापन समितीपुढे नोद घेणेकामी सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने, माहे जुलै २०१७ व माहे ऑगष्ट २०१७ मध्ये अशा देणगीदार भक्तांना संस्थानतर्फे सप्रेम भेट देण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.नं. | महिना | चांदीच्या पादुका नग | श्री साईसतचरित्र | | | | | | श्री डी फोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी | हिंदी | इंग्रजी | तेलगू | तामीळ | गुजराथी | |
| ०१. | जुलै २०१७ | ६०९ | ३७ | १६८ | ३२८ | ६१ | ०८ | ०४ | ६०९ |
| ०२. | ऑगष्ट २०१७ | ७६० | ५२ | १४९ | २७१ | २१२ | ४९ | २५ | ७५९ |
| | **एकूण ...** | **१३६९** | **८९** | **३१७** | **५९९** | **२७३** | **५७** | **२९** | १३६८ |

(काही साईभक्त नेहमीचे देणगीदार असल्याने, त्यांचेकडे पूर्वीचे श्री साईसत्चरित्र असल्याने ते सप्रेम भेट घेत नाहीत.)

तरी जुलै २०१७ व ऑगष्ट २०१७ या कालावधीत रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांस उपरोक्तप्रमाणे चांदीच्या पादुका व इतर साहित्य सप्रेम भेट देण्यात आले असून. त्याची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.८७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुलै, २०१७ व ऑगष्ट, २०१७ या कालावधीत रु.२५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तास प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईंच्या चांदिच्या पादुका व प्रसादरुपाने भेट देण्यात आलेल्या इतर साहित्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३६** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराची तसेच मौल्यवान खडे (Precious Stone) मुल्यांकनकारांच्या मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) प्रस्तावना– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील,समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील कलम १७ (२) (झ) मध्ये, "..सर्वसाधारणपणे,विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील, अशा सर्व गोष्टी करील." असे नमुद केलेले आहे.

संस्थानला दक्षिणापेटीमध्ये व लेखाशाखेत समक्ष देणगी स्वरुपात येणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार/ मौल्यवान खडे (Precious Stone) यांची कस लावून तपासणी करून बाजारभावाने किंमत निश्चित करणेकामी तत्कालीन मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०५ अन्वये,विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देवून, खाली नमूद केलेल्या अ.नं. ०१ व ०२ या शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकारांची दि. ०१ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१६ अखेर (एक वर्ष) कालावधीकरीता नेमणूक करण्यात आली होती. सदर मुल्यांकनकारांची मुदत संपुष्टात आल्याने त्यांना पुन्हा मा.व्य.स. निर्णय ७९५ दि. ३० नोव्हेंबर,२०१६ अन्वये दि. ०१ एप्रिल, २०१६ ते दि. १ मार्च, २०१७ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

| अ.नं. | मौल्यवान खडे मुल्यांकनकाराचे नांव | मानधन | मुदतवाढीबाबत शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई | रू.७५/-प्रतिखडा + जीएसटी | काम समाधानकारक आहे, तसेच मुदतवाढीबाबत विनंती तथा संमतीपत्र आलेले आहे. |
| ०२ | श्री नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे.जवेरी, मुंबई | रू.७५/-प्रतिखडा + जीएसटी | काम समाधानकारक आहे, तसेच मुदतवाढीबाबत विनंती तथा संमतीपत्र आलेले आहे. |

१. उपरोक्त खडे मुल्यांकनकारांची नेमणूक वर्तमानपत्रांमध्ये विहित पध्दतीने जाहिरात देवून तत्कालीन मा. त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने करणेत आलेली आहे / होती.

२. उपरोक्त मुल्यांकनकारांनी त्यांचे नेमणुकीचे कालावधीत,सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील ( दि. ०१ जून, २०१४ ते दि.३१ मार्च, २०१५) या कालावधीतील प्राप्त २०९ वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १७,८७०/- मात्र असे एकूण रू.३५,७४०/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

३ उपरोक्त मुल्यांकनकारांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील ( दि. ०१ एप्रिल, २०१५ ते दि.३१ मार्च, २०१६) याकालावधीतील प्राप्त २२३ वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १९,२३४/- मात्र असे एकूण रू.३८,४६८/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

४ उपरोक्त मुल्यांकनकारांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील ( दि. ०१ एप्रिल, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७) याकालावधीतील प्राप्त १३२ (९९ नग) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये ८,५३८/- मात्र असे एकूण रू.१७,०७६/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

आता, उपरोक्त मुल्यांकनकारांची नेमणुकीची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर संपुष्टात आल्याने, विषयांकित कामकाजासाठी सदरचे मुल्यांनकनकारांनी सन २०१७-१८ या पुढील वर्षाकरीता आहे त्याच अटी-शर्तीवर ते पुढे कामकाज करण्यास तयार असून , मुदतवाढ मिळावी म्हणून विनंती अर्ज दिलेले आहेत.

**प्रस्ताव-** वर नमुद केलेल्या **परिच्छेद अ** मधील प्रस्तावनेस अनुसरुन, सोने-चांदीच्या वस्तु अलंकार/मौल्यवान खडे (Precious Stone) यांची कस लावून तपासणी करून बाजारभावाने किंमत निश्चित करणेकामी, उपरोक्त **वर** नमुद केलेले तक्त्यातील शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार,(अ.नं.०१) मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, व (अ.नं.०२) श्री. नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांचे कामकाज अत्यंत समाधानकारक असून, ते सेवाभावी स्वरुपात सेवा देत असल्याने, तसेच ते घेत असलेले मानधन तुलनेने अत्यंत अल्प असल्याने, त्यांची मागील वर्षीच्याच अटी-शर्तीवर तसेच यामध्ये खडे तपासणी व मुल्यांकन, पॅकींग, फोटोग्राफी, व प्रमाणपत्रे इ. चा समावेश करण्यात येऊन, प्रति खडा तपासणी रु.७५/- + जीएसटी या मानधनावर सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मुदतवाढ देणेत यावी.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.८७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाचा अभिप्रायानुसार, मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई तसेच श्री. नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांना संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकाराची व मौल्यवान खडे (Precious Stone) मुल्यांकन करणेकामी मागील वर्षीच्याच अटी-शर्तीवर तसेच यामध्ये खडे तपासणी व मुल्यांकन, पॅकींग, फोटोग्राफी, प्रमाणपत्रे इ. चा समावेश करण्यात येऊन, प्रति खडा तपासणी रु.७५/- + जीएसटी या मानधनावर सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे देणगी स्वरुपामध्ये प्राप्त झालेले खडे कोणते आहेत, याची माहिती समिती सदस्यांना पुरवावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३७** **साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, साईउद्यान व साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमसाठी सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:** कलम २१(१)(क) – मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान येथे साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल मध्ये रुग्णांना स्नांनासाठी गरम पाण्याची सोय होणेसाठी खालील तपशीलाप्रमाणे सोलर वॉटर हिटींग सिस्टीम्स बसविण्यात आलेल्या आहेत :

| अ.नं. | तपशील | खरेदी वर्ष | प्रति सिस्टीम क्षमता लिटरमध्ये | कलेक्टर संख्या | सिस्टीम संख्या | एकुण क्षमता (लिटरमध्ये) | सिस्टीमची किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम भक्तनिवासस्थान | २०१२ | १२५० | १९३० | १९३ | २४१२५० | २,९१,१९,०३६/- |
| २. | साईधर्मशाळा | २०१२ | १२५० | ९७० | ९७ | १२१२५० | १,४७,८०,०२१/- |
| ३. | साईउदयान | २०१२ | १२५० | १३० | १३ | १६२५० | २२,६७,९३३/- |
| ४. | शांतिनिकेतन इमारत | २०१३ | १२५० | २० | २ | २५०० | ७,१५,७७१/- |
| ५. | साईबाबा भक्तनिवासस्थान | २०१२<br>२०१२ | १२५०<br>२२५० | ३३०<br>१०८ | ३३<br>०६ | ५४७५० | ३८,९९,५०२/-<br>११,४५,५४४/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | द्वारावती भक्तनिवासस्थान | | १००० | २५६ | ३२ | ३२००० | |
| ७. | साईप्रसाद गेस्ट हाऊस | २००२ | १५००<br>१००० | २४<br>१६ | २<br>२ | ५००० | २,३४,८४०/- |
| ८. | साईबाबा हॉस्पीटल | २००६ | २५००<br>२०००<br>१००० | ४०<br>९६<br>८ | २<br>६<br>१ | १८००० | १४,८८,६२०/- |
| ९. | साईनाथ हॉस्पीटल | २००८ | १५००<br>१००० | १४४<br>१६ | १२<br>२ | २०००० | ३०,४७,२६०/- |
| | एकुण | | | ४०८८ | ४०३ | **५,११,०००** | **५,६६,९८,५२७/-** |

वरीलप्रमाणे प्रति दिन ५,११,००० लिटर वॉटरची सोलर वॉटर हिटींग सिस्टीम बसविण्यात आलेल्या आहेत. या यंत्रणेमध्ये काचेचे सोलर रिफ्लेक्टर, पाण्याच्या स्टोअरेज टँक व जी.आय. पाईप यांचा समावेश असतो. या यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास तो त्वरीत दुरुस्त करुन घ्यावा लागतो. सोलर वॉटर हिटर सिस्टीम यंत्रणा सतत कार्यान्वित राहण्यासाठी साईबाबा संस्थानच्या सर्व ठिकाणच्या सोलर वॉटर हिटींग सिस्टीमचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे गरजेचे असते. या सर्व्हीस कालावधीत कलेक्टरची काच फुटली तर ती बदलण्यात येते. तसेच इतर लिकेज काढणे, व्हॉल्व मेन्टेनंन्स करणे, दैनंदिन सोलर रिफ्लेक्टर क्लिनींग करणे इत्यादी कामे करण्यात येतात. ही सर्व कामे करणेकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे आवश्यक आहे. यासाठी सिस्टीम बसविल्यानंतर पुरवठादार यांना पाच वर्षाकरीता AMC देण्यात आली होती तसेच ज्या ठिकाणचे सिस्टीम बसवून पाच वर्षपेक्षा जास्त कालावधी झालेला होता त्या ठिकाणी ई निविदाद्वारे कॉन्ट्रक्टरची एक वर्षा साठी नियुक्त करणेत आलेले होते. त्यानुसार २०१६ -१७ चा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **तपशील** | **सोलर हॉट वॉटर क्षमता** | २०१६-१७ दिलेली AMC करीता रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | साईआश्रम भक्तनिवासस्थान | २४१२५० | ५,९७,४७४/- |
| २. | साईधर्मशाळा | १२१२५० | ३,०४,९६१/- |
| ३. | साईउदयान | १६२५० | २९,०८०/- |
| ४. | शांतिनिकेतन इमारत | २५०० | ५,९५०/- |
| ५. | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५४७५० | १,३०,३१६/- |
| ६ | द्वारावती भक्तनिवासस्थान | ३२००० | ८०,०००/- |
| ७. | साईप्रसाद गेस्ट हाऊस | ५००० | १२,५००/- |
| ८. | साईबाबा हॉस्पीटल | १८००० | ५०,०००/- |
| ९. | साईनाथ हॉस्पीटल | २०००० | ६७,०००/- |
| | | **एकुण** | **१२,७७,२८१/-** |

उपरोक्त दरानुसार मे. जैन इरिगेशन सिस्टीम प्रा. लि., जळगांव यांना AMC देण्यात आली होती. त्याची मुदत दिनांक ३०/०६/२०१७ रोजी संपत संपलेली असल्याने सर्व ठिकाणच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे AMC देणे आवश्यक आहे.

**मागणी**: उपरोक्त ठिकाणचे स्स्टिीम पैकी १० कलेक्टर करीता नविन ग्लास तसेच श्री साईबाबा भक्तनिवासस्थान या ठिकाणचे २२५० लि क्षमतेची एक टँक व द्वारावती भक्तनिवास या ठिकाणचे १००० लि. क्षमतेचे एस. एस. ४ टँक खराब झालेले असल्याने नविन खरेदी करणे आवश्यक आहे. याकरीता तसेच संस्थानच्या सर्व सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | | **तपशील** | **नग** | **अंदाजे** वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् **खर्च रु.** |
|---|---|---|---|---|
| **अ.** | | सर्व सोलर यंत्रणेचे एक वर्ष करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) | ५,११,००० लि. | १३,४१,८९७/- |
| | १ | २२५० लि एम. एस. SGOL बायबॅक | १ टँक | ६०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **ब** | २ | १००० लि. एस.एस. SGOL बायबॅक | ४ टॅंक | २,००,०००/- |
| | ३ | रिफ्लेक्टर ग्लास सोलर कलेक्टर | १० नग | २०,०००/- |
| | | **एकुण रक्कम रु.** | | **१६,२१,८९७/-** |

अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख एकवीस हजार आठशे सत्यान्नव मात्र

श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल येथील रुग्णांना स्नानांनाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी याकरीता एकुण ५,११,००० लिटर क्षमतेच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीम असून सदर ठिकाणचे दुरुस्ती व देखभाल करीता मेकॅनिकल विभागाकडे पुरेशे मनुष्यबळ नसल्याने एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणे तसेच खराब झालेल्या सोलर टॅंक बायबॅक करणे, कलेक्टर करीता नविन ग्लास खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये १६,१४,८९७/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन संबंधीत कंत्राटदारांकडून ईनिविदा मागवाव्या लागतील. सदरील प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

**विभागाचे स्पष्ट मत**: श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साईबाबा हॅास्पीटल व साईनाथ हॅास्पीटल येथील सोलर हॅाट वॅाटर यंत्रणेचे एक वर्ष (कार्यादेश दिलेपासून पुढील एक वर्ष) करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणे तसेच ५ नग स्टोअरेज टॅंक, १० नग रिफ्लेक्टर सोलर कलेक्टर ग्लास खरेदीकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, साईउद्यान व साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमसाठी सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **साईभक्तांच्या सुविधेसाठी असलेल्या सर्व निवासस्थानांच्या “निवासस्थान वितरण” नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८८०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३९** **शिर्डी विमानतळाकरीता नेमणुक झालेल्या अधिकाऱ्यांना साईआश्रम भक्तनिवासमध्ये ४ ए.सी व २ नॉन ए.सी. अशा ६ खोल्या ६ महिन्यांसाठी मिळणेबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कं.लि. यांनी केलेल्या मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) “भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.” व (२) पोट-कलम (१) (ख) “ भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.”

**मा.व्यवस्थापन समिती ठरावः**-निरंक.

**प्रस्ताविकः-** श्री.धिरेन भोसले, विमानतळ संचालक, शिर्डी विमानतळ यांनी दि.२०/०९/२०१७ रोजी पत्राव्दारे शिर्डी विमानतळ लवकरच सुरु होणार असून सदरचे विमानतळावर परिचालक कर्मचारी नेमलेले असून , बहूतेक कर्मचारी/ सुरक्षा कर्मचारी बाहेरील गावावरुन आलेली असल्याने शिर्डी येथे सध्या वास्तव्याची सोय नाही त्यामुळे कर्मचा-यांच्या हुद्दयाप्रमाणे अधिकारी २, पर्यवेक्षक २ आणि तृतीय श्रेणीतील कर्मचा-यासाठी २ अशा एकूण ६ सदनीका कर्मचा-यांचे निवासव्यवस्था म्हणून संस्थानच्या कर्मचा-यांना संस्थान निवासस्थान म्हणून देण्यात येणा-या दराने देण्यात याव्यात.

सदर सदनीका सुरुवातीला महाराष्ट विमानतळ विकास कंपनी लि. कडे सुपुर्त करण्यात याव्या, सदनीकामध्येराहणा-या कर्मचा-यांची संपुर्ण माहिती संस्थानला महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. कडून

देण्यात येईल. तरी एकूण ०४ एसी व ०२ नॉन एसी सदनीका देण्यात याव्यात या सदनीका सहा महिन्याकारीता द्याव्यात अशी विनंती केली आहे.

मागणीः- साईआश्रम भक्तनिवास विभागातएकूण १५३६ खोल्या असून, एकूण खोल्यांपैकी ९० % खोल्या ऑनलाईन आरक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. उर्वरीत १०% खोल्या जनसंपर्क विभागामार्फत महत्वाच्या अथितीसाठी मागणी असते तसेच खोल्यांचे मेन्टनेन्स तसेच कलाकारांची निवासव्यवस्था करणेत येते त्यामुळे सदर विभागातील खोल्या १००% भरलेल्या असतात. या विभागातील एका खोलीची भक्तनिवास क्षमता ३ + २ =५ आहे.एका खोलीमधील कॉटसंख्या ३ असून, २४ तासांकरीता विना वातानुकूलीत खोलीचे दर रु.२००/- व वातानुकूलीत खोलीचे दर रु.५००/- तसेच जादा व्यक्तीसाठी प्रती गादी रु.५०/- सेवा आकार आकारण्यात येतो.

सबब, या विभागात गर्दीचा अंदाज घेऊन भक्तांना निवासासाठी कमीत कमी २४ तास व जास्तीत जास्त ४८ तासांसाठी खोली दिली जाते. तसेच मागणीनुसार एक किंवा दोन दिवसांसाठी मुदतवाढ, अशी चार दिवसांसाठी निवासव्यवस्था करणेत येते. तसेच संस्थान एक तीर्थक्षेत्र असल्याने श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणे हे संस्थानचे प्रमुख उदिष्ट आहे. इतर खाजगी किंवा शासकीय कर्मचा-यांसाठी जास्त कालावधीसाठी खोल्याउपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचेश्री.धिरेन भोसले,विमानतळ संचालकयांनी शिर्डी विमानतळयेथे नेमलेल्या ०२ अधिकारी, ०२ पर्यवेक्षक, ०२ तृतीयश्रेणी कर्मचा-यांसाठी ०४ एसी व ०२ नॉन एसी एकूण ०६ निवासस्थाने सहा महिन्यासाठी देणेबाबत मागणी केली आहे. सदर खोल्या महाराष्ट्रविमानतळ विकास कंपनी.लि यांना देणेचे ठरल्यास संस्थान व्यवस्थापनेने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे होणा-या सेवा आकाराचा(भाड्याचा) तपशील खालीलप्रमाणे.

| खोल्यांचा प्रकार | एका खोलीसाठी दर | मागणी खोल्यांची संख्या | एक दिवसासाठी होणारी रक्कम रु. | एक महिन्यासाठी होणारी रक्कम रु. | सहा महिन्यासाठी होणारी एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| वातानुकूलीत (एसी) | ५००/- | ०४ | २,०००/- | ६०,०००/- | **३,६०,०००/-** |
| विनावातानुकूलीत (नॉनएसी) | २००/- | ०२ | ४००/- | १२,०००/- | **७२,०००/-** |
| **अक्षरी रु.चार लाख बत्तीस हजार मात्र** | | | **एकूण रक्कम रुपये.** | | **४,३२,०००/-** |

यापूर्वी अशा प्रकारे या विभागामध्ये शासकीय कर्मचा-यांस रुम उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तशी तरतुद संस्थानच्या अधिनियमात नमूद नाही. जर सदर अर्जदाराची निवासव्यवस्था केली तर इतर शासकीय विभागांकडूनही शासकीय कर्मचाऱ्यांचे निवासव्यवस्थेसाठी मागणी येऊ शकते.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमानः-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-**

१) साईआश्रम भक्तनिवास हे साईभक्तांचे निवासासाठी बांधण्यात आलेले असून, रुमचा सेवा आकाराचा दर अत्यल्प असल्याने साईभक्तांची रुम मागणीप्रमाण जास्त आहे त्यामुळे विभागामध्ये २४ तास रुम वाटपाचे काम चालू असते. त्यामुळे अशा प्रकारे जास्त कालावधीसाठी खोल्या दिल्यास गर्दीच्या कालावधीत साईभक्तांची गैरसोय होऊ शकते.

२) श्री साईबाबा देवस्थान हे आंतरराष्ट्रीय देवस्थानामध्ये गणले जात असल्याने देश भरातून अनेक साईभक्त खोल्यांची मागणी करत असतात. जर संबंधीत अर्जदार यांना अशा प्रकारे जास्त कालावधीसाठी रुम उपलब्ध करुन दिल्यास इतर साईभक्त व त्यांचा समूह तसेच शासकीय इतर योजनांमधील कर्मचारी/अधिकारी रुमची मागणी करतील.

३) या विभागामध्ये यापूर्वी अशा प्रकारे कोणत्याही शासकीय उपक्रमांसाठी/ कामकाजासाठी येणा-या कर्मचा-यांसाठी निवासव्यवस्था करणेत आलेली नाही, तसेच याबाबतची तरतुद संस्थानच्या अधिनियमामध्ये नाही.

साईभक्तांची निवासव्यवस्था व्हावी या उद्देशाने हा विभाग कार्यन्वीत करणेत आलेला असून, साईभक्तांसाठी २४ तासांकरीता अल्प दरात वीना वातानूकूलीत खोली रु.२००/- व वातानूकूलीत खोली रु.५००/- सेवा आकार आकारण्यात येत असून जास्तीत जास्त मुदतवाढीसह चार दिवसांसाठी रुम दिली जाते. सदरच्या खोल्या या साईभक्तांचे निवासासाठीच उपलब्ध असल्याने, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी शिर्डी

यांचेकडील अधिकारी, कर्मचारी किंवा त्यांचे इतर सुविधेसाठी मागणी केलेप्रमाणे खोल्या उपलब्ध करुन देणे उचित होणर नाही, असे नम्र मत आहे.

सदरची बाब धोरणात्मक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर निणर्यास्तव सादर.

**निर्णय क्र.८८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील विभागाचा अभिप्राय विचारात घेता, श्री.धिरेन भोसले, विमानतळ संचालक, शिर्डी विमानतळ यांची साईआश्रम भक्तनिवास येथे खोल्या मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.४०** **शिर्डी विमानतळाकरीता नेमणुक झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी शुल्क आकारुन साईधर्मशाळा येथे हॉल देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** अधिनियम १७ (२)(ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव :-** निरंक

**प्रस्ताविक:-** श्री.धिरेन भोसले, विमानतळ संचालक, शिर्डी विमानतळ यांचेकडील दि.२०/०९/२०१७ रोजीचे पत्रानुसार शिर्डी विमानतळ लवकरच सुरु होत असुन सुरक्षाकर्मचा -यांना रहाण्यासाठी किमान ४० लोक राहु शकतील या क्षमतेचा संस्थानच्या धर्मशाळेमध्ये हॉल देण्यात यावा. सदर हॉल (सदनिका) सुरुवातीला म.वि.वि.कं.ली. कडे सुपुर्त करण्यात यावा. त्यामध्ये राहाणा-या कर्मचा-याची माहिती म.वि.वि.कं.ली. कडुन संस्थानला वेळोवळी देण्यात येईल. वरील विनंतीनुसार सदर हॉल (सदनिका) शासकीय आवश्यकता म्हणुन प्रथमदर्शी त्वरीत देण्यात यावा, " संदर्भ क्र.२ अन्वये अर्ज असे.

संदर्भ क्र.१ नुसार दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.७० व निर्णय क्र.५९० नुसार. साई मंदिर सुरक्षाकामी नियुक्त केलेल्या व शिर्डी विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणुक होणा-या पोलीस कर्मचा-यांना शासनामार्फत भत्ता मिळत असतो, यामुळे संस्थानमार्फत त्यांची निवासव्यवस्था करणेची आवश्यकत वाटत नाही, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला"

**मागणी –** शिर्डी विमानतळाकरीता नेमणुक झालेल्या पोलीस कर्मचा-यांच्या निवासासाठी सशुल्क आकारुन साईधर्मशाळा येथे हॉल देणे बाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :- १)** दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.७० व निर्णय क्र.५९० अन्वये सुरक्षा कर्मचा-यांची निवासव्यवस्था मोफत करता येणार नाही.

**२)** साई धर्मशाळाकडे सुरक्षा कर्मचा-यांची निवासव्यवस्था करावयाची झाल्यास खालील तपशिलाप्रमाणे सेवा आकार (देणगी पावती) घेवून निवासव्यवस्था करता येईल. त्यासाठी ०२ हॉल करीता दरमहा रु. २४,८००/- (अक्षरी रु. चौवीस हजार आठशे मात्र ) सेवाआकाराची रक्कम होत आहे.

| **अ. नं** | **कर्मचारी संख्या** | **हॉल संख्या** | **प्रति व्यक्ती होणारा सेवा आकार** | **२४ तासासाठी सेवा आकार** | **एक महिनासाठी सेवाआकार (अंदाजे)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४० | **०२ (२० प्रमाणे)** | **रु.२०/-** | **रु.८००/-** | **रु.२४,८००/-** | |

म.वि.वि.कं.ली.यांचे शिर्डी विमानतळ सुरक्षा कर्मचारी निवासस्थाना करीता हॉल (सदनिका) उपलब्ध करुन देण्यासाठी सदरचा निर्णय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थान निवासस्थाने असून बाहेरील कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी ही निवासस्थाने दिल्यास साईभक्तांची गैरसोय होईल. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व यापुढे साईभक्तांखेरीज इतरांनी मागणी केल्यास संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात येऊ नयेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा विभाग)

---

**विषय नं.४१** **श्री.विनायक केशव कुलकर्णी, सहाय्यक पुजारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअन्वये फेरवेतन निश्चिती करणे व अतिप्रदान केलेली रक्कम वसुल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विषय नं.४२** **शैक्षणिक संकुलाकडील कंत्राटी शिक्षीका कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परताव्यासाठीच्या हजर दिवसांची अट शिथील करणेबाबत.**

**विषय नं.४३** **श्री.संतोष गणपत गुठळे, मदतनीस, श्री साईप्रसादालय यांचे गैरशिस्त वर्तनाबद्दल द्यावयाचे शिक्षेबाबत फेरविचार होणेबाबत.**

**विषय नं.४४** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांचे गैरशिस्त वर्तनाबद्दल द्यावयाचे शिक्षेबाबत फेरविचार होणेबाबत.**

**निर्णय क्र.८८३** विषय नं.४१ ते ४४ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.४५** **मोतीचुर लाडू प्रसाद पाकिटे साईभक्तांना विक्री करताना प्रत्येक भक्तास देण्यात येणाऱ्या पाकिटांची संख्या मर्यादित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ नुसार " श्रींचे दर्शन झालेनंतर बाहेरुन येणा-या साईभक्तांना प्रसाद म्हणुन एखादा पदार्थ घरी नेता यावा, या उद्देशाने शुध्द गावराण तुपापासुन मोतीचुर लाडु बनविण्याचे ठरले. सदरचे मोतीचुर लाडु शुध्द गावराण तुपात बनविलेले असल्याने सकस व पौष्टीक असतात, त्यामुळे प्रथतमः दर्शन रांगेमधून साईभक्तांना प्रसाद लाडूचे मोफत वितरण करण्यास मान्यता देण्यात आली होती. साईभक्तांना त्याचा अल्पोपहार/प्रसाद म्हणूनही उपयोग करता येईल, असा मा.त्रिसदस्यीय समितीचा हेतु होता. या सर्व बाबींचा विचार करुन मा. त्रिसदस्यीय समितीने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयास अधीन राहुन दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन साईभक्तांना प्रथमतः दर्शन रांगेमध्ये मोफत लाडू प्रसाद वाटप करणेस मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे निर्णयामध्ये असे स्पष्ट नमुद आहे की, " दर्शन रांगेमध्ये प्रत्येक साईभक्तांस प्रत्येकी ५० ग्रॅमचे दोन लाडू हातात धरणे सोपे होईल, अशा कागदी पिशवीमधुन वाटप करण्यात यावेत. तसेच ज्या साईभक्तांना याव्यतिरीक्त जास्त लाडू प्रसाद पाकिटांची आवश्यक्ता असेल, अशा साईभक्तांसाठी लाडू विक्री काऊंटर चालू ठेवण्यात येऊन, या काऊंटर्सवर प्रत्येकी ५० ग्रॅमच्या तीन लाडूचे एक पाकिट विक्रीसाठी ठेवणेत यावे व सशुल्क लाडू पाकिटाची किंमत रू.१०/- ऐवजी रू.२०/- मात्र प्रति पाकिट ठेवण्यात यावी आणि एका साईभक्तास फक्त दोन लाडू प्रसाद पाकिटे देण्यात यावीत. आपल्याकडील एका दिवसासाठी असलेल्या साठयामधून हि विक्री करणेत यावी. त्या दिवसाचा साठा संपुष्टात आल्यास सशुल्क लाडू विक्री काऊंटर्स त्या दिवसापुरते बंद ठेवण्यात यावे."

परंतु भक्तांची वाढती गर्दी व तयार होणारे लाडु प्रसाद पाकीटे यांचा साठा लक्षात घेता, उपरोक्त संदर्भीय क्र.०२ नुसार "दर्शन रांगेमध्ये भक्तांना १०० ग्रॅम वजनाचे दोन लाडूंचे पाकिट वाटप करण्याऐवजी त्याच वजनाच्या सुटी (लुज) बुंदीचे पाकिट प्रसाद रुपाने देणेस मान्यता देण्यात आली. मात्र प्रसाद लाडू विक्री काऊंटरवर पुर्वीप्रमाणे १५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडूंचे पाकिट विक्रीसाठी ठेवणेत यावे, असे ठरले.

त्याचप्रमाणे उपरोक्त संदर्भीय क्र.०३ अन्वये, दर्शन रांगेत वाटप होणारे सदरहु बुंदी प्रसादाचे पाकिट उघडल्यानंतर साईभक्ताकडून पुर्णपणे प्रसाद खाल्ला जात नाही व तो इतरत्र पडून पायाखाली येतो याकरीता, दर्शनरांगेमधील भक्तांना १०० ग्रॅमच्या बुंदी प्रसाद पाकीटाऐवजी ५० ग्रॅम वजनाच्या बुंदी प्रसाद पाकिटाचे वाटप करण्यात यावे." असे ठरले आहे, त्यानुसार सदरची कार्यवाही दि.०३/०९/२०१६ पासुन सुरु आहे.

मोतीचूर लाडू व सुटी बुंदी प्रसाद निर्मितीसाठी लागणारे किराणा मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची जिलेबी रंग) इ. संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडारकडे मागणीपत्र देऊन त्यांचेकडुन सदरचे मटेरियल घेऊन लाडू व बुंदी प्रसाद निर्मितीचे काम करण्यात येते.

**सन २०१६-१७ मधील मोतीचुर लाडु बाबत तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | दिवसाला सरासरी मोतीचुर लाडु विक्री | २५००० ते ३०००० पाकीटे |
| २ | वार्षिक सरासरी मोतीचुर लाडु विक्री पाकीटे संख्या | ९०,६१,१०० पाकीटे |
| ३ | मोतीचुर लाडु विक्रीव्दारा होणारा आर्थिक भार (तोटा) | रु.१,९२,६४,२४२/- |

सन **२०१६-१७** करीता किराणा मालाचे दर खालीलप्रमाणे आहेत-

| **तपशिल** | साखर | हरभरा दाळ | गावरान तुप | काजु पाकळी | खिसमिस | हिरवी विलायची | जिलेबी रंग | पेपर पिशवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दर** | ३९.०१ | ७६.०० | ३५४.०० | ६९३.०० | १६३.०० | ९५०.०० | १४३.०० | १२९.०० |

माहे मार्च २०१६ ते डिसेंबर २०१६ अखेर ०३ नग लाडु पाकीटाची विक्री किंमत रु.२०.०० इतकी ठेवण्यात आली होती. त्यावेळी ०३ नगाचे (प्रती नग ५० ग्रॅमचा) एक लाडु पाकीट तयार करणेसाठी किराणा मटेरीयल व मजुरी मिळुन सरासरी रु.२०.५३पैसे इतका खर्च आलेला आहे. सन २०१६-१७ मध्ये मोतीचुर लाडु बनविणेकामी मे २०१६ ते डिसेंबर २०१६ या ०८ महिन्यांमध्ये एकुण रुपये रु.१,९२,६४,२४२/- इतका तोटा झाला होता. त्याचप्रमाणे माहे एप्रिल २०१६ मध्ये रु. ६,९०,७६८/- याप्रमाणे, तर माहे जाने.२०१७ ते मार्च २०१७ अखेर ०१ लाडु पाकीटाची किंमत रु.२५/- केल्याने मटेरीयल व इतर खर्च वजा जाता रक्कम रु.२३,३२,९२८/- इतकी रक्कम संस्थानला प्राप्त (नफा) झालेली आहे.

**सन २०१६-१७ मधील लाडु प्रसाद पाकीटे विक्री संख्या व रक्कम**

| **अ.नं.** | **महिना** (सन २०१६-१७) | **एका लाडू पाकीटास आलेला खर्च** | **एका लाडू पाकीटाची विक्री किंमत** | **विक्री पाकीटे X झालेला नफा/तोटा** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१६ | १८.९६ | २०.०० | ६६४२०० X०१.०४ | ६,९०,७६८.०० |
| २ | मे २०१६ | २०.२८ | २०.०० | ७०११०० X -००.२८ | -१,९६,३०८.०० |
| ३ | जुन २०१६ | २३.९१ | २०.०० | ६७७००० X -०३.९१ | -२६,४७,०७०.०० |
| ४ | जुलै २०१६ | २४.७८ | २०.०० | ७५८४०० X -०४.७८ | -३६,२५,१५२.०० |
| ५ | ऑगस्ट २०१६ | २४.३० | २०.०० | ७४८४०० X -०४.३० | -३२,१८,१२०.०० |
| ६ | सप्टेंबर २०१६ | २४.८४ | २०.०० | ६३६५००X-०४.८४ | -३०,८०,६६०.०० |
| ७ | ऑक्टोंबर २०१६ | २३.६७ | २०.०० | ६५८४००X-०३.६७ | -२४,१६,२३८.०० |
| ८ | नोव्हेंबर २०१६ | २२.२० | २०.०० | ८१०५००X-०२.२० | -१७,८३,१००.०० |
| ९ | डिसेंबर २०१६ | २२.४४ | २०.०० | ९४१६००X-०२.४४ | -२२,९७,५०४.०० |
| १० | जानेवारी २०१७ | २४.९० | २५.०० | ९९६५००X००.१० | ९९,६५०.०० |
| ११ | फेब्रुवारी २०१७ | २३.३७ | २५.०० | ७०४८००X०१.६३ | ११,४८,८२४.०० |
| १२ | मार्च २०१७ | २३.५८ | २५.०० | ७६३७००X०१.४२ | १०,८४,४५४.०० |

तसेच माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ अखेर दर्शन लाईनमध्ये साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटे वाटप करण्यात आली, त्यापासुन वार्षिक **रक्कम रु.१९,८०,०७,३२३/-** इतका संस्थानला तोटा झाला आहे. सदरची रक्कम अन्नदान खाती खर्ची टाकण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल व त्यासाठी आलेला खर्च पुढीलप्रमाणे -

| **अ.नं.** | **महिना** (सन २०१६-१७) | **०१ बुंदी पाकीटासाठी खर्च** | **पाकीटाचे वजन** *(ग्रॅममध्ये)* | **वाटप पाकीटे** | **एकुण (रु.)** *(वाटप पाकीटे X खर्च)* |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१६ | १३.४५ | १०० | १२१७७०० | १६३७८०६५.०० |
| २ | मे २०१६ | १३.३३ | १०० | १६९३०५० | २२५६८३५६.५० |
| ३ | जुन २०१६ | १६.०९ | १०० | १६५१२०० | २६५६७८०८.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | जुलै २०१६ | १४.९८ | १०० | १४१५७०० | २१२०७१८६.०० |
| ५ | ऑगस्ट २०१६ | १५.८५ | १०० | १२९६४५० | २०५४८७३२.५० |
| ६ | सप्टेंबर २०१६ | ८.६५ | ५० | ११६९७०० | १०११७९०५.०० |
| ७ | ऑक्टोंबर २०१६ | ८.५८ | ५० | १२३३६०० | १०५८४२८८.०० |
| ८ | नोव्हेंबर २०१६ | ८.३२ | ५० | १५७१२०० | १३०७२३८४.०० |
| ९ | डिसेंबर २०१६ | ८.९९ | ५० | १७४३८०० | १५६७६७६२.०० |
| १० | जानेवारी २०१७ | ९.४९ | ५० | १८२४४०० | १७३१३५५६.०० |
| ११ | फेब्रुवारी २०१७ | ९.०७ | ५० | १२४९८०० | ११३३५६८६.०० |
| १२ | मार्च २०१७ | ९.७१ | ५० | १३०१४०० | १२६३६५९४.०० |
| | **एकुण** | **----** | **----** | **१७३६८०००** | **१९,८०,०७,३२३.००** |

त्याचप्रमाणे सन २०१७-१८ करीता खरेदी विभागाकडुन किराणा मालाचे खालीलप्रमाणे सुधारीत दर प्राप्त झाले आहेत-

| **तपशिल** | साखर | हरभरा दाळ | गावरान तुप | काजु पाकळी | खिसमिस | हिरवी विलायची | जिलेबी रंग | पेपर पिशवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दर** | ४१.९० | ८२.८२ | ३९६.०० | ८६१.०० | १४९.०० | १०८०.०० | १८६.०० | १५९.०० |

माहे ऑगस्ट २०१७ पासुन उपरोक्त सुधारीत दरानुसार किराणा मालाची खरेदी करुन लाडु निर्मिती विभागास पुरविले जात आहे. सदरचे सुधारीत दरांनुसार ०१ लाडु पाकीट (१५० ग्रॅम वजनाचे) तयार करणेसाठी (सर्व खर्च ग्राह्य धरुन) रक्कम रु.२६.७४ पैसे इतका खर्च येत आहे. मात्र सध्या ०१ लाडु पाकीटाची विक्री किंमत रु.२५/- इतकी असल्याने वार्षिक सरासरी होणारी विक्री लाडु पाकीटे (९०,००,००० पाकीटे) X विक्री रक्कम वजा जाता पाकीटासाठीचा अतिरिक्त खर्च (रु.०१.७४ पैसे) = वार्षिक सरासरी रक्कम रु. १,५६,६०,०००/- इतका आर्थिक भार संस्थानवर पडणार आहे.

मात्र उपरोक्त सदर्भीय क्र.०४ नुसार, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.३० निर्णय क्र.७८४ अन्वये, "सध्या लाडू प्रसाद पाकिटे विक्रीसाठी एकाच ठिकाणी काऊंटर्स आहेत व *एका साईभक्तांस फक्त २ लाडूप्रसाद पाकिटे देण्यात येतात, लाडू प्रसाद पाकिटे विक्री केंद्रावर साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होत असते या ठिकाणी लाडूप्रसाद पाकिटे मिळणेसाठी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता संस्थानच्या इतर ठिकाणी (जसे- प्रसादालय व निवासस्थाने) लाडूप्रसाद विक्री केंद्र सुरू करणेत यावीत व साईभक्त मागणी करतील तेवढी लाडू प्रसाद पाकिटे त्यांना उपलब्ध करून देण्यात यावीत. याचबरोबर लाडूप्रसाद पाकिटांचा गैरवापर होऊ नये, याकरीता लाडू प्रसाद पाकिटाची किंमत दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन रू. २५/- मात्र करणेत यावी."* असे ठरले आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन माहे जानेवारी २०१७ पासुन ०३ नगाचे ०१ लाडु पाकीट रु.२५/- इतक्या किंमतीस विक्री करण्यात येत आहे व साईभक्तांना पाहीजे तेवढी (मागणी केल्याप्रमाणे) लाडु प्रसाद पाकीटे विकत देण्याच्या कार्यवाहीस सुरुवात करणेत आली, मात्र मागणी केल्यानुसार लाडु प्रसाद पाकीटे उपलब्ध होत असल्यामुळे व सदरचे शुध्द तुपातील लाडु पाकीटे स्वस्तात मिळत असल्याने लोकांनी सदरचे प्रसाद पाकीटांचा "प्रसाद" म्हणुन वापर करण्याऐवजी अनेकविध कार्यक्रम/उत्सव (उदा. वाढदिवस, जयंत्या, पुण्यतिथी, वास्तुशांती व श्राध्द) साजरे करणेसाठी वापर सुरु केल्याचे आढळुन आलेले आहेत/मागणी करतांना दिसत आहेत. त्यामुळे पाहिजे तेवढी मुबलक लाडु प्रसाद पाकीटे मिळत असल्यामुळे साईप्रसादाचे महत्व दिवसेंदिवस कमी होतांना दिसत आहे. मोतीचुर लाडु प्रसाद बनविणेकामी कमीत कमी ०४ तासांचा अवधी लागतो, त्यामुळे लाडु विक्री काऊंटरवर एका साईभक्तांस जास्तीत जास्त ०२ लाडु पाकीटांची विक्री केल्यास होणा-या गर्दीवर व वाढत्या मागणीतुन प्रसादाचे होणा-या गैरवापरावर नियंत्रण ठेवता येईल. तसेच दर्शन लाईनमध्ये साईभक्तांना वाटप करणेत येत असलेला मोफत बुंदी प्रसादासाठी लागणारे मटेरीयल व त्याचा खर्चही विचारात घ्यावा लागेल. सदरचा प्रसाद बनविणेसाठीही भांडार विभागास आगाऊ मागणी कळवावी लागते. त्यानुसार भांडार विभाग किराणा मालाचा पुरवठा करत असते. त्याचप्रमाणे लाडु निर्मिती करीता शुध्द गावराण तुप, काजु, खिसमिस हिरवी विलायची, साखर व हरभरा दाळ अशा महागड्या किराणा मालाचा वापर केला जात आहे. तसेच किराणा मालाच्या दरांमध्ये वाढ झालेली आहे, तरी देखील मोतीचुर लाडु प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ घेता यावा या

दृष्टीने उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करणेही अनिवार्य आहे. मात्र दिवसेंदिवस भक्तांची वाढती गर्दी व पाहीजे तेवढी लाडु प्रसाद पाकीटांची मागणी आणि लाडु प्रसाद निर्मिती प्रक्रीयेसाठी लागणार वेळ यामध्ये तफावत पडत आहे. पाहीजे तेवढी लाडु प्रसाद पाकीटे देण्याचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार दि.०१/०१/२०१७ पासुन पाहिजे तेवढी पाकीटे देण्यास सुरुवात केल्याने त्या प्रसादाचा वापर वाढदिवस, जयंत्या, पुण्यतिथी व भंडारा इ.साठी उपयोग केला जाऊ लागला आहे. तसेच साईभक्तांची दिवसेंदिवस वाढती संख्या व लाडु प्रसाद निर्मिती यामध्ये खुपच तफावत (फरक) पडत असल्याने साईभक्तांना विक्री करण्यात येत असलेल्या लाडु पाकीटांवर नियंत्रण ठेवुन प्रत्येक साईभक्तांस ०२ लाडु प्रसाद पाकीटे वाटप केल्याने सर्व साईभक्तांना त्याचा लाभ घेता येईल.

तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ पासुन सुरु होत असल्यामुळे साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी वाढण्याची दाट शक्यता आहे. येणा-या साईभक्तांचे संख्येनुसार सर्वांना लाडुचा प्रसाद वितरीत करता यावा या हेतुने लाडु प्रसाद पाकीट विक्रीवर नियंत्रण ठेवणेही गरजेचे आहे. सदरचे काम हे मनुष्यबळाव्दारे (Man Power) करुन घेतले जात असल्याने, व होणा-या संभाव्य गर्दीच्या प्रमाणात लाडु निर्मितीसाठी आवश्यक हवेशिर जागा व साधनसाम्रगीचा अभाव या दृष्टीने विचार केल्यास लाडु पाकीटे विक्रीवर नियंत्रण ठेवणे योग्य राहील असे विभागाचे नम्र मत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** लाडु निर्मिती करीता शुध्द गावराण तुप, काजु, खिसमिस हिरवी विलायची, साखर व हरभरा दाळ अशा महागड्या किराणा मालाचा वापर केला जात असुन, सन २०१७-१८ मध्ये किराणा मालाचे दरांमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे सुधारीत दराने किराणा माल खरेदी करणेत येत असल्याने लाडु प्रसाद निर्मिती कामी येणारा खर्च वाढला आहे. मात्र मोतीचुर लाडु प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ घेता यावा या दृष्टीने लाडुंचे उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करणेही गरजेचे आहे.

तरी उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता मोतीचुर लाडु प्रसादाचा जास्तीत जास्त साईभक्तांना लाभ मिळावा या हेतुने,

**अ)** प्रत्येक साईभक्तांस ०३ नग लाडुचे जास्तीत जास्त ०२ प्रसाद पाकीटे विक्री करता येईल,

**ब)** लाडु पाकीट तयार करणेसाठी येणारा खर्चाचा विचार करता संस्थानवर पडणारा आर्थिक भार कमी करणेसाठी ०१ लाडु पाकीटाची (१५० ग्रॅम वजनाचे) किंमत रु.३०/- करता येईल.

तरी उपरोक्त "अ" व "ब" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८४** **सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊ न शकल्याने तो पुढे ढकलणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फीप्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.४६** **साईभक्तांकरीता उद्यानाची निर्मिती करणे व त्यासाठी लॅंडस्केप आर्कीटेक्टची नेमणूक करणे.**

**विषय नं.४७** **शालेय विद्यार्थी दैनंदिन अभ्यासक्रम नोंद घेणेकामी नवीन डायरी छपाई करुन विद्यार्थ्यांना विक्री करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८८५** उपरोक्त विषय नं.४६ व ४७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.४८** **माहे ऑगष्ट- २०१७ या महिन्यामध्ये प्राप्त झालेले गाईचे तुप, खाद्यतेल व किराणा माल यांचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० नुसार "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्यागावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

त्यानुसार भांडार विभागास प्राप्त होणा-या प्रत्येक नविन बॅचचे गावरान तुपाचे नमुन्यांची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करणेत येत आहे. याशिवाय संस्थानची श्री साई प्रसादालयातील प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेपासुन किराणा माल, गावरान तुप व खाद्यतेलाचे प्रत्येक बॅचचे नमुन्यांची तपासणी त्यांचेकडुनही केली जात आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे मंजूरटिपणीमध्ये संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार भांडार विभागामार्फत दि.०१.०८.२०१७ पासून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेत येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे. त्यानुसार माहे मे २०१७ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेले आहेत. आता माहे ऑगस्ट२०१७ या महिन्यातील तपासणी अहवालांचे परिशिष्ठ यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

संस्थानला प्राप्त गावरान तुपाचे नमुने वेळोवेळी वरिष्ठांचे सूचनेप्रमाणे तपासणीसाठी १) जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नासिक, २) रिजनल अॅगमार्क लॅबोरेटरी, मुंबई, ३) केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, ४) फूड हायजिन अॅन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे, ५) अश्वमेध इंजिनिअर्स अॅन्ड कन्सलटंन्टस, नासिक, यांचेसह संस्थानचे प्रयोगशाळेत पाठविणेत आलेले होते.

त्यापैकी **अ)** जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (शासकीय प्रयोगशाळा), नासिक, यांचेकडील १) Batch No. C1(53) Dt.16.07.2017 व २) Batch No.F (58) Dt.27.07.2017 चेतपासणी अहवालात "The above samplesdoes not conformsto the standards of Ghee as per F.S. & S. (Food products and Additives) Regulations 2011" असे नमुद आहे.

तसेच ब) केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचे Batch No. A-1, B1 & C1, (53) Dt.16.07.2017 चे तपासणी अहवालातील अ.नं. ८ मध्ये Test of Rancidity Positive नमुद आहे, Food Safety & Standards Act. 2006 & Rules & Regulations 2011 नुसार ती Negative असते.

**क)** उर्वरित सर्व प्रयोगशाळांचे तपासणी अहवालात उपरोक्त बॅचचे गावरान तुप, खाद्यतेल व किराणा माल Food Safety & Standards Act. 2006 & Rules & Regulations 2011 नुसार बरोबर असल्याचे नमुद आहे. सोबत तपासणी अहवालाचे परिशिष्ठ पा.नं. १ ते ७ तसेच सर्व तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत.

तरी सोबतचे परिशिष्ठ (पा.नं.१ ते ७) प्रमाणे गावरान तुप, खाद्यतेल व किराणा माल प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे ऑगष्ट- २०१७ या महिन्यामध्ये प्राप्त झालेले गाईचे तुप, खाद्यतेल व किराणा माल यांचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करणेत आले. त्यामधील केंन्द्रीय खाद्य प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर या प्रयोगशाळेच्या अहवालामध्ये Rancidity आढळून आली आहे. मात्र इतर सर्व Parameter व अहवाल योग्य आहेत. मात्र म्हैसूर येथील प्रयोगशाळेच्या अहवालावरुन सदर तूप जास्त काळ साठा करण्यासाठी योग्य नसल्याने या तुपाचा पुढील पुरवठा थांबविण्यात यावा व भांडार विभागामध्ये शिल्लक असलेल्या तुपाच्या प्रत्येक बॅचची संस्थानचे प्रयोगशाळेकडून तपासणी करुनच, त्याचा वापर करणेत यावा. सध्याचे तुपाचे पुरवठाधारक स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचा तीन वर्षासाठी काळया यादीत समावेशक करणेत येऊन, तसे त्यांना लेखी कळविण्यात यावे.**

**तसेच संस्थानसाठी वार्षिक गाईचे तुप खरेदी करणेकामी नव्याने ई-निविदा प्रकिया राबविणेत यावी. सदरहू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत गाईचे तुपाअभावी अडचण येऊ नये, याकरीता अल्प कालावधीची (०५ दिवस) दरपत्रके (तातडीची खरेदी) मागविणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, गाईचे तुप खरेदी करणेत यावे व यासाठी येणारा वाढीव खर्च स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचेकडील जमा अनामत रकमेतून वसूल करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.४९** **बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्स) श्री साईनाथ रुग्णालयात एक ईएनटी सर्जनची सेवा उपलब्ध करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८८७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५०** **ॲड संजय आर.चौकीदार यांची वकील फी आदा करणे.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थान विरुद्ध दाखल झालेल्या खालील तक्त्यातील दाव्यामध्ये संस्थानचे वतीने ॲड. संजय आर. चौकीदार यांनी कामकाज पाहिले आहे. संस्थानचे वतीने खालील कोर्ट केसमध्ये कामकाज पाहिल्याबाबत संदर्भ क्र. १ ते ३ बीलाने फीची मागणी केलेली आहे.

| **अ.नं.** | **दावा नंबर/ क्रिमीनल ॲप्लीकेशन** | **वकील फी चा तपशील** | **मागणी केलेली वकील फी रु.** |
|---|---|---|---|
| ०१. | रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ डॉ. दादासाहेब लुमा कांबळे (त्वचारोग तज्ञ) विरुद्ध श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | प्रोफेशनल / लिगल फी,<br>स्टेनो, टायपिंग, झेरॉक्स,<br>कोर्ट फी व इतर | ५,०००/-<br>१०,०००/-<br>५,०००/- |
| ०२. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुद्ध डॉ. हरीष हुकूमचंद बजाज क्रिमीनल ॲप्लीकेशन नंबर ३४१५/२०१६ मध्ये क्रिमीनल ॲप्लीकेशन नंबर २५४५/२०१६ | प्रोफेशन / लिगल फी<br>कोर्ट फी | ५,०००/-<br>१५,०००/- |
| ०३. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुद्ध डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा क्रिमीनल ॲप्लीकेशन नंबर २५४२/२०१६ मध्ये क्रिमीनल ॲप्लीकेशन नंबर ३४२०/२०१६ | प्रोफेशन / लिगल फी<br>कोर्ट फी | ५,०००/-<br>१५,०००/- |
| | | **एकूण रक्कम रु** | **६०,०००/-** |

**अ.नं. १** मध्ये रीट पिटीशन क्र. १०७०८/२०१७ डॉ. दादासाहेब लुमा कांबळे (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांनी संस्थान विरुद्ध मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रीट पिटीशन नं. १०७०८/२०१४ ही कोर्ट केस दि. २७-११-२०१४ रोजी दाखल केली आहे. सदर कोर्ट केसमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

**A)** Call for record and proceedings.

**B)** Issue a writ of mandamus or any other appropriate writ, order or directions thereby directing the Respondent No. 1 to grant and pay the scale and all other service benefits to the Petitioners from the date of joining i.e. 14-10-2015 and order dated 10-4-2010 passed by the Respondent No. 1 bearing Outward No. SSS/VS-01/1205/2014 (Annexed at Exhibit – "G" may kindly be modified accordingly.

**C)** Pending hearing and final disposal or present Writ Petition, the Respondent No. 1 may kindly be directed to pay the salary of the Petitioner by applying the pay-scale from date of 10-10-2015 and for that purpose issue necessary writ, order or directions.

**D)** Grant ad-interim relief in terms of prayer clause – (C).

**E)** Pass any and order just and equitable orders in the interest of justice in favour of the Petitioner.

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४संस्थानसाठी लागु केला असुन, त्या अनुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम-२००४ मध्ये कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार, "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, राज्यशासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगतवर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील. व कलम २९(१) मधील तरतुदीनुसार समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक साहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक साहाय्य मागण्यामागील उददेश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील '' अशी तरतुद आहे.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्यविधी व न्याय विभाग यांनीजा.क्र.सासंवि/१०१७/३४२/प्र.क्र.४४/का-१६ दि.१४ एप्रिल, २०१७ अन्वये मे.मुकुंद एम.चितळे अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंट्स मुंबई यांचेकडून वैधानिक लेखापरिक्षण करुन घेण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन त्यांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ चे वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण केले असुन, आजचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणार आहेत. सदर अहवालाची नोंद घेऊन त्याची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्तांना सादर करणे आवश्यक आहे. अहवालात निदर्शनास आणुन दिलेल्या दोष/अपुर्ततांची दोष दुरूस्ती संबधीत विभागांकडून करुन दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल. संस्थान अधिनियम-२००४मधील कलम २९(२) नुसार दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) नागपुर येथे होणा-या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे बंधनकारक आहे.

तरी आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणेस व त्याची एक प्रत राज्य शासनास नागपुर येथे होणा-या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणेकामी व एक प्रत धर्मादाय आयुक्त यांना सादर करण्यास, त्याचप्रमाणे संस्थानचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करणेस, मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८९८** **लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणेसाठी आजचे सभेसमोर मे.मुकुंद एम.चितळे कं. चार्टर्ड अकौटंट्स, मुंबई हे उपस्थित होते. सभेने विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१६- २०१७ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यावर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार यांचे मुदतवाढ, वेतनवाढ व निवास व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**प्रस्ताव–** मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे मुदतवाढ,वेतनवाढ व निवास व्यवस्थेबाबत..

**प्रस्तावना–** संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादर करणेत आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे.

मालमत्ता विभागाकडे सध्यस्थितीत खालीलप्रमाणे कामकाज सुरु आहे.

१) संस्थानचे मिळकत रजिस्टर अद्ययावत ठेवणे.

२) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी जमीनी खरेदी करणेकामी तसेच आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जमीनी खरेदी करणेकामी संस्थानकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे,जागेची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

३) देणगी स्वरुपात मिळकती स्विकारणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे,मिळकतीची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

४) खरेदी केलेल्या मिळकतींच्या व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या मिळकतींच्या नोंदी महसुल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) खरेदी घेतलेल्या व दान स्विकारलेल्या मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्दी निशाण्या ठरवून घेणे.

६) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतचे प्रकरणी समन्वय साधून उचित कार्यवाही करणे.

७) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेसबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

८) संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर दिलेल्या अथवा द्यावयाच्या मिळकतींचे करारनामे करुन घेणे.

९) संस्थानचे मालमत्तेबाबतचे शासकीय कर,नगरपंचायत कर व ग्रामपंचायत कर इभरणेबाबत कार्यवाही करणे.

१०) संस्थानने भाडेपट्टयाने घेतलेल्या मिळकतींचे भाडे व स्थानिक कर भरणा करणे.

११) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पालखी थांब्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा उपलब्ध करणे, जागेची निश्चिती करणे व पुढील उचित कार्यवाही करणे.

१२) सर्व राज्यातील मुख्य शहरात संस्थानचे माहीती केंद्र उभारणेकामी जागा उपलब्ध करणे.

१३) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे जमीनी अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही करणे.

१४) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीनी कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचे प्रस्ताव व तद्नुषंगाने कार्यवाही करणे.

१५) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे,वरिष्ठांना अहवाल सादर करणे.

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर प्रथमत: दि.२६/१०/२०१५ पासून इकडील दि.१०/१०/२०१५ रोजीच्या मंजूर कार्यालयीन टिपणीप्रमाणे प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६६ अन्वये त्यांच्या नेमणूकीची मुदत दि.१९/१०/२०१६ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मासिक रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,सेवानिवृत्त नायब तहसिलदार तथा कं.सल्लागार,मालमत्ता विभाग यांनी इकडेस दि.०१/०८/२०१७ रोजी मानधन वाढवून देणेकामी अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी मी श्री साईबाबा संस्थान,शिर्डी येथे दि.२६/१०/२०१५ पासून मालमत्ता विभागात मासिक मानधन तत्वावर कार्यरत आहे. मला माहे सप्टेंबर-२०१६ पासून दरमहा रु.१५,०००/- इतके मासिक मानधन दिले जात आहे. मात्र रजा सवलत,शासकीय सुट्टया वगैरे इ.सवलती दिल्या जात नाहीत. त्यामुळे मी काही अडचणीच्या वेळेस एक दोन दिवसांची सुटी घेतली तर त्या दिवसांचा माझा पगार कापला जातो. परिणामी मला दरमहा रु.१५,०००/- पेक्षाही कमी पगार मिळतो. माझे कुटूंब संगमनेर येथे राहते व मी नोकरीनिमित्त शिर्डी येथे राहतो. त्यामुळे माझा दोन्ही ठिकाणी खर्च होत आहे. सदरचे मानधन हे अत्यल्प असल्याने व महागाई भयंकर वाढलेली असल्याने मला माझा

कुटूंबाचा खर्च भागविणे कठीण होत आहे. तरी मी केलेल्या कामाचा,विशेषत महागाईचा व माझे पदाचा विचार करुन माझे मासिक मानधन किमान रु.२५,०००/- करण्यात यावे,अशी विनंती केलेली आहे.

तसेच दि.१२/०८/२०१७ रोजी त्यांनी अर्ज सादर करुन त्यात मी संगमनेर येथील रहिवाशी असून मला दररोज जाणे-येणे अडचणीचे होत असल्याने संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील एक छोटी रुम मोफत वास्तव्यासाठी मिळणेकामी विनंती केलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी मागील वर्षी खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेसाठी प्राप्त झालेले प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केली आहे.

२) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला नोंदी करुन घेतल्या आहेत.

३) संस्थान मालमत्तेबाबतचे स्थानिक शासकीय कर भरणेकामीची प्रकरणे तपासून घेतली. त्यात निमगाव-को-हाळे ग्रामपंचायतीकडील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवर (ग्रामपंचायत मिळकत नं.१४०५) ग्रामपंचायतने सन २०१३-१४ ते सन २०१७-१८या वर्षासाठीची ग्रामपंचायत कर आकारणीची रक्कम रु.६३,९०,०००/-इतकी (प्रति वर्षी रु.१२,७८,०००/-प्रमाणे) भरणेस कळविलेली होती. सदरची कर आकारणी ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार कमी करणेकामीचे प्रकरण तयार करुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ साठीची कर आकारणीची रक्कम रु.२५,५६,०००/- इतकी सूट मिळविलेली आहे व पुढील सन २०१५-१६,सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या तीन वर्षासाठीची कर आकारणी ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार किमान दराने (प्रति वर्ष रु.६,३९,०००/- या दराने) आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

४) मौजे घारी, ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन२००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामी प्रकरण करुन पाठपुरावा केलेला आहे.

५) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र मार्ग परिवहनमहामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याबाबतचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क प्रकरणी कामकाज केले आहे.

६) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथीलइमारती बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्तकरुन तपासून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतची कार्यवाही पूर्ण केली आहे.

७) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

८) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले.

९) सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्या.सिन्नर यांचा मौजे मुसळगाव शिवारातील ३६०० चौ.मीटर जागेचा प्लॉट दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने संस्थानने घेतलेला असून सदर ठिकाणच्या पालखी थांब्याची ग्रामपंचायत कराची रक्कम माफ करुन मिळणेकामी प्रकरण तयार करुन ग्रामपंचायत, मुसळगाव यांचेकडेस सादर केलेले आहे.

१०) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे करणेकामी मार्गदर्शन केले आहे.

११) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेल्या भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केला आहे.

१२) संस्थानच्या मिळकती संबंधातील विविध न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये मार्गदर्शन केले.

१३) संस्थान मालमत्तेची देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणींबाबत मार्गदर्शन केले.

**विभागाचा अभिप्राय-** १) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची नेमणूकीची मुदत दि.१८/१०/२०१७ अखेर संपत आहे. त्यांनी उपरोक्तप्रमाणे समाधानकारक कामे केलेली असून मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात देखील मार्गदर्शन केलेले आहे. सन २०१८ हे श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्ष असल्याने कामाच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टिने यापुढेही त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे. तरी दि.१९/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१९ या दोन वर्षाचे कालावधीसाठी त्यांची प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून एकत्रित मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देता येईल.

२) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना रजा व सुटी सवलत नसल्याने त्यांचे मानधनातून रजेचे व सुटीचे पैसे कपात केले जातात. त्यासाठी त्यांनी रजा व सुट्टया सवलत मिळणेसाठी विनंती केलेली आहे. तरी त्यांना रजा व सुट्टया देय करणेकामी निर्णय घेता येईल.

३) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी यापूर्वी केलेल्या कामाचा विचार करुन मासिक मानधन रु.२५,०००/- मिळणेबाबत विनंती केली आहे. तरी पूर्वीचे मानधन रु.१५,०००/- मध्ये रु.५,०००/- ची वाढ करुन मासिक मानधन रु.२०,०००/- करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे चर्चा करुन निर्णय घेता येईल.

४) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) हे संगमनेर येथील रहिवाशी असून त्यांनी संस्थानचे दैनंदिन कामकाजाचे दृष्टिने शिर्डी येथे वास्तव्यास राहणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीतील एक छोटी रुम मोफत वास्तव्यासाठी देता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार, मालमत्ता विभाग यांना पुर्वीच्याच अटी/ शर्ती व एकत्रित मानधनावर, त्यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या तारखेपासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. त्याचबरोबर श्री.वालझडे यांना निवासासाठी शांतिनिकेतन इमारतीमधील एक खोली देण्यात यावी व दरम्यानचे कालावधीमध्ये मालमत्ता विभागासाठी कंत्राटी पध्दतीने सल्लागार मिळणेसाठी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१०** **महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी दि.२४.१०.२०१६ रोजीच्या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीन क्षेत्र ३०१.८४ हेक्टर इतके संस्थानला दि.२४/१०/२०१६ रोजीच्या प्रस्तावाप्रमाणे कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामी कार्यवाही करणे.

**प्रस्तावना–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विविध प्रयोजनांसाठी मोठया प्रमाणात जमीनीची आवश्यकता असल्याने यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीच्या सभेत निर्णय क्रं.७४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे,शिर्डी,साकुरी, सावळविहीर बु., सावळविहीर खु. व चांदेकसारे/ सोनेवाडी येथील शेती महामंडळाची ३०१.८४ हेक्टर जमीन दुय्यम निबंधक यांनी कळविलेल्या रु.३६९,२८,९०,५३०/- मात्र मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली व तसा

प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे व मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सुधारीत प्रस्तावात खालील जमीनी दर्शविण्यात आल्या होत्या.

| **अ.नं.** | **गावाचे नाव** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ७१.०५ |
| २ | शिर्डी | ११.६२ |
| ३ | साकुरी | १३.८२ |
| ४ | सावळविहीर बु. | ७५.६१ |
| ५ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ६ | चांदेकसारे/सोनेवाडी | ९६.०७ |
| | **एकूण** | **३०१.८४** |

सदर जमीनी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३८९८/२०१६ दि.२४/१०/२०१६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडे सादर करणेत आला व प्रत मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला आहे

तद्नंतर सन २०१७-१८ हे श्रीं चे समाधी शताब्दी वर्ष असल्याने या कालावधीत साईभक्तांच्या गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असलेने त्यासाठीचे नियोजन करणे, साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्किय सेवा या मुलभूतसोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे, उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ.साठी संस्थानला नजीकची जमीन तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून संस्थानचे मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.२८/०३/२०१७ रोजी शेती महामंडळाकडील जमीनींची समक्ष पाहणी केली असता त्यात मौजे निमगाव-को-हाळे येथील एकूण क्षेत्र ४०.७३ हेक्टर आणि शिर्डी येथील ११.६२ हेक्टर असे एकूण ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र संस्थानच्या जमीनींच्या अत्यंत लगत असलेने सदर जमीनी श्रीं चे समाधी शताब्दी वर्षासाठी संस्थानला अत्यंत उपयुक्त ठरणार असलेचे मत झालेने पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३२४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय करणेत आलेला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडे सादर करणेत येवून त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई यांना देणेस व सदरहू जमीन माद्ुयम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.”

त्याप्रमाणे मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ अन्वये सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात आला. उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.क्रं.शे.व्य./ श्री.सा.सं.वि.शि./ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ अन्वये “महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ यातील कलम २८-१ अ पोटकलम १ अन्वये महामंडळास भोगवटा मुल्यावर देण्यात आलेली आहे. तसेच कलम ३-अ अन्वये जमीन माजी खंडकरी शेतक-यांना वाटपाचे काम चालू आहे. तथापि वरील जमीनीपैकी मौजे निमगाव-को-हाळे व सावळविहीर येथील जमीनीबाबत काही माजी खंडक-यांनी मा.उच्चन्यायालय,मुंबई,खंडपीठ,औरंगाबाद येथे याचिका क्रं.५८८६/ २०१४ दाखल करुन दि.०५/०८/२०१४ रोजी जमीन वाटपास अंतरिम स्थगिती आदेश मिळवला आहे. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथून स्थगिती आदेशाबाबत अंतिम निर्णय लागल्याशिवाय मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना खरेदीने उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही.” असे इकडेस कळविलेले आहे. तद्नुषंगाने उक्त रिट पिटीशन मधील स्थगिती आदेश उठविणेकामी व उपरोक्त जमीनी संस्थानला कायम खरेदी करणेस परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात संस्थानतर्फे संस्थान पॅनलवरील वकील

ॲड.नितीन भवर यांचेमार्फत मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन (इंटरव्हेंशन) नं.१२५९६/२०१७ चे दाखल करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील WRIT PETITION NO.5886 OF 2014 WITH CIVIL APPLICATION NO 12596 OF 2017 IN WRIT PETITION 5886 OF 2014 मध्ये दि.०९/१०/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

ORAL ORDER :

ShriKulkarni, learned Counsel for the petitioners, upon instructions, makes motion for withdrawal of the petition, with a prayer for issuance of direction to the respondent Collector to decide the representation in relation to the allotment of land, which was earlier claimed to have been owned by the petitioners or their ancestors.

2. Liberty is granted to the petitioners to file fresh representation in relation to the land claimed to have been owned by them to the concerned Competent Authority for its allotment. If such representation is made, the same be expeditiously decided by the respondent-Collector or the Competent Authority.

3. With above observations, the petition stands dismissed as withdrawn.

4. In view of dismissal of the petition, pending Civil Application stands disposed of.

मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे उपरोक्त निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांच्या लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानने कायम खरेदी करुन मिळणेकामी मागणी केलेल्या जमीनींचे संदर्भात वाद संपुष्टात आलेले आहेत. परिणामी स्थगिती आदेश रद्द झालेले आहेत. त्यामुळे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांचेकडील उपरोक्त पत्र जा.क्रं.शे.व्य./ श्री.सा.सं.वि.शि./ ज.मा./ लक्ष्मी/१७-१८/ १५६ दि.०३/०५/२०१७ चे निरर्थक झालेले आहे.

**विभागाचा अभिप्राय -** उपरोक्त निर्णय क्रं.७४५ अन्वये झालेल्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन क्षेत्र ३०१.८४ हेक्टर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदीने मिळणेबाबतच्या इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३८९८/ २०१६ दि.१३/१०/२०१६ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे जमीनी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळाव्यात यासाठी मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांचेकडेस पुन:श्च मागणी करता येईल व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग यांना व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करता येईल त्यासाठी, तसेच उक्त जमीन ३०१.८४ हेक्टर इतके क्षेत्राची सन २०१६-१७ या वर्षाचे मा.दुय्यम निबंधक, राहाता यांनी रक्कम रु.३६९,२८,९०,५३०/- (अक्षरी रु.तीनशे एकोणसत्तर कोटी अठ्ठावीस लाख नव्वद हजार पाचशे तीस मात्र) इतके मुल्यांकन निश्चित केलेले आहे. त्यात सन २०१८ चे मुल्यांकनाप्रमाणे अल्पशी वाढ होण्याची शक्यता गृहीत धरुन जे मुल्यांकन दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडून निश्चित होईल त्या रकमेस उक्त क्षेत्र खरेदी घेता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी जागेची पहाणी करुन, त्या जागेचे स्थान, उपयुक्तता, त्यावरील अतिक्रमण याविषयी खात्री करुन सविस्तर फेरप्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **3T MRI मशीन व 128 Slice CT Scan मशिनचे खरेदीसाठी सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणे आणि खरेदीसाठी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **संदर्भ:** 1) मा.व्य. समितीच्या दि. १६/०८/२०१७ सभेतील निर्णय क्र. ५५९ (128 Slice CT scan मशीनचे खरेदी)

2) मा.व्य. समितीच्या दि. 08/09/17 सभेतील निर्णय क्र. 788 (**3T** MRI मशीनचे खरेदी)

3) दि. 25/09/17 ची मंजुर टिपणी

श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन 3T MRI मशीन खरेदीकरीता M/s. Siemens यांचे कडून अंदाजे किंमतीचे कोटेशन मागवून अंदाजे रु.८,५०,००,०००/- इतक्या रकमेस मान्यता घेण्यात आली. त्यानुसार तिसयांदा दि. ०७/०७/१७ ते दि. १७/०७/१७ पर्यंत निविदा काढण्यात आल्या होत्या. तांत्रिक ई-निविदा दि. ०४/०८/१७ रोजीच्या सभेत उघडण्यात आल्या. दि.१६/०८/१७ रोजी खरेदी समिती सभेसमोर 3T MRI मशीन करीता प्राप्त तीन Commercial ईनिविदा उघडण्यात आल्या. तीनही कंपन्यांनी दिलेले वितीय दरांनुसार M/s. Philips यांचे दर निम्नतम (L1) आहेत, M/s. Wipro GE Healthcare यांचे दर व्दीतीय निम्नतम (L2) आहेत व M/s. Siemens यांचे दर तृतीय निम्नतम (L3) आहेत.

3T MRI मशीन खरेदीकरीता निम्नतम दरधारकांचे अंतीम दर हे रु१२,४३,३७,९८१/- इतके आहेत. त्यामुळे मा.अध्यक्ष साहेब यांनी मा.वैद्यकीय संचालक यांना Estimate cost पेक्षा Final Cost मध्ये वाढ झालेबाबत अहवाल देणेस तोंडी आदेश दिले आहेत. त्यानुसार दोन्ही किंमतीमध्ये झालेला फरक (वाढ) खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Estimate (Specification/cost) Siemens - Model – MAGNETOM Spectra | Present Tender Specs. | Approx. Cost Difference given by M/s. Siemens Model – Skyara 48 | Approx. Cost Difference given by M/s. Philips Model – Ingenia 3.0T Digital |
|---|---|---|---|---|
| 1 | 24 channels System + coils<br>60mm bore<br>Model – MAGNETOM Spectra | 32 channels System + coils<br>70mm bore | 2.5 crores | 2 crores |
| 2 | 1 year Warranty | 5 year warranty (+ 4 year warranty added) | 2 crores | 2 crores |
| 3 | No MR Elastography Application | MR-Elastograpy application added | 1.5 Crores | 75 Lakhs |
| 4 | MR-Pulse oximeter<br>(5 Lacks) | MR-Multipara monitor (45 Lacks) | 40 Lacks | 25 Lacks |
| 5 | ----- | MR -Anesthesia Workstation added | 25 Lacks | 28 Lacks |
| 6 | ----- | Pressure Injector added | 25 Lacks | 22 Lacks |
| 7 | ----- | Turnkey added as site changed | 20 Lacks | 15 Lacks |
| 8 | Hand held metal detector (2 Lacks) | Metal detector poletype (11 Lacks) | 09 Lacks | 10 Lacks |
| 9 | VAT to GST rate change & Changes in Custom Duty | | 40 Lacks | 40 Lacks |
| | **Total increase in Cost in Rs. (approx.)** | | **7.59 Crores** | **6.15 Crores** |
| | Previous Estimate (Dt. 08/05/16) Cost in Rs. | | 8.50 Crores | 8.50 Crores |
| | **Final Estimated cost ( Approx.) in Rs.** | | **16.09 Crores** | **14.65 Crores** |

उपरोक्तपैकी M/s. Siemens यांचे प्रतिनिधी श्री विकास नायक यांनी दि०१/०९/२०१७त्यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान उपरोक्त फरकाची रक्कम सांगितली आहे, परंतु त्यांनी उपरोक्त किमंतीतील फरक लेखी देण्यास असमर्थता दर्शविली आहे आणि M/s. Philips यांचे दर त्यांनी त्यांचे दि.०७/०९/२०१७ रोजीचे ईमेल व्दारे कळविले आहे.

त्यानुसार 3T MRI मशीनचे खरेदीसाठी निविदा काढणेपुर्वी M/s. Siemens यांचेकडून घेतलेल्या अंदाजपत्रकापेक्षा प्रत्यक्ष निविदा काढतेवेळी वापरकर्ते यांचे मागणीनुसार अदयावत सॉफटवेअर व हार्डवेअर यांचा समावेश करण्यात आला तसेच वॉरंटी एक वर्षाऐवजी आणखी ०४ वर्षाकरिता अशी एकुण ०५ वर्षाकरिता मागणी करण्यात आली. दरम्यानच्या काळात केंद्रीय कर प्रणालीत बदल होऊन त्यामुळे किंमतीत वाढ झालेली आहे. या सर्व कारणांमुळे 3T MRI मशीनचे खरेदीसाठी निविदा काढणेपुर्वी M/s. Siemens यांचेकडून घेतलेल्या अंदाजपत्रकापेक्षा प्रत्यक्ष निविदेची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्राप्त झालेल्या अंतिम दरामध्ये सरासरी अंदाजे रु. ६,८७,००,०००/- इतकी वाढ दिसत आहे.

तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल साठी नवीन 128 slice CT Scan मशीन खरेदी करीता M/s. Siemens यांचे कडून दि १३/०२/२०१६ रोजीच्या घेतलेल्या अंदाजे किंमतीचे कोटेशन मागवून अंदाजे रु.५,६०,00,000/- इतक्या रकमेस मान्यता घेण्यात आली. परंतु प्रत्यक्ष निविदा काढतेवेळी वापरकर्ते यांचे मागणीनुसार मुळ कोटेशन पेक्षा अदयावत सॉफटवेअर व हार्डवेअर यांचा समावेश करण्यात आला तसेच वॉरंटी एक वर्षाऐवजी आणखी ०४ वर्षा करिता अशी एकुण ०५ वर्षाकरिता मागणी करण्यात आली. त्यानुसार दि.०७/०७/२०१७ ते दि. १७/०७/२०१७ पर्यंत निविदा काढण्यात आल्या होत्या. दोन कंपन्यांनी (M/s. Siemens व M/s. Philips) 128 slice CT Scan मशीन करीता ऑनलाईन ई-निविदा सादर केल्या आहेत. तांत्रिक ई-निविदा दि. ०४/०८/२०१७ रोजीच्या सभेत उघडण्यात आल्या. अद्याप Commercial ईनिविदा उघडण्यात आल्या नाहीत.

दरम्यानच्या काळात केंद्रीय कर प्रणालीत बदल होऊन त्यामुळे किंमतीत वाढ झालेली आहे. या सर्व कारणांमुळे 128 slice CT Scan मशीनचे खरेदीसाठी निविदा काढणेपुर्वी M/s. Siemens यांचेकडून घेतलेल्या अंदाजपत्रका पेक्षा प्रत्यक्ष निविदेची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्राप्त झालेल्या अंतिम दरामध्ये देखील सरासरी अंदाजे रु. ४,00,00,000/- इतकी वाढहोउशकेल.

तसेच 3T MRI मशीनचे खरेदीसाठी Estimate cost पेक्षा Final Cost मध्ये सरासरी अंदाजे रु. ६,८७,००,००० इतकी वाढ झाले असल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक (रु.८,५०,०००००+रु.६,८७,०००००) रु.१५,३७,००,०००/- इतके अंतिम अंदाज पत्रक झालेलेदिसून येत आहे.

तरी नवीन 3T MRI मशिन खरेदी करिता अंदाजे रु.१४,००,००,०००/- ते रु.१६,००,००,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाज पत्रकास मान्यता घेणेसाठी व नवीन 128 slice CT Scan मशिन खरेदी करिता अंदाजे रु.९,००,००,०००/- ते रु.११,००,००,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाज पत्रकास मान्यता घेणेसाठी आणि नवीन 3T MRI मशीन व नवीन 128 slice CT Scan मशीन खरेदी करीता मुळ अंदाजपत्रकापेक्षा सुधारीत अंदाज पत्रकात अंदाजे ५० % ते १००% इतकी वाढ झाले असल्यामुळे सध्याची खरेदी प्रक्रिया सुरु ठेवावी अथवा रिटेंडर करावे किंवा कसे याबाबतीत निर्णय होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९०१** **आर्थिक वर्ष २०१६- २०१७ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत वैधानिक लेखापरिक्षक मे.मुकुंद एम.चितळे कं. चार्टर्ड अकौटंट्स, मुंबई हे उपस्थित होते. उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेली 3T MRI मशीन व नवीन 128 slice CT Scan मशीन खरेदीकामीची खरेदी प्रक्रिया सुरु ठेवावी किंवा कसे याबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, याकामी फेर-ई-निविदा मागवाव्यात, असे त्यांनी कळविले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वैधानिक लेखापरिक्षक मे.मुकुंद एम.चितळे कं. चार्टर्ड अकौटंट्स, मुंबई यांनी सभेसमोर कळविलेनुसार, 3T MRI मशीन व 128 Slice CT Scan मशिन खरेदी करणेकामी नव्याने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू खरेदीकामी यापुर्वी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या दरांपेक्षा सुधारित अंदाजपत्रकीय दर जास्त दिसून येत आहे. याकरीता सुधारीत अंदाजपत्रक अचूक करुन, सभेसमोर सादर करावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईप्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरिंग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.३९६ अन्वये खालील प्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो*

*बसविणेबाबत प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र.१ नुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:** श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरिंग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी विहित पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३९६ अन्वये मान्यता देणेत आलेली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे सदरहू निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. याकामा साठी दि.०१/०८/२०१७ रोजी झालेल्या प्री –बीड मिटींगमध्ये सदरहू कामासाठी द्यावयाचे दर हे जीएसटीसह देण्यात यावेत असे नमूद केले होते. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.०१/०८/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. या मुदतीत खालील तीन ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या होत्या.

| **अ.न.** | **ठेकेदाराचे नाव** |
|---|---|
| १ | C4 Infrastructure Pvt. Ltd. Nashik |
| २ | Shri D.S. Shewale, Junnar, Pune |
| ३ | Shri R.K. Sawant, Nashik |

वरील प्राप्त ई-निविदांचे तांत्रिक लिफाफे मा खरेदी समितीचे दि.०४/०८/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले असुन ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छानना केली असताउपरोक्त तीनही ठेकेदार पात्र झाले आहेत.ठेकेदार यांनी सादर केलेल्या ई-निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.१९/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आला असुन त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.न.** | **ठेकेदाराचे नाव** | **रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | C4 Infrastructure Pvt. Ltd. Nashik | रु. २,१०,३४,७४०/- | -- |
| २ | Shri D.S. Shewale, Junnar, Pune | रु. २,००,६३,१५५/- | -- |
| ३ | Shri R.K. Sawant, Nashik | **रु. १,८९,६२,२२३/-** | निम्नतम |

यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४० अन्वये निम्नतम दर देऊ करणारे ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांना कार्यादेश देणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मध्ये सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामीआर. के. सावंत, नाशिक यांचे रु.१,८९,६२,२२३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले."

GST अंमलबजावणी नंतर कंत्राटात होणाऱ्या बदलाबाबत महाराष्ट्र शासनाचा दि. १९/०८/२०१७ रोजीचा आदेश खरेदी विभागाने दि.१५/०९/२०१७ रोजीच्या पत्रासोबत दिलेला आहे. सदर आदेशात खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

*"२(अ) निविदा दाखल करतांना कंत्राटदार त्या दिनांकास अस्तित्वातल्या कराचा दर लक्षात घेऊन कंत्राटाची किंमत Quote करत असतात. निविदा जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर व दि २८/०८/२०१७ पुर्वी दाखल केली असल्यास, कंत्राटदाराने जीएसटीचा सर्वसाधारणपणे Construction service वरील अस्तित्वातल्या कराचा दर एकत्रित १८% (०९ % CGST+०९% SGST) लक्षात घेऊन किंमत Quote केली असेल, मात्र सदरचा कराचा दर दि. २२/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचना क्र. २०/२०१७ Central Tax Rate व २०/२०१७ State २०/२०१७ अन्वये, बहुतशः शासकिय कार्यकंत्राटावर १२% (०६% CGST+०६% SGST) झाला आहे. त्यामुळे कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा."*

ठेकेदार आर के सावंत यांनी सदरहू कामासाठी देऊ केलेले दर हे जीएसटीसह असल्याचे तसेच याकामासाठी जीएसटी पोटी त्यांचेकडून भविष्यात जीएसटी मागणी केली जाणार नाही असे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. तथापी महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.११/०९/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार सदरहू कामासाठी ठेकेदार यांनी जमा केलेली निविदा हि जीएसटी अंमलबजावणी नंतर व दि२२/०८/२०१७ पुर्वी असल्याने कार्य

कंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करणेचा प्रयत्न करणेसाठी ठेकेदार यांना मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे बोलावून चर्चा वाटीघाटी व्दारे निर्णय घेता येईल, असे मत आहे.

तरी श्री साई प्रसादालय मुख्य प्रसाद भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ट्रिमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नविन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना कार्यादेश देणेपुर्वी दि.११/०९/२०१७ रोजीचे शासन परिपत्रकानुसार कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन त्यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील प्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.११/०९/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार सदरहू कामासाठी ठेकेदार यांनी जमा केलेली निविदा हि जीएसटी अंमलबजावणी नंतर व दि२२/०८/२०१७ पुर्वी असल्याने कार्य कंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करणेचा प्रयत्न करणेसाठी ठेकेदार यांना चर्चा/ वाटीघाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **बांधकाम ठेकेदार यांचे व्हॅट (VAT) जीएसटी (GST) मधील फरकाचे अनुषंगाने निविदेबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत विविध कामांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसारई-निविदा सूचना प्रसिध्द करुन निम्नतम (L-1) दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसमान्यता देण्यात आली आहे. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१) श्री साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) इमारतीचे उर्वरीत ३८६ खोल्यांसह नुतनिकरण करणे.-**श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारतीमधील उर्वरीत ३८६ खोल्या व इमारतीचे नुतनीकरणातील सिव्हील कामांसाठी रु.१२,३७,६१,६५९/- मात्र खर्चाच्या कामासाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि.१७/०७/२०१७ अखेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरहु ई-निविदांचे तांत्रिक माहितीचे लिफाफे दि०४/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले असुन त्यातील कागदपत्रांचा छाननी करून पात्र सात ठेकेदारांपैकी निम्नतम दराचे ठेकेदार क्लासिक असोशिएट्स, नाशिक यांना सदरहु काम देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७४१ खालीलप्रमाणे झाला आहे.

*“.. प्रस्तावीतकामीचे निम्नतम दरधारक Klassic Associates, Nashik हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली व या कामासाठी पुर्वी १२%VAT लागू होता, परंतु आता १८% जी.एस.टी. करप्रणाली लागू झालेली असल्यामुळे यामधील ६% फरकाची रक्कम मिळावी, अशी विनंती केली. तसेच त्यांनी ई-निविदेमध्ये डिफेक्टलायबलीटी कालावधी ६ महिन्यांचा दिला होता. तो २ वर्षाचा करण्यास सभेसमोर संमती दिली.यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधीलउर्वरीत ३८६ खोल्यांचे नूतनीकरण करणेकामीKlassicAssociates,Nashik यांचे रु.१०,९८,२७,२९९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच त्यांचेबरोबर झालेल्या चर्चेप्रमाणे Klassic Associates, Nashik यांना ६% फरकाची रक्कम वेगळी आदा करणेत यावी व त्यांचेकडून२ वर्ष डिफेक्टलायबलीटी कालावधी घेण्यात यावा असे ठरले.”*

**२) रस्ता क्र.०५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामेकरणे –** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून शिर्डी एकात्मिक रस्ते विकासयोजनेतीलप्रथमप्राधान्यगटातील रस्तेविकसित करणेत येत आहेत. या प्रकल्पातील रस्ता क्र.५ या रस्त्यांचे उर्वरीत काम पूर्ण करुन घेणेकामी ई-निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२५९ अन्वयेमान्यता देणेत आली. त्यानुसार ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या ई-निविदांबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.नि. क्र.५२४ अ)१३ खालीलप्रमाणे झाला आहे.

“...संस्थान निधीतून शिर्डीनगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम करून घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s.Amol Construction & Co.,

DevlaliPravara यांना दराबाबत चर्चा करणेसाठी आतचे उपसमितीसमोर बोलविणेत आले होते. परंतु सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते. यावर सविस्तर चर्चा होवून संस्थान निधीतून शिर्डीनगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम करून घेणेकामी M/s. Amol Construction & Co., DevlaliPravara यांचे एकत्रित रु.१,४२,६२,६५५.९० मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येवून त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "

त्यानुसार ठेकेदार मे. अमोल कन्स्ट्रक्शन ॲण्ड कंपनी, देळाली प्रवरा यांना जा. क्र.२९२३/२०१७ दि.०१/०९/२०१७ अन्वये कार्यादेश देणेत आला आहे. ठेकेदार यांनी दि.०६/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

*".. संपूर्ण देशात दि.०१/०७/२०१७ पासून नवीन करप्रणाली सेवा व वस्तुकर (GST) लागु झालेमुळे या करप्रणालीमध्ये कार्य व कंत्राट (Works Contract) साठी नवीन करवाढ लागु झालेली आहे. या नवीन GST कराचा समावेश आपले वरील निविदेमध्ये केलेला नसल्यामुळे होणारी GST कराची फरकाची रक्कम निविदेमध्ये समाविष्टकरणेबाबत कळविले आहे.."*

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानंतर वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दि.१९/०८/२०१७ मध्ये खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

"   ..२. दिनांक २२ ऑगष्ट २०१७ पूर्वी स्विकृत करण्यात आलेल्या निविदा मात्र कंत्राटाकरिता Work order अद्याप न दिलेली कंत्राटे: दिनांक २२ ऑगष्ट २०१७ पूर्वी स्विकृत करण्यात आल्याआहेत, परंतु त्याबाबत कार्यारंभ आदेश (work order) देण्यात आलेले नाहीत अशा प्रकरणांमध्ये निविदा प्रक्रियेमध्ये कंत्राटदाराने जीएसटीपूर्व करांच्या बोज्याचा विचार करून निविदा दाखल केलेली असल्याने जीएसटी नंतरच्याकराच्याबोज्याचा त्यामध्ये विचार झालेला नाही असे गृहित धरून सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात व पुन:श्च short tender notice देवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी. तथापि, अतितात्काळ स्वरुपांच्या कामाबाबत उदाहरणार्थ (रस्त्यावरील खड्डे भरणे) निविदांची *प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून त्यांचे कार्यारंभ आदेश देण्यात यावेत. मात्र सदर निविदा स्वीकृत करतांना जीएसटीअंतर्गत येणाऱ्या कराचा बोजा लक्षात घेवून कंत्राटदारांशी वाटाघाटी करून दर कमी करण्याचा प्रयत्न करावा."*

त्यानंतर वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक जीएसटी-१०१७/ प्र.क्र.१५५/ कराधान-१, दि. ११/०९/२०१७ अन्वये जीएसटी अंमलबजावणी नंतर शासकीय कंत्राटात होणारे बदलांबाबत दि.१९/०८/२०१७चे परिपत्रका संदर्भात विविध विभागांनी उपस्थित केलल्या अडचणीसंदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

"..२. ...निविदा रद्द करून पुन:श्च Short Tender Notice दिल्यास निविदा प्रक्रीयेमध्ये कालापव्यय होण्याची शक्यता असल्याने सदर कालापव्यय टाळण्याकरीता विभागाने खालील मार्गदर्शक तत्वे विचारात घेवून कंत्राटदारांशी कंत्राटाच्यारकमेबाबत वाटाघाटी कराव्यात....

अ) निविदा दाखल करताना कंत्राटदार त्या दिनांकास अस्तित्वातल्या कराचा दर लक्षातघेऊन कंत्राटाची किंमत Quote करत असतात .निविदाजीएसटीच्या अंमलबजावणीनंतरव दिनांक२२ऑगस्ट, २०१७ पूर्वी दाखल केली असल्यास, कंत्राटदाराने जीएसटीचासर्वसाधारणपणे Construction Service वरील अस्तित्वातल्या कराचा दर एकत्रित १८टक्के (९% CGST +९% SGST) लक्षात घेऊन किंमत Quote केली असेल, मात्रसदरचाकराचा दर दिनांक २२ऑगस्ट, २०१७च्या अधिसूचना क्र20/2017 Central Tax Rate व 20/2017 State 20/2017 अन्वये, बहुतश:शासकीय कार्यकंत्राटावर १२% (६% CGST + ६% SGST) झाला आहे त्यामुळेकार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊनकिंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा.

तसेच वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील उपरोक्तशासन परिपत्रकाचे अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे Govt.Circular No. Sankirna-2017/ C.R.121 (Part-II)/Building-2Dated- 19th September, 2017 अन्वये स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**३) सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणे.-** सदरहु कामासाठी मागवितांना सर्व्हिस टॅक्स वेगळा देणेबाबत नमूद आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७रोजीचे सभेतील नि. क्र.५२४ अ)४खालीलप्रमाणे आहे.

"..Design Associates INC, Noida (UP) यांचे प्रकल्प किमतीवर १.३०% मात्र अंतीम दर स्विकारणेत येवून त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

मात्र सल्लागार डिझाईन असोशिएट्स आयएनसी, नोयडा यांनी DAI/DRL/BD/GEN/2017-18 चे पत्रान्वये ".. After rebate our quoted percentage rate will be 1.3% + Service tax /GST. GST applicable from 01/07/2017 instead of service tax."असे कळवून जीएसटीचीरक्कम वेगळी मागितली आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त शासन परिपत्रके विचारात घेता जीएसटीकराचा दर एकत्रित **१८ टक्के** (९% CGST + ९% SGST) ऐवजी दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ च्या अधिसूचना क्र .20/2017 Central Tax Rate व 20/2017 State 20/2017 अन्वये, बहुतश: शासकीय कार्यकंत्राटावर १२% (६% CGST + ६% SGST) झाला आहे. त्यामुळे कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. तरी वरील ठेकेदार व सल्लागार यांचेसमवेत चर्चा करून दर कमी करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जीएसटी संदर्भात दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ व दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी शासनामार्फत प्रसिध्द करणेत आलेल्या शासन निर्णयानुसार कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. तरी प्रस्तावित ठेकेदार व सल्लागार यांचेसमवेत चर्चा करून दर कमी करणेसाठी, त्यांना पुढील सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचा दि.१ ऑक्टोबर, २०१७ रोजीचा साईनगर मैदानावरील उदघाटन कार्यक्रमाचा मंडप, स्टेज डेकोरेशन, फोटोग्राफी, एल.ई.डी. स्क्रिन इत्यादी व्यवस्थेसाठी झालेल्या खर्चाची बिले अदा करणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे प्रारंभ दिवस ०१ ऑक्टोंबर, २०१७ रोजी शताब्दी सोहळयाचे उदघाटन मा. राष्ट्रपती महोदय, भारत गणराज्य यांचे शुभहस्ते करण्याचा संस्थानचा मानस होता. त्यानुसार सदर कार्यक्रमाचे आयोजन साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरातकरण्याचे नियोजित केले व या दौ-याबाबत मा.राष्ट्रपती महोदय यांचा शिर्डीचा संभाव्य दौरा मिनिट टु मिनिट दौरा संस्थानकडून शासनाकडे पाठविणेत आलेला होता.

तथापी या दौ-याबाबत पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. क्रमांक जिविशा/ महामहीम राष्ट्रपती दौरा/६२१४/२०१७, दिनांक २१/०९/२०१७ अन्वये संभाव्य दौ-या दरम्यान कार्यकम स्थळाबाबत शासनास अभिप्राय सादर केला व त्यात कार्यकमाचे ठिकाण हे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य नसल्याने दुस-या ठिकाणी कार्यकम घेणे योग्य राहील असे नमूद केले होते.

उपरोक्त अभिप्रायानुसार मा.उपसचिव, सामान्य प्रशासन, विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्र. टिआरएस-२०१७ /प्र.क्र. १६२/३०/ दिनांक २१/०९/२०१७ अन्वये मा.राष्ट्रपती यांच्या अहमदनगर (शिर्डी) येथील प्रस्तावित दौ-याच्या अनुषंगाने नियोजित कार्यक्रम स्थळाबाबतची निश्चिती तात्काळ करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे कार्यक्रम स्थळाची निश्चिती तातडीने करुन जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सुचित केले होते. तसेच कार्यक्रम स्थळ निश्चित करुन पुनःश्च मिनिट टु मिनिट कार्यक्रम अहवाल तात्काळ पाठविणेस जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय यांनी पत्र क्रस्वाकक्ष/कवि/७७९/२०१७ दि.२३/०९/२०१७ नुसार कळविले होते.

०१ ऑक्टोबर २०१७ रोजी आयोजित कार्यक्रमाचे ठिकाण शासनाने कळविलेनुसार सुरक्षिततेच्या दृष्टीने साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरात न घेता साईनगर मैदान येथे घेणेस व त्यानुषंगाने करावयाचे कार्यवाहीस व सर्वसमावेशक (ग्राऊंड लेव्हलिंग, मंडप, साऊंड सिस्टीम, सुरक्षा, बॅरेकेडींग व इतर अनुषंगिक) खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर सदर सभेत निर्णय क्र. ८४४ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, अहमदनगर व मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी दि.२३.०९.२०१७ चे पत्राने सुचित केलेनुसार सन्मा. राष्ट्रपती यांचा दिनांक १ आक्टोबर २०१७ रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचे ठिकाण सुरक्षितेच्या दृष्टीने साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरात न घेता साईनगर मैदान येथे आयोजित करणेस व त्याअनुषंगाने कार्यवाही करणेस तसेच खाली नमुद केलेल्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | खर्चाची बाब | तपशील | अंदाजेखर्च |
|---|---|---|---|
| अ) स्टेजखर्च- | | | |
| १ | साईनगर मैदान सुधारणा | लांबी२९०स्के.फुट, रुंदी२९०स्के.फुट (एकूण-८७,०००स्के. फुट), मुरुमटाकणे, रोलर, व्हायब्रेटर रोलींग ने सपाटीकरण व दबाई. | ५,००,०००/- |
| २ | सुपरस्ट्रक्चर मंडप | १०० X ३००स्के.फुट | १२००,०००/- |
| ३ | कार्पेट | ३०,०००स्के.फुट | १,५०,०००/- |
| ४ | स्टेज | २०X८०स्के.फुट (एकूण-१६००स्के.फुट) | २,००,०००/- |
| ५ | स्टेजवरील मान्यवरांसाठी डनलपचा लेदर सोफा | २०नग | १,००,०००/- |
| ६ | मुख्यमंडपामध्ये मा.राष्ट्रपती, मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्रीया सन्माननीय अतिथींसाठी डनलपसोफा. | ३०नग | १,००,०००/- |
| ७ | स्टीलचे सोफासेट | १००नग | ६०,०००/- |
| ८ | लाईट व जनरेटर व्यवस्था | १००नग | २०,०००/- |
| ९ | फायबर चेअर | ३०००नग | ३०,०००/- |
| १० | स्टेज पुढील बी बॅरीगेट | | ३०,०००/- |
| ११ | ट्रान्सपोर्ट खर्च, बॅकड्राप पडदे, फॅन, कुलर | | ७५,०००/- |
| १२ | प्लायवुडचे फिक्स स्टेअर केस | | १,००,०००/- |
| १३ | १० फुट उंचीचे १२०० फुट पार्टीशन | | १,५०,०००/- |
| १४ | महिलाचे कींग कॅबीन | ४नग | १,२०,०००/- |
| १५ | वायरलेस कंन्ट्रोल बुथ | | २०,०००/- |
| १६ | मुख्य मंडपाबाहेर डाव्या उजव्या दोन्ही बाजुने अतिरीक्त २ पाईपमंडप | | १,१०,०००/- |
| १७ | LED Wall साठीरायझर | ४नग | ३५,०००/- |
| १८ | इलेक्ट्रॉनिक मिडीयासाठी डबल रायझर | | १५,०००/- |
| १९ | मुख्यमंडपामध्ये ४ फुट उंचीचे२०००फुट बॅरेकेडींग | | १०,०००/- |
| | | एकुण | ३०,२५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ब) स्टेजडेकोरेशनसाठीचाखर्च- | | | |
| १ | प्लॅटफॉर्म ६०X८०X१४ GI Metal fremwork with marin padal Inculding Transport & labour | | ३,५०,०००/- |
| २ | Decoration & Exculzation of Stage, providing decoretive FRP Arches, Backdrop, ODM, Dadolows, pentizy, freming, labour & Transport | | १०,००,०००/- |
| | | एकुण | १३,५०,०००/- |
| क) फोटोग्राफी- | | | |
| १ | Photography | | ५०,०००/- |
| २ | Videography & Video wall live stand streaming | | २,२५,०००/- |
| | | अंदाजे एकुण खर्च रु. | ४६,५०,०००/- |

तसेच उपरोक्त कामकाज हे दि.२९.०९.२०१७ पर्यंत पुर्ण करुन, सुरक्षीततेच्या दृष्टीने योग्य त्या तपासण्या व रंगीत तालीमसाठी पोलीस विभागास उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यामुळे सदरहु कामकाज प्रचलित पध्दतीने कोटेशन/ ई-निविदा प्रक्रिया राबवून करणे शक्य होणार नसल्याने, तातडीची बाब म्हणून उपरोक्त तक्त्यामधील अ मधील कामे मा.जिल्हाधिकारी यांनी सुचविलेले अहमदनगर येथील मेहत्रे मंडप ॲन्ड डेकोरेटर्स यांचेकडून व ब

मधीलकामे ND's Art World Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून करुन घेणेस तसेच अ, ब व क मधील कामे करुन घेण्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.४६,५०,०००/- + GST Exta मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.राष्ट्रपती महोदय भारत गणराज्य यांचे शुभहस्ते झालेल्या उदघाटन कार्यक्रमासाठी साईनगर येथे करण्यात आलेली मंडप व स्टेज व्यवस्था तसेच स्टेज डेकोरेशन व फोटोग्राफी या सेवांकरीता खालीलप्रमाणे बीले अदा करावयाची आहेत.

| *अ.नं.* | *खर्चाचीबाब* | *तपशील* | *झालेला खर्च* |
|---|---|---|---|
| अ) साईनगर येथील मंडप व्यवस्था- | | | |
| १ | मंडप (सुपर स्ट्रक्चर) | सुपर स्ट्रक्चर – १००'X २६०'=-२६,०००स्के. फुट दर रु.३९/- प्र.स्के. फुट | १०,१४,०००/- |
| २ | कारपेट | २६,०००स्के. फुट दर रु.६/- प्र.स्के. फुट | १,५६,०००/- |
| | | ८,०००स्के. फुट दर रु.६/- प्र.स्के. फुट | ४८,०००/- |
| ३ | मुख्य स्टेज | २०'X ६०'=-१,२००स्के. फुट ४.५ फुट उंची दर रु.१५०/- प्र.स्के. फुट | १,८०,०००/- |
| ४ | पाय-या | १२" X ६'' टप्पे ५' फुट रुंदीचे २ जीने दर रु.१९५००/-प्रती नग | ३९,०००/- |
| ५ | स्टेजसाठी बैठक व्यवस्था | सिंगल सिटर डनलॉप सोफा २५ नग दर रु.१८००/- प्र. नग | ४५,०००/- |
| ६ | मंडप मधील बैठक व्यवस्था | टु सिटर डनलॉप सोफा ४० नग दर रु.२१००/- प्र. नग | ८४,०००/- |
| | | स्टीलचेसोफासेट १०० नग दर रु.४००/- प्र. नग | ४०,०००/- |
| | | फायबरचेअर ३००० नग दर रु.१०/- प्र.नग | ३०,०००/- |
| ७ | स्टेज समोरील डी | तीन ठिकाणी बांबु व बल्लीवापरुन बॅरेकेटींग करणे २६० र.फुट दर रु.१२५/- प्र.रनिंग फुट | ३२,५००/- |
| ८ | गॅग- वे | ४'उंचीचे लोखंडी बॅरीकेडस१५४० र.फुट दर रु.४०/- प्र.रनिंग फुट | ६१,६००/- |
| ९ | व्हीव कटर | १०' उंच बल्ली पाईप बांबु वापरुन पांढ्या कापडाचे पार्टीशन ११०० र.फुट दर रु.६०/- प्र.र.फुट | ६६,०००/- |
| १० | पोलिस बॅंड डक | २०' X ३०' छत लावून तीन बाजूस बंद करणे, खाली कारपेट टाकणे | २१,७००/- |
| ११ | महिला चेकींग कक्ष | १०' X १५' काळा कपडा लावून बंद केलेले, कारपेट सह एकुण ०३नग दर रु.१०,०००/- प्र.नग | ३०,०००/- |
| १२ | वायरलेस रुम | १०' X १२' काळे कपडे लावून बंदीस्थ केलेले कंट्रोल रुम लाईट व्यवस्थेसह | १५,०००/- |
| १३ | उपमंडप | लोखंडी पाईप वापरुन पांढ्या कपड्याचे छताचे ६०' X ६०' दोन मंडप७२०० स्के.फुट दर रु.१०/- प्र.चौ.मी. | ७२,०००/- |
| १४ | रायझर | LED लावणेसाठी ४' X १२' चे H फ्रेम वापरुन प्लायवुड वापरुन उभे केलेले रायझर ०४ नग दर रु.४८००/- प्र.नग | १९,२००/- |
| १५ | कॅटरींग टेबल | २' X ६' चे कॅटरींग टेबल फ्रिल व बेडसिट सह १० नग दर रु.१००/- नग | १,०००/- |
| १६ | कॉफी टेबल | टी पॉय ०५ नग दर रु.३००/- प्र.नग | १,५००/- |
| १७ | स्वागत कक्ष | स्वागत कक्षासाठी १५' रुंद व २०' उंचीची कमान झालरसह | १०,०००/- |
| १८ | वॉच टावर | १५' उंचीचे दोन नग वॉच टावर दर रु.५०००/- प्र.नग | १०,०००/- |
| १९ | लाईट व्यवस्था | CFL लॅम्प लाईट होल्डरऑटो वायर सह | २०,०००/- |
| | | हॅलोजन लॅम्प २० नग | ८,०००/- |
| | | पॅनल बोर्ड २ नग थ्री फेज | १०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७X२० ची थ्री फेज वायर ६०० र.फुट | १५,०००/- |
| | | १८०० फुट थ्री फेज वायर | २०,०००/- |
| | | कुलर १० नग प्र.नग २०००/-प्रमाणे | २०,०००/- |
| | | कॅमेरा व पोलिस चेकींगमशीन पॉवर पॉईंटसह AC स्पलाय देणे | २५,०००/- |
| २० | साऊंड व्यवस्था | मुख्य साऊंड सिस्टीम - J.B.L वॉरटेक ४८८ | १,३२,०००/- |
| २१ | पर्यायी साऊंड व्यवस्था | ॲम्पीफायर ५०००W, ट्रम्पेट, माईक,कॉडलेस माईक, मॉनिटर, बॅटरी बॅकअपसह. | १८,०००/- |
| | | एकुण रुपये | २२,४४,५००/- |
| | | GST @ 18% | ४,०४,०१०/- |
| | | एकुण रुपये- (अ) | २६,४८,५१०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ***ब) स्टेजडेकोरेशनसाठीचाखर्च-*** | | | |
| *१* | ***प्लॅटफॉर्म*** *६०X८०X१४* GI Metal fremwork with marin padal Inculding Transport & labour | | ***११,१०,०००/-*** |
| *२* | Decoration & Exculzation of Stage, providing decoretive FRP Arches, Backdrop, ODM, Dadolows, pentizy, freming, labour & Transport | | |
| ***क) फोटोग्राफी-*** | | | |
| *१* | Photography | | ***१,९५,५२०/-*** |
| *२* | Videography & Video wall live stand streaming | | |
| | | ***एकुण - (अ+ब+क) रु.*** | ***३९,५४,०३०/-*** |

उपरोक्त कामकाज हे दि.२९.०९.२०१७ पर्यंत पुर्ण करुन, सुरक्षीततेच्या दृष्टीने योग्य त्या तपासण्या व रंगीत तालीमसाठी पोलीस विभागास उपलब्ध करुन द्यावयाचे होते. त्यामुळे सदरहु कामकाज प्रचलित पध्दतीने कोटेशन/ ई-निविदा प्रक्रिया राबविणे शक्य झाले नाही. तातडीची बाब म्हणून उपरोक्त तक्त्यामधील अ मधील कामे मा.जिल्हाधिकारी यांनी सुचविलेले अहमदनगर येथील मेहत्रे मंडप ॲन्ड डेकोरेटर्स यांचेकडून व ब मधील कामे ND's Art World Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून करुन घेण्यात आली आहे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता दि. १ ऑक्टोबर, २०१७ रोजी झालेल्या साईनगर मैदानावरील उदघाटन कार्यक्रमासाठी वर नमूद तपशीलातील 'अ' मध्ये दर्शविलेल्या मुख्य मंडपाचे कामापोटी मे.मेहेत्रे मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांना रु.२६,४८,५१०/- मात्र अदा करणेस, 'ब' मध्ये स्टेज डेकोरेशन कामापोटी मे.एन.डी.आर्ट, मुंबई यांना रु११,१०,०००/- मात्र अदा करणेस व 'क' मध्ये फोटोग्राफीकरीता श्री.प्रताप पाटील, दर्शन फोटो, नाशिक यांना रु.४०,०००/- तसेच एल.ई.डी. स्क्रीन व व्हिडीओ शुटींग कॅमेरे इ.कामी मे.रिसेप्शन मिडीया, नेवासा यांना रु.१,५५,५२०/- मात्र असे (अ+ब+क) एकुण रु.३९,५४,०३०/- मात्र खर्चाची बिले संबंधीताना अदा करणेस मान्यतेकामी सदरहू प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता दि. १ ऑक्टोबर, २०१७ रोजी झालेल्या साईनगर मैदानावरील उदघाटन कार्यक्रमासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या तपशीलातील 'अ' मधील दर्शविलेल्या मुख्य मंडपाचे कामापोटी मे.मेहेत्रे मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांना रु.२६,४८,५१०/- मात्र 'ब' मधील स्टेज डेकोरेशन कामापोटी मे.एन.डी.आर्ट, मुंबई यांना रु.११,१०,०००/- मात्र तसेच 'क' मधील फोटोग्राफीकरीता श्री.प्रताप पाटील, दर्शन फोटो, नाशिक यांना रु.४०,०००/- व एल.ई.डी. स्क्रीन, व्हिडीओ शुटींग कॅमेरे इ.कामी मे.रिसेप्शन मिडीया, नेवासा यांना रु.१,५५,५२०/- मात्र असे (अ+ब+क) एकुण रु.३९,५४,०३०/- मात्र खर्चाची बिले संबंधीताना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजीचे कार्यक्रमाकरीता उपस्थित मा.महामहीम राष्ट्रपती व इतर निश्चीत पाहुण्यांची अल्पोपहार व भोजनाचे बिलाची रक्कम अदा करणेस कार्योत्तर मान्यता.**

**प्रस्ताव-** श्री साई समाधी शताब्दी वर्ष २०१७-२०१८ चे निमित्ताने दि.०१/१०/२०१७ रोजी सकाळी ६.०० वाजता ध्वज शोभायात्रा, सकाळी ९.३० वाजता मा.महामहीम राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे हस्ते लेंडीबागेत ध्वजारोहण तसेच त्यांचे समवेत मा.मुख्यमंत्री महोदय हे उपस्थित राहणार असल्याबाबत कळविणेत आलेले होते. त्यानूसार मा.मुख्यमंत्री महोदय व मा.महामहीम राष्ट्रपती यांचे दौ-याबाबत नियोजनपर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम यांनी जा.नं.एसएसएस/मुकाअ-स्वीय/२५६१/२०१७ रोजीचे परिपत्रकानूसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२७/०९/२०१७ रोजी सर्व प्रशासकीय अधिकारी, अधीक्षक यांची सभा आयोजीत केलेली होती.

सदरचे सभेमध्ये ध्वजारोहण कार्यक्रमाकरीता उपस्थित मा.महामहीम राष्ट्रपती, भारत गणराज्य तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांची व त्यांचेसोबत असणारे मंत्री महोदय व सन्मा.पाहुणे यांची तसेच मा.व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच संस्थान अधिकारी, यांची अल्पोपहार व्यवस्था लेंडीबागेतील '०' नंबर मिटींग हॉल येथे हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांचेकडून करणेत यावी व येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता घ्यावी असे आदेश देण्यात आलेले होते.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडील, क्रमांक/स्वागतकक्ष/कावि/७७०/२०१७ दि.२७/०९/२०१७ रोजीचे आदेशान्वये देखील मा.महामहीम राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे संपुर्ण दौरा कार्यक्रमाकरीता भोजन व्यवस्थाबाबतचे संपुर्ण व्यवस्था करणेबाबत संस्थानला आदेश देण्यात आलेले होते.

१) त्यानूसार दि.०१/१०/२०१७ रोजी ध्वजारोहण कार्यक्रमाकरीता उपस्थित मा.मुख्यमंत्री महोदय, त्यांचेसोबत असणारे मंत्री महोदय व सन्मा.पाहुणे यांची तसेच मा.व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच संस्थान अधिकारी, यांची अल्पोपहार व्यवस्था '०' नंबर मिटींग हॉल येथे हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांचेमार्फत खालील बीलाप्रमाणे क्रेडीटवर करणेत आलेली होती. सदर व्यवस्था करण्यासाठी उपलब्ध कालावधी अत्यल्प असल्याने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता सदर व्यवस्था हॉटेल सेंट लॉर्न यांचेकडून करुन घेण्यात आली आहे.

| **अ.नं.** | **बीलधारकाचे नांव व बील नं.** | **बीलाचा तपशिल** | **दर रु. पै.** | **संख्या** | **रक्कम रुपये रु. पै.** |
|---|---|---|---|---|---|
| १. | हॉटेल सेंट लॉरेन, शिरडी बील नं.५३९४ दि.०१/१०/२०१७ | BUFFET BREAKFAST | २४९.०० | १३८ | ३४,३६२.०० |
| | | | CGST 9% | | ३०९२.५८ |
| | | | SGST 9% | | ३०९२.५८ |
| | | | एकूण रक्कम रु. | | ४०,५४७.१६ |
| | | **एकूण पुर्णांकीत रक्कम रुपये** | | | **४०,५४७.००** |

२) तसेच उपरोक्त कार्यक्रमासाठी मा.महामहीम राष्ट्रपती, भारत गणराज्य यांची व त्यांचेसोबत असणारे मंत्री महोदय व सन्मा.पाहुणे तसेच वैमानिक यांची भोजन व्यवस्था साईबाबा विमानतळ येथे पार्सल स्वरुपात हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांचेमार्फत खालील बीलाप्रमाणे क्रेडीटवर करणेत आलेली होती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | हॉटेल सेंट लॉरेन, शिरडी बील नं.५३९५ दि.०१/१०/२०१७ | LUNCH PARCEL | २९९.०० | ७०.०० | २०,९३०.०० |
| | | | CGST 9% | | १८८३.७० |
| | | | SGST 9% | | १८८३.७० |
| | | | एकूण रक्कम रु. | | २४६९७.४७ |
| | | **एकूण पुर्णांकीत रक्कम रुपये** | | | **२४,६९७.००** |

तरी उपरोक्तप्रमाणे दि.०१/१०/२०१७ रोजी ध्वजारोहण कार्यक्रमाकरीता उपस्थित मा.महामहीम राष्ट्रपती, भारत गणराज्य तसेच मा.मुख्यमंत्री महोदय, यांची व त्यांचेसोबत असणारे मंत्री महोदय व सन्मा.पाहुणे यांची तसेच मा.व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच संस्थान अधिकारी, यांचे अल्पोपहार व भोजन व्यवस्थेकामी वरीलप्रमाणे आलेल्या दोनही बीलाचे एकत्रित रक्कम रुपये ६५,२४७/- (४०५४७/- +२४६९७/-) अक्षरी रक्कम रुपये पासष्ट हजार दोनशे सत्तेचाळीस मात्रचे खर्चास व सदर रक्कम बीलधारक

हॉटेल सेंट लॉरेन, शिरडी यांना आदा करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.९०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजीचे कार्यक्रमाकरीता उपस्थित मा.महामहीम राष्ट्रपती व इतर निश्चीत पाहुण्यांची अल्पोपहार व भोजनाच्या बिलाची रु.६५,२४७/- मात्र रक्कम हॉटेल सेंट लॉरेन, शिरडी यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- साईप्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर तेल, तूप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल.**

**निर्णय क्र.९०६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **पेस्ट कंन्ट्रोल व रोडंन्ट कंन्ट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणीचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरूस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील विषय नं-०२ निर्णय क्र.६७७ (०१) नुसार साई धर्मशाळा व साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी करावयाची पेस्ट कंट्रोल व रोडंन्ट कंट्रोल, फॉगींग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी ही सर्व कामे एकाच ठेकेदारास द्यावी, अशी संबंधीत ठेकेदारांची मागणी असल्यामुळे या कामांसाठी ई-निविदा प्रक्रियेव्दारे एकत्रित निम्नतम दरधारक S & R Pest control Services Nashik यांचे रु ९,५०,६९१.२० मात्र वार्षिक दर स्विकारणेत यावेत प्रायोगिक तत्वावर २ औषध फवारण्यांसाठी कार्यादेश देण्यात यावा. २ औषध फवारण्यांमध्ये त्यांचे काम समाधानकारक असल्यास, त्यांना पुढील कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्तावनाः-** सन २०१७-१८ करीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्टकंट्रोल, रोडेंटकंट्रोल, फॉगींगटिंट्रमेट (धुरीकरण) व डासआळी प्रतीबंधक औषधफवारणी (Anti Larval) करणेकामी, मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे निर्णयानुसार S & R Pest Control Services Nashik यांना जा.नं. एसएसएस/ वशी– साईधर्मशाळा/ ३११०/ २०१७ दि. १२/०९/२०१७ रोजी प्रायोगिक तत्वावर २ औषध फवारण्यांसाठी (कालावधी दि.०१/०९/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ अखेर चार महिने) कार्यादेश देण्यात आला आहे.

नमुद वेळेत काम सुरु करणेबाबत श्री रुईकर – प्रतिनिधी, S & R Pest Control Services Nashik यांना कळविले असता त्यांनी ई-मेल व्दारे खालील प्रमाणे इकडील विभागास कळविले आहे.

| अ.नं. | दिनांक | कार्यालयातुन करण्यात आलेला ई- मेल व फोन | श्री रुईकर, S & R Pest Control Services Nashikयांचेकडुन आलेले ई –मेल व फोनव्दारे उत्तर |
|---|---|---|---|
| १ | १३/०९/२०१७ | ई– मेल व्दारे कामाची वर्कऑर्डर पाठविण्यात आली. | -- |
| २ | १६/०९/२०१७ | -- | ई- मेल. - १६/०९/२०१७ रोजी **ई- मेलव्दारे**" We are obliged to get the opportunity to work with the SaiSansthan as we Have received the PO referring J.N.SSS/ VASHI/ SAIDARMASHALA / 3110/2017 dated 12/09/2017. We bring to your kind notice that as our team is deputaed to the other department we would require 15 days time today to start the work Hoping you accept our request" असे कळविण्यात आलेले आहे. |

दि.१६/०९/२०१७ रोजीच्या ई-मेल व्दारे S & R Pest Control Services Nashik यांनी औषध फवारणी कामी १५ दिवसाची मुदत मागितली होती. श्रींच्या पुण्यतिथी उत्सवा अगोदर एक फवारणी होणे आवश्यक होती तसेच वातावरणाच्या झालेल्या बदलामुळे ढेकूण, डास व झुरळ इत्यादीचा प्रार्दुभाव वाढल्याने भक्तांचे अधुनमधुन तक्रारी कार्यालयात येवू लागल्या होत्या यासाठी साई धर्मशाळा विभागामार्फत प्रशासकीय मंजुरीने औषधे खरेदी करण्यात येवून दि. २१/०९/२०१७ ते २६/०९/२०१७ या कालावधीत औषध फवारणी करण्यात आली. तसेच साई आश्रम भक्तनिवासस्थान येथे देणगी स्वरुपात औषधे उपलब्ध करण्यात येवून विभागामार्फत दि.१९/०९/२०१७ ते २५/०९/२०१७ या कालावधीत औषध फवारणी करण्यात आली.

नाताळ व साई शताब्दी महोत्सव या कालावधीत भक्तांची संख्या वाढणार असल्याने S & R Pest Control Services Nashik यांना माहे ऑक्टोबर २०१७ चे शेवटच्या आठवडयात अथवा नोहेंबरच्या पहिल्या आठवडयात प्रथम औषध फवारणी करणे अत्यावश्यक आहे असे तोंडी सांगितले. तसेच खालील प्रमाणे दुरध्वनी व्दारे व ई-मेल व्दारे कळविण्यात आले आहे.

नमुद वेळेत काम सुरु करणेबाबत S & R Pest Control Services Nashikयांचेप्रतिनिधीश्री रुईकर, यांना वेळोवेळी फोन व ई- मेल व्दारे केलेला वार्तालाप तपशिल खालीलप्रमाणे

| अ नं. | दिनांक | कार्यालयाकडुन करण्यात आलेला ई- मेल व फोन | श्री रुईकर, S & R Pest Control Services Nashik यांचेकडुन आलेले ई –मेल व फोनव्दारे उत्तर |
|---|---|---|---|
| १ | ०९/१०/२०१७ | ई- मेल. – S & R Pest control Services Nashikयांना ई-मेल व्दारे पेस्ट कंट्रोल करण्या बाबत तसेच करारनामा करण्यासाठी संमती पत्र, अधिकार पत्र व अनामत रक्कमेचा डी.डी जमा करण्याबाबत कळविले होते. | दि.११/१०/२०१७ रोजी फोनवरुन औषध फवारणी बाबत विचारणा केली असता त्यांनी औषध फवारणी ही आम्हाला नोहेंबर महिन्यात करण्यास सांगितले आहे. त्यानुसार आम्ही औषध फवारणी करु, सध्या आमचे बाहेरगावी काम चालु आहे. असे फोनवरुन सांगण्यात आले. |
| २ | १२/१०/२०१७ | ई- मेल. -----"—<br>वरील प्रमाणे पुन्हा ई- मेल पाठविण्यात आला. | दि.१२/१०/२०१७ रोजी फोनव्दारे<br>आम्ही माहे- नोव्हेंबर मध्येच काम सुरु करु असे सांगितले. |
| ३ | १३/१०/२०१७ | फोनव्दारे -<br>दि. १३/१०/२०१७ रोजी फोन वरुन श्री रुईकर यांचे बोलणी केली असता त्यांनी आम्ही नोहेंबरच्या पहिल्या आठवडयात काम सुरु करणार आहोत, त्यावेळी करारनामा/ संमतीपत्र/ अधिकारपत्र/ डी.डी यांची पुर्तता केली जाईल व याबाबत परत फोन करु नये. दिवाळी असल्यामुळे कामगार काम करणार नाही, असे त्यांनी फोनवर सांगितले. | ई- मेल व्दारे -<br><br>आम्ही नोहेंबरचे दुस-या आठवडयात काम सुरु करत आहोत |
| ४ | १६/१०/२०१७ | आपण पेस्ट कंट्रोलचे काम माहे नोहेंबर-२०१७ चे दुस-या आठवडयात चालु करणार आहे असे नमुद केले आहे. दिपावली सुट्टी, नाताळ व शिर्डी महोत्स कालावधीत साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढणार आहे. वातावरणाच्या बदलामुळे पेस्ट कंट्रोल अभावी साईभक्तांना डास व ढेकुन यांचा त्रास वाढण्याची शक्यता आहे. पेस्ट कंट्रोल अभावी भक्तांच्या तक्रारीत वाढ होण्याची शक्यता आहे. तरी ई- निविदेतील अटी-शर्ती नुसार आपण दि. २२/१०/२०१७ पासुन त्वरीत प्रथम औषध फवारणीचे काम सुरु करावे. पेस्ट कंट्रोलचे काम मुदतीत सुरु न झाल्यास त्यास आपण सर्वश्री जबाबदार राहाल. अशा आशयाचा मेल S & R Pest control Services Nashik या कंपनीस कळविण्यात आला. | याबाबतत्यांचाकाहीहीप्रतिसादआलेलानाही. |

निविदाधारकांचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले वाणिज्यिक बीड (प्राइज बीड) दि.१७/०६/२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेसमोर उघडणेत येऊन,तुलनात्मक तक्त्याचा विचार करताS & R Pest control Services Nashikयांचे एकत्रितपेस्ट कंट्रोल करिताचे दर न्युनतम आहेत व Pest Control M.Walshe, Mumbai यांचे धुरीकरण(फॉगिंग ट्रिटमेन्टस) व डास आळी प्रतिबधंक फवारणीकरिताचे दर न्युनतम आलेले आहेत.

दिनांक १३/०७/२०१७ रोजी चे मा.उपसमितीचे सभेत तिनही ई निविदाधारकास चर्चा वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते त्यापैकी S & R Pest control Services Nashik व Pest Control M.Walshe, Mumbai यांचे प्रतिनीधी उपस्थित होते. मा.उपसमितीचे सभेत झालेल्या चर्चेनुसार दोन्ही न्युनतम धारकांशी झालेल्या चर्चेमध्ये S & R Pest control Services Nashik यांनी सांगितले की आम्हाला सर्व काम दिले तरच आम्ही काम करण्यास तयार आहोत असे सांगितले.

तसेच Pest Control M.Walshe, Mumbai यांनी दि. १३/०७/२०१७ रोजीचे उपसमितीचे समोर झालेल्या दराबाबचे वाटाघाटीतील चर्चेनुसार औषध फवारणी, धुरीकरण, डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी करणे कामी प्राईज बीडमधील मुळ रक्कम रु. १०,६२,६१६.९८/- मध्येरक्कमरु. १,५२,३१५.२०/- इतकी कमी करुन रक्कम रु. ९,१०,३०१.७८/- मात्र या दराने औषध फवारणी करुन देण्यास तयार आहोत असेदि. २०/०७/२०१७ रोजीचेइमेल व्दारे कळविलेले आहे.

औषध फवारणी करणे बाबत Pest Control M.Walshe, Mumbai यांना दि.१७/१०/२०१७ रोजी दुरध्वनी व्दारे विचारणा केली असता त्यांनीदिनांक १३/०७/२०१७ रोजी चे मा.उपसमितीचे सभेत झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीतील चर्चेनुसार मंजूररक्कम (रु. ९,१०,३०१.७८/- ) आम्ही काम करण्यास तयार आहोत असे दि. १८/१०/२०१७ रोजीचे ई-मेल व्दारे कळविले आहे. त्यांचे औषध फवारणी बाबतचे दर खालील प्रमाणे–

<table>
<tr><th rowspan="2">अ.नं.</th><th rowspan="2">औषध फवारणी कामाचा तपशील</th><th colspan="2">Pest Control M.Walshe, Mumbai</th></tr>
<tr><th>(सर्व समावेशक करासह) प्र.स्क्वे.फुट रुपये पैसे</th><th>एकूणरक्कम रुपये पैसे</th></tr>
<tr><td rowspan="3">१</td><td colspan="3">औषध फवारणी</td></tr>
<tr><td>साईआश्रम भक्तनिवास<br>एकूण क्षेत्रफळ-३,४९,७३५.०० चौ.फुट</td><td>१.८०</td><td>६,२९,५२३.००</td></tr>
<tr><td>साई धर्मशाळा<br>एकुणक्षेत्रफळ १,५७,९८२.३२ चौ.फुट</td><td>१.२०</td><td>१,८९,५७८.७८</td></tr>
<tr><td rowspan="3">२</td><td colspan="3">फॉगींग (धुरीकरण)प्रतिफवारणी</td></tr>
<tr><td>साईआश्रम भक्तनिवास<br>एकुण क्षेत्रफळ - ४,१८,२२० चौ.फुट</td><td>१,४००/-</td><td>३३,६००/-</td></tr>
<tr><td>साईधर्मशाळा<br>एकुण क्षेत्रफळ४,८७,६११ चौ.फुट</td><td>१,४००/-</td><td>३३,६००/-</td></tr>
<tr><td rowspan="3">३</td><td colspan="3">डास आळी प्रतिबंधक औषध प्रतिफवारणी</td></tr>
<tr><td>साईआश्रम भक्तनिवास<br>एकुण क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट</td><td>१,२००/-</td><td>१२,०००/-</td></tr>
<tr><td>साईधर्मशाळा<br>एकुण क्षेत्रफळ -४,८७,६११चौ.फुट</td><td>१,२००/-</td><td>१२,०००/-</td></tr>
<tr><td>अ</td><td>एकूण रक्कम साईआश्रम भक्तनिवास</td><td></td><td>६,७५,१२३.००</td></tr>
<tr><td>ब</td><td>एकूण रक्कम साईधर्मशाळा</td><td></td><td>२,३५,१७८.७८</td></tr>
<tr><td></td><td>एकूण अ+ ब</td><td></td><td><u>९,१०,३०१.७८</u></td></tr>
</table>

साई धर्मशाळा व साई आश्रम भक्तनिवासस्थान येथे वेळेवर औषध फवारणी करणे आवश्यक असल्याने S & R Pest Control Services Nashikयांना वारंवार दुरध्वनी तसेच ईमेल व्दारे औषध फवारणी करणे बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत त्यांचे कडुन सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यांना दिलेल्या औषध फवारणीच्या कालावधीत त्यांनी दोन्ही विभागामध्ये एकदाही औषध फवारणी करुन दिली नाही. याबाबत त्यांची काम करण्याची मानसिकता दिसून येत नाही. ते फक्त वेळ वाढवुन मागत आहेत.

**छाननी करुन अनुमान:-**मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने साई धर्मशाळा व साई आश्रम भक्तनिवास या ठिकाणी पेस्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी करता येईल.

**मागणी:-** दि. १३/०७/२०१७ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत प्राईज बीड अंतर्गत दराबाबत झालेल्या चर्चा वाटाघाटी नुसार न्युनतम दरधारकामध्ये L1 असलेलेPest Control M. Walshe, Mumbai यांनी नमुद केलेल्या दरानुसार त्यांना वार्षिक किटकनाशक फवारणीच्या कामाचा कार्यादेश देणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मत :-**

अ) S & R Pest Control Services Nashik यांनी पेस्ट कट्रोल कामी निविदा सोबत अनामत रक्कमेचा रु.५०,०००/- चा डी.डी. जमा केला होता परंतु पेस्टकट्रोंल पात्र ठेकेदारास कार्यादेश देण्यासाठीकालावधी लागल्याने तसेच डी.डी.ची विहीतमुदत संपुष्ठात आल्याने सदर डी.डी. हा संबधीत ठेकेदारास दि.०६/०९/२०१७ रोजी परत देण्यात आला होता. नविन तारखेचा डी.डी ठेकेदाराने आजतागायत साई धर्मशाळा विभागाकडे जमाकेलेला नाही. तसेच औषध फवारणी करणेबाबत त्यांची मानसिकता दिसुन येत नाही, त्यामुळे S & R Pest Control Services Nashik संस्थानचे काळया यादीत समाविष्ट करण्यात यावे, असे मत आहे.

ब) पेस्टकंट्रोल व अनुषंगीक औषधे फवारणीकामी पुन्हा नव्याने ई- निविदा प्रक्रिया राबविल्यास- वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दी करणे, महाराष्ट्र शासनाचे वेबसाईट वरनिविदा प्रकाशित करणे, प्री-बीड सभा इत्यादी कार्यवाहीस कालावधी जाईल. सदरीलकालावधीत प्रक्रिया पुन्हा न राबविता निवासासाठी येणा-या भक्तांना उत्तम सुविधा देणे व किटकनाशक फवारणीची आवश्यकता लक्षात घेता Pest ControlM. Walshe, Mumbai यांना काम करण्याची संधी देता येईल.

क) दि.२४/१२/२०१७ पासुन नाताळ उत्सव सुरु होत आहे. तसेच शताब्दी उत्सव ही चालु आहे. या काळात साईभक्तांची निवासासाठी मोठया प्रमाणात मागणी वाढणार आहे. तसेच वातावरणातील होणा-या बदलामुळे डास, ढेकुन, झुरळे यांचा प्रार्दुभाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी वेळेत औषध फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

ड) S & R Pest Control Services Nashik यांनी औषध फवारणी करण्यासाठी योग्य प्रतिसाद न दिल्यामुळे व भक्तांना चांगल्या सुविधा पुरविणेकामी Pest Control M. Walshe, Mumbai यांना एक वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश द्यावा, असे नम्र मत आहे.

ई) तसेच याकामी येणा-या रु.९,१०,३०१.७८/- (अक्षरी रु. नऊ लाख दहा हजार तिनशे एक रु. अठ्यात्तर पैसे) मात्रचे खर्चास व Pest Control M. Walshe, Mumbai यांना वार्षिक कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्तावात नमुद केलेल्या अ, ब, क, ड व ई मुद्यांवर माव्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**निर्णय क्र.९०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या बाबींचा विचार करता, निम्नतम दरधारक** S & R Pest Control Services Nashik हे **साईधर्मशाळा व साईआश्रम भक्तनिवास येथील पेस्ट कंन्ट्रोल, रोडंन्ट कंन्ट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणीचे काम करण्यास इच्छुक दिसून येत नाहीत. याकरीता त्यांचा काळया यादीत समावेश करणेत येऊन, सदरहू ई-निविदा प्रक्रियेमधील चर्चेअंतीचे निम्नतम दरधारक Pest Control M. Walshe, Mumbai** हे **निम्नतम दरधारकाच्या दरामध्ये सदरहू काम करणेस तयार असल्यास त्यांचेकडून करुन घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **माहे सप्टेंबर- २०१७ या महिन्यामध्ये प्राप्त झालेले गाईचे तुपाच्या नमुन्याची विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार दि.०१.०८.२०१७ पासून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेत येत आहे.

उपरोक्त निर्णयानुसार माहे जुलै २०१७ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेले आहेत. तसेच माहे ऑगस्ट २०१७ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेची कार्यवाही सभा कामकाज विभागामार्फत चालू आहे.

दि.१२.१०.२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी संस्थानला आज अखेर प्राप्त सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार विविध प्रयोगशाळांकडून आज अखेर प्राप्त झालेल्या तपासणी अहवालांचे परिशिष्ठ यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

संस्थानला दि.१६.०९.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या बॅच नं. ६८/ दि.०६.०९.२०१७ चे गावरान तुप १८ व १९ असे कोडींग करुन विहित मान्यता घेवून तपासणीसाठी १) केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, २) रिजनल ॲगमार्क लॅबोरेटरी, मुंबई, ३) फूड हायजिन ॲन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे, ४) अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंन्टस, नासिक, यांचेसह संस्थानचे प्रयोगशाळेत पाठविणेत आलेले होते.

त्यापैकी केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचा उपरोक्त बॅचचा तपासणी अहवाल दि.१२.१०.२०१७ रोजी संस्थानला प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये अ.नं. ८ मध्ये Test of Rancidity **Positive** नमुद आहे, Food Safety & Standards Act. 2006 & Rules & Regulations 2011 नुसार ती Negative असते, त्यामुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे निर्देशाप्रमाणे खरेदी विभागामार्फत संबंधित पुरवठादारास नोटीस बजावण्याची कार्यवाही चालू आहे. तथापि, रिजनल ॲगमार्क लॅबोरेटरी, मुंबई, (Central Govt. Lab) यांचे तपासणी अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंन्टस, नासिक, फूड हायजिन ॲन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे व संस्थानची प्रयोगशाळा यांचे तपासणी अहवाल इकडील विभागास प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये सदरचे नमुने FSSA नुसार Conform आहेत. तसेच आज अखेर उर्वरित सर्व बॅचचे प्राप्त झालेल्या तपासणी अहवालात सदर सर्व नमुने FSSA नुसार Conform असल्याचे नमुद आहे.

उपरोक्त तपासणी अहवालाचे दि.१४.१०.२०१७ रोजीचे परिशिष्ठ (पा.नं.१ ते ६) तसेच उपरोक्त तपासणी अहवालांच्या झेरॉक्स प्रती यासोबत अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत.

तरी सोबतचे परिशिष्ठाप्रमाणे (पा.नं.१ ते ६) प्रमाणे गावरान तुप वइतर मालाचे तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.९०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेंबर- २०१७ या महिन्यामध्ये प्राप्त झालेल्या गाईच्या तुपाच्या नमुन्याची विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली. तसेच केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर यांच्या अहवालाबाबत उपरोक्त निर्णय क्र.८८६ मध्ये चर्चा करणेत आलेली आहे.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत श्री श्री रवीशंकर यांचे सत्संग कार्यक्रमाची निश्चिती व त्याकामी येणा-या सर्व समावेशक बाबींवर विचार विनिमय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२ :**

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली.

तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन यांचे परिशिष्ठ ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार, व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननीकरुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी,अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रुपये ३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विदयुत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था व आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणरा खर्च व इतर अनुषंगीक खर्चासही मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले होते.

त्याअनुषंगाने सामाजिक कार्यक्रमामध्ये श्री श्री रविशंकर यांना सत्संग कार्यक्रम ठेवणेबाबत शताब्दी कक्षाकडून दिनांक ०८/०६/२०१७ व दिनांक ०५/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे कार्यक्रम सत्संग कार्यक्रम ठेवणे व अनुमतीनंतर कार्यक्रमाची दिनांक निश्चित करणेबाबत कळविण्यात आले होते.

याबाबत त्यांचेकडून खालील माहिती प्राप्त झाली आहे.

(१) दि. १०/०१/२०१८ ते २०/०१/२०१८ या कालावधीत सदरचा कार्यक्रम ठेवता येईल.

(२) या सत्संग कालावधीत संस्थान कर्मचारी, निमंत्रित मान्यंवर व राजकीय व्यक्ती यांचेकरीता एक तास विशेष सत्र आयोजित करता येईल.

(३) सत्संग कालावधीत गुरुदेवाचे हस्ते इतरही कार्यक्रम उद्घाटन अथवा नियोजन करण्यात येईल.

(४) गुरुदेव यांचेसमवेत असणा-या ११ सेवेकरी व्यक्तीकरीता उत्तम दर्जाची निवास व्यवस्था संस्थानने करावी.

(५) याशिवाय इतर १०० आर्ट ऑफ लिव्हीग कार्यकर्त्याची राहण्याची व जेवनाची सोय संस्थानने करावी.

(६) सत्संग कार्यक्रमाचे अगोदर आर्ट ऑफ लिव्हीगमार्फत खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

अ) गुरुदेवाच्या मुख्य सत्संगचे कार्यक्रमाचे अगोदर दोन दिवस आर्ट ऑफ लिव्हींगच्या नामांकित गायकांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

ब) आर्ट ऑफ लिव्हीग यांचे मार्फत Enzyme Project शिर्डीत राबविण्यात येईल.

क) आर्ट ऑफ लिव्हीग यांचे मार्फत गरीब, दिन दुबळयांना अन्न, वस्त्रांचे वाटप करण्यात येईल.

ड) आर्ट ऑफ लिव्हीग यांचे मार्फत संस्थान कर्मचा-यांकरीता सशुल्क प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येईल.

इ) गुरुदेवांचा प्रवास व प्रवासातील इतर अनुषंगीक खर्च संस्थानने करावयाचा आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता श्री श्री रविशंकर यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे:

(१) श्री श्री रविशंकर यांचे सत्संग कार्यक्रमाची तारीख निश्चित करणे.

(२) सदर कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास, आवश्यक स्टेज, लाईट, साऊंड सिस्टीम यंत्रणा, चहा-पाणी, प्रसाद भोजन, निवासव्यवस्था व आवश्यक मनुष्यबळ आदी बाबींचा अतिरीक्त खर्च संस्थानला करावा लागणार आहे.

(३) सत्संग कालावधीत आर्ट ऑफ लिव्हीग यांचेमार्फत होणा-या कार्यक्रमाचे (गरीबांना अन्न व वस्त्रे वाटप) संस्थानने नियोजन करावे किंवा कसे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

(४) कार्यक्रमाचे चांगले नियोजनासाठी आर्ट ऑफ लिव्हींग यांचेकडून सदर सत्संग कार्यक्रमाबाबत एकंदरीत खर्चाचे बजेट व येणा-या साधकांची संख्या मागविणे आवश्यक आहे.

(५) सदर कार्यक्रमाचे आयोजनासाठी जागेची निश्चिती करणे आवश्यक आहे. तसेच कालावधीत येणा-या साधकां साठी संस्थानने अतिरीक्त भोजन व निवास व्यवस्था करावी किंवा कसे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

(६) मुख्य सत्संग कार्यक्रमाचे अगोदर दोन दिवस आर्ट ऑफ लिव्हीग यांचेमार्फत होणा-या कार्यक्रमाचे मानधन संस्थान देणार किंवा कसे बाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

(७) श्री श्री रविशंकर यांचा प्रवास(विमान) व इतर अनुषंगीक खर्च संस्थानला करावयाचा आहे.

तरी श्री श्री रविशंकर यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करणेसाठी त्यांनी नमूद केलेले मुद्दे व वरील १ ते ७ धोरणात्मक बाबीवर विचार विनिमय होऊन, आर्ट ऑफ लिव्हीग यांचेकडून उपरोक्त नमूद केलेल्या मुदयाबाबत खर्चास बजेट मागविणे व त्यांचे बजेटनुसार येणा-या सर्व समावेशक व ऐनवेळी उद्भणा-या प्रासंगिक खर्चावर विचार विनिमय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत माहे जानेवारी- २०१८ मध्ये एक दिवस श्री श्री रविशंकर यांचा सत्संग कार्यक्रम साईनगर मैदानावर आयोजित करण्यात यावा, यासाठी तारीख व कार्यक्रमासाठीच्या खर्चाचे अंदाजपत्रक मागविणेसाठी त्यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

सभेच्या सुरवातीस समाधी शताब्दी वर्षातील विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी संस्थानने विशेष शताब्दी कक्ष निर्माण केला आहे. या कक्षामध्ये महाराष्ट्र शासनाने दोन उपजिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे या उपजिल्हाधिकाऱ्यांनी फक्त शताब्दीस संबंधीत कामकाज करणे आवश्यक आहे. त्यांना संस्थानचे इतर दैनंदिन प्रशासकीय काम हाताळू नये व या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी केली. परंतु समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी प्रशासकीय कार्यपध्दती व कामकाजासंदर्भात मुख्यकार्यकारी अधिकारी यांना निर्णय घेऊ देणे उचित होईल व त्यांनी आवश्यकतेप्रमाणे कोणते कामकाज कोणत्या अधिकाऱ्याकडे द्यायचे, त्याचा निर्णय घ्यावा, त्याप्रमाणे सर्व अधिकाऱ्यांनी पुर्ण क्षमतेने काम सुरु केलेले असल्यामुळे आता अशा प्रकारे निर्णय घेतल्यास समाधी शताब्दी कालावधीमध्ये बाधक होईल, असे मत मांडले.

यावर मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी वरील अधिकाऱ्यांची शताब्दी कालावधीसाठी जरी नेमणूक झालेली असली तरी, संस्थानचे आस्थापनेवर नियुक्ती झालेनंतर त्यांचे वेतन संस्थान देत असल्यामुळे, त्यांची सेवा व कार्यक्षमता इ.चा पुर्णपणे उपयोग करुन घेतला पाहिजे व समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनीसुध्दा स्विकारले आहे की, दोन्हीही उपजिल्हाधिकारी खुप कार्यक्षम आहेत. संपुर्ण वर्षभरात समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत मोठया प्रमाणावर साईभक्तांची होणारी गर्दी, विविध कार्यक्रम हे संस्थानच्या सर्व विभागामार्फत एकत्रितपणे राबविले जाणार आहे, त्यामुळे दैनंदिन कामकाज व शताब्दीचे कामकाज असे वेगळे वर्गीकरण करता येणार नाही. शासनाने शताब्दीसाठी मंजुर केलेल्या रु.३०२३ कोटी मात्रच्या आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी सर्व विभागांचा सहभाग घ्यावा लागेल. फक्त दोन उपजिल्हाधिकारी यांचेबाबत निर्णय घेता येणार नाही. हा निर्णय कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, पोलिस उपअधिक्षक या सर्वांसाठी लागू केला तर कामकाज सुरळीत होणार नाही. तसेच अधिनियम- २००४ मधील कलम १४ (३) मध्ये मुख्यकार्यकारी अधिकारी यांना काम नेमूण देण्याचे अधिकार आहेत, त्यामुळे अशा प्रकारचा निर्णय घेऊ नये, असे निवेदन केले.

**निर्णय क्र.९१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रशासनाने दैनंदिन कामकाज व समाधी शताब्दी महोत्सवाचे कामकाज असे वर्गीकरण करुन फक्त समाधी शताब्दी महोत्सवाचे कामकाजच दोन्ही उपजिल्हाधिकारी यांचेकडे सोपवावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**निर्णय क्र.९११** माहितीचा अधिकार कायदा- २००५ अंतर्गत विस्तृत स्वरुपाची माहिती देणेकामी माहितीची मागणी करणाऱ्या संबंधीतास समक्ष माहिती उपलब्ध करुन देणेकामी एका स्वतंत्र कक्षाची निर्मिती करणेत यावी व माहिती देतेवेळेस ज्या विभागाची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असेल त्या विभागाच्या संबंधीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी देण्यात येणाऱ्या माहितीची खातरजमा करुन माहिती द्यावी. सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरुन माहिती देऊ नये. तसेच माहिती अधिकार अधिनियम- २००५ संदर्भात पुढील बैठकीअगोदर सर्व संबंधीतांचे प्रशिक्षण समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी घ्यावे, असे ठरले.

(कार्यवाही- माहिती अधिकार कक्ष)

---

**निर्णय क्र.९१२** समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेकामी येणाऱ्या अर्जांची छाननी करणेसाठी गठीत करणेत आलेल्या समितीचे अध्यक्षपदी, समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांची सर्वानुमते निवड करणेत आली. या समितीने पादुका दर्शन सोहळयासाठी आलेल्या अर्जांची छाननी करुन, अंतीम निर्णयासाठी सभेसमोर सादर करावे, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.९१३** समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिनांक २३ व २४ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथे देश-विदेशातील साईमंदिरांच्या अध्यक्ष व सदस्य यांचे संम्मेलन आयोजित करणेचे प्रस्तावित होते. परंतु आजचे सभेत अशी चर्चा झाली की, देश-विदेशातील साईमंदिरांच्या अध्यक्ष व सदस्य यांचे संम्मेलन दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथील साईनगर मैदानावर आयोजित करणेत यावा व त्यासाठीची आवश्यक प्रक्रिया सुरु करणेसाठी पुढील सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.८५० ते ९१३ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०४.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**